# महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदाय एक विहंगावलोकन



प्रा.समीर रामचंद्र वैरागी

Made with PosterMyWall.com

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदाय

## एक विहंगावलोकन

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

# महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदाय

# एक विहंगावलोकन

## लेखक: प्रा. समीर रामचंद्र वैरागी

पत्ता : स्नेह ब – १७, पोंदार रुग्णालयासमोर, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई – ४०००३०.

चलभाष क्रमांक : ९९८७४६६४६७

ई-टपाल पत्ता : Sameer.vairagi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

**प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान**

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)

प्रकाशन : १४ फेब्रुवारी २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. १५०/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- प्रा. समीर रामचंद्र वैरागी ९९८७४६६४६७)

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखक परिचय



**प्रा. समीर रामचंद्र वैरागी,**

सहायक प्राध्यापक आणि विभागप्रमुख(मराठी),

राजपत्रित अधिकारी(म.शि.से.), गट -अ,

महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी(पूर्व),

मुंबई - ४०००६०.

शिक्षण : एम.ए., बी.एड.,

एम.फिल.,

नेट(जेआरएफ), सेट,

वृत्तपत्रपदविका,

भगवद्गीता पदविका,

मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम,

भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम.

अर्पणपत्रिका

महाराष्ट्राच्या समृद्ध संत परंपरेस सादर समर्पित

हें सारस्वताचें गोड। तुम्हींचि लाविलें जीं झाड॥
तरी आतां अवधानामृतें वाड। सिंपोनि कीजे॥
संत ज्ञानेश्वर

# महाराष्ट्रातील भक्तिसंप्रदाय : एक विहंगावलोकन

## अनुक्रमणिका


१. संप्रदाय : संज्ञा परिचय

२. महानुभाव संप्रदाय

३. वारकरी संप्रदाय

४. शाक्त संप्रदाय

५. गाणपत्य संप्रदाय

६. पाशुपत संप्रदाय

७. नाथ संप्रदाय

८. वीरशैव लिंगायत संप्रदाय

९. दत्त संप्रदाय

१०. समर्थ संप्रदाय

११. नागेश संप्रदाय

१२. चैतन्य संप्रदाय

१३. महाराष्ट्रातील अन्य संप्रदाय : एक अवलोकन

संदर्भ ग्रंथ आणि लेख सूची

# संप्रदाय : संज्ञा परिचय

संप्रदाय म्हणजे एकाच धर्माच्या वेगवेगळया परंपरा किंवा विचारधारा मानणारा लोकसमुदाय होय. संप्रदाय या शब्दाचा कोशांतर्गत अर्थ परंपरा, आध्यात्मिक वंश, धार्मिक व्यवस्था असा होतो. धर्मप्रसाराच्या माध्यमातून सातत्य राखण्यासाठी विविध धर्मातर्गत विभिन्न संप्रदायांची निर्माण झालेले दिसतात.संप्रदाय हा शब्द सर्वप्रथम ज्ञानकोशकार श्री.व्यं.केतकर यांनी धर्मपंथांसाठी वापरला.संप्रदायाला पंथ, मार्ग, मत हे पर्यायवाची शब्द आहेत.संप्रदाय व पंथ हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द असले, तरी त्यांमधून दोन भिन्न गोष्टी सूचित होतात, संप्रदाय या शब्दामधून परंपरा सूचित होते.दैवी, अनुभूतीसंपन्न अशा एखाद्या व्यक्ती किंवा व्यक्तींकडून जी परंपरा सुरू होते, तिला ‘संप्रदाय’असे म्हणतात, तर अनुभूती ध्येयाकडे नेण्याचा मार्गक्रम म्हणजे ‘पंथ’ होय.संप्रदाय या शब्दातून विविक्षित धार्मिक समूह, आध्यात्मिक वंश सूचित होतो.

## संप्रदाय संज्ञेच्या विविध व्याख्या

१. विविध धार्मिक, आध्यात्मिक परंपरेतील शिकवण आणि आचरण म्हणजे ‘संप्रदाय’ होय.
२. गुरूकडून शिष्याकडे प्रेषित होणारी अखंड, शिस्तबद्ध क्रमिक रेषा म्हणजे ‘संप्रदाय’ होय.
३. धर्म किंवा विचारसरणी यांतील विविक्षित मतांचा पुरस्कार करणारा वर्ग म्हणजे ‘संप्रदाय’ होय.
४. विशेष धार्मिक मत किंवा प्रणाली म्हणजे ‘संप्रदाय’.
५. विविक्षित विचारसरणी मानणारा लोकसमुच्चय म्हणजे ‘संप्रदाय’ होय.




६.

## हिंदू धर्मांतर्गत प्रमुख संप्रदाय

वैदिकोत्तर कालखंडात तत्कालीन भारतात भागवत, पाशुपत, बौद्ध, जैन, गाणपत्य, सौर हे संप्रदाय निर्माण झालेले दिसतात.भारतात प्राचीन-मध्ययुगीन कालखंडात दक्षिण भारतातून भक्ती चळवळ निर्माण झाली, त्यातून विविध भक्ती संप्रदाय हिंदू धर्मात उदयाला आले.आळवार हा वैष्णव पंथ तामिळनाडूमध्ये इ.स.८०० ते ८०० या काळात निर्माण झाला.आळवार म्हणजे ‘ईश्वराच्या प्रेमसागरात बुडून गेलेला भक्त’ होय.नायनार किंवा नायन्मार म्हणजे शैव संप्रदाय.

प्राचीन काळातील भागवत धर्म, पंचरात्र, वैखानस हे वैष्णव संप्रदाय, तर मध्ययुगीन काळातील श्रीवैष्णव, ब्रह्म, रुद्र, निंबार्क, अय्यंगार थेंकलाई, अय्यंगार वडाकलाई, गौडीय वैष्णव, महानाम, वारकरी, महानुभाव, बिष्णोई, रामानंदी, दादू, प्रणामी, कबीर, चरण दासी,

राधावल्लभ, ओडिया वैष्णव धर्म, एकसरण धर्म, समर्थ स्वामीनारायण इत्यादी हिंदू धर्मातर्गत वैष्णव संप्रदाय आहेत.

शैव सिद्धांत, पाशुपत, कापालिक, कालामुख, नायनार किंवा नायन्मार, काश्मिरी शैवमत हे प्राचीन शैव संप्रदाय असून, दशनामी, नाथ, वीरशैव लिंगायत हे मध्ययुगीन शैव संप्रदाय आहेत.

शाक्त संप्रदायाचे उपपंथ किंवा उपसंप्रदाय हे मुख्यतः उपासनाच्या पद्धतींवर आधारित आहेत, ज्यामध्ये साममार्गी (सात्त्विक पूजा) आणि वाममार्गी (तांत्रिक पूजा) हे दोन मुख्य प्रकार आढळतात.साममार्गात देवीची वैदिक मंत्रांचा उपयोग करून सात्त्विक पद्धतीने पूजा केली जाते, तर वाममार्गात मंत्र, तंत्र, मांस, मद्य आणि मैथुन यांचा समावेश असतो.याशिवाय शाक्त पंथाचे मुख्य उपसंप्रदाय किंवा परंपरा श्री विद्या, काली विद्या आणि योगिनी विद्या ते अनुक्रमे देवी लक्ष्मी, देवी काली आणि योगिनी यांच्या पूजेवर लक्ष केंद्रित करतात. याव्यतिरिक्त, दहा महाविद्या, त्रिदेवी (पार्वती, लक्ष्मी, सरस्वती) आणि स्थानिक ग्रामदेवींची पूजा करणारे लहान गट देखील शाक्त परंपरेत येतात.

प्राचीन कालखंडातील महागणपती, हरिद्रागणपती, उच्छिष्टगणपती, नवनीतगणपती, स्वर्णगणपती आणि संतानगणपती हे गाणपत्य संप्रदायातील सहा भेद किंवा उपसंप्रदाय होते.

स्मार्त संप्रदाय हा वैदिक हिंदू धर्मामधील एक प्रागतिक, उदारमतवादी, सर्वधर्मसमन्वायी पंथ आहे. स्मार्तांच्या मते माणसाला आपापला देव निवडायचे स्वातंत्र्य आहे. म्हणूनच ते वैष्णव, शैव आणि शाक्त लोकांपेक्षा भिन्न आहेत. एकच देव मानणाऱ्यांना मात्र त्यांचा विरोध

नाही, म्हणूनच स्मार्त उदारमतवादी आहेत. स्मार्त ब्राह्मण सूर्याला स्वतंत्र देव मानतात. स्मार्त ब्राह्मण हे सर्व देवांना ब्रह्माचे रूप मानतात.

सौर संप्रदाय म्हणजे सूर्यदेवाची उपासना करणारी एक परंपरा आहे, जी वैदिक काळापासून अस्तित्वात आहे आणि यात सूर्यदेवाला सर्वशक्तिमान निर्माता मानले जाते. या संप्रदायात सूर्योपासना विविध पद्धतींनी केली जाते आणि या परंपरेतील मुख्य ग्रंथ साधारणपणे इसवी दहाव्या शतकातील आहेत.

## समारोप

संप्रदाय हा विविध परंपरांचा संगम असून, त्यात अनेक लोक एकत्र येतात.संप्रदाय हा एखादा विषय किंवा सिद्धांताविषयी एकच विचार-मत असणाऱ्या लोकांचा वर्ग असतो.संप्रदायात गुरू-शिष्य परंपरा दिसते.समान विचारसरणी, शिस्तबद्धता, आध्यात्मिक ज्ञानाचा संचार, गुरू परंपरा, समान आचार ही संप्रदायाची काही वैशिष्ट्ये आहेत.उपासना पद्धती, उपास्य दैवत, विधी, संस्कार, चालीरीती यांत संप्रदायानुसार वैविध्य दिसते.

# हिंदू धर्मांतर्गत प्रमुख संप्रदाय








# महानुभाव संप्रदाय

'संप्रदाय' हा संस्कृत शब्द आहे.'संप्रदाय' म्हणजे एकाच धर्माच्या वेगवेगळया परंपरा किंवा विचारधारा मानणारा लोकसमुदाय होय.मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात हिंदूधर्मांतर्गत अनेक भक्तिसंप्रदाय उदयाला आले.त्यातील एक महत्त्वाचा संप्रदाय म्हणजे 'महानुभाव संप्रदाय'होय. "महान अनुभवोस्तेजा बलं वा यस्य सः महानुभावः" अर्थात "महान तेजाने युक्त असलेल्या लोकांचा मार्ग म्हणजे 'महानुभाव पंथ' होय.महानुभाव पंथाला 'महानुभाव' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम संत एकनाथांनी वापरला, असे मराठी भाषाभ्यासक शं.गो.तुळपुळे म्हणतात.महानुभाव पंथाचे संस्थापक_चक्रधर स्वामी यांनी स्वतः आपल्या मार्गाला 'परमार्ग' म्हटले आहे.महानुभाव संप्रदायाला महात्मा पंथ, अच्युत पंथ, जयकृष्णी संप्रदाय, भटमार्ग अशी इतर नावे दिसतात.गुजरातमध्ये 'अच्युत पंथ' व पंजाबात 'जयकृष्णी पंथ' ही नावे लोकप्रिय आहेत.महानुभावांचे पहिले आचार्य नागदेवाचार्य म्हणजेच भटोबासांनी पंथाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर केल्याने या पंथाला 'भटमार्ग'असे म्हणतात.डॉ.वि.भि.कोलते यांच्या मताप्रमाणे या संप्रदायाचे मूळ नाव 'परमार्ग' असेच होते.आज सुमारे ७५० वर्ष महानुभाव पंथ महाराष्ट्र, मध्यप्रदेश, पंजाबात अस्तित्वात आहे.

# महानुभाव संप्रदाय : एक परिचय

महानुभाव पंथाची स्थापना चक्रधर स्वामी यांनी इ.स.१२६७ मध्ये केली.महानुभाव हा श्रीकृष्ण या उपास्य दैवताला मानणारा द्वैती भक्ती संप्रदाय आहे. मराठी या लोकभाषेचा केलेला पुरस्कार, ज्ञान-भक्ती समन्वय, बहुदेवता पूजेचा निषेध, चातुर्वर्ण्य व्यवस्थेवर टिका, अहिंसा-वैराग्याला महत्त्व ही महानुभाव संप्रदायाची काही वैशिष्ट्ये आहेत.महानुभाव पंथात स्त्री-शुद्रादिकांना मोक्षाचा अधिकार दिला.जैन-बौद्ध धर्मांप्रमाणेच महानुभाव पंथात धर्माचे रहस्य लोकभाषेत लोकांना सांगितले आहे.महानुभाव पंथाचा प्रसार प्रामुख्याने महाराष्ट्रात झाला आहे, त्याचबरोबर मध्यप्रदेश, उत्तर भारत, पंजाब, काश्मिरपर्यंत महानुभाव पंथ प्रसारित झालेला आहे.सोळाव्या शतकात कृष्णराजा म्हणजेच कृष्णमुनींनी महानुभाव पंथाचा प्रसार पंजाबात केला. चक्रधरांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि विचारसरणीमुळे त्यांच्या हयातीतच त्यांचे अनेक शिष्य झाले. त्यात बाईसा, आऊसा, महादाईसा(महदंबा), उमाइसा, आबाइसा अश्या काही स्त्रियाही होत्या.बाईसा म्हणजेच नागबाई पैठणकर ही संन्यासिनी स्त्री मठप्रमुख होती.महानुभाव पंथामध्ये बाईसांना ‘माय माउली’ म्हणून संबोधले जाते, हे त्यांचे पंथातील स्थान दर्शवते. सारंग पंडित, रामदेव विद्यावंत, प्रज्ञासागर, म्हाइंभट्ट यांसारखे विद्वान पंडितही त्यांच्या शिष्यवर्गात होते. यादव दरबारातील अधिकारी, पुरुष व राजस्त्रिया यांनीही चक्रधरांचे अनुयायित्व पतकरले.चक्रधरांनंतरच्या काळात पंथाची संघटना बळकट करून त्याला स्थिरता देण्याचे कार्य नागदेवाचार्यांनी केले; परंतु त्यांच्या पश्चात मुसलमानी आक्रमण व पंथीय तंटेबखेडे यांमुळे पंथाची बरीच वाताहात झाली. महानुभाव पंथात परशुराम आचार्य यांच्या काळात अनुयायांच्या

नावाने तेरा आम्नाय निर्माण झाले.महानुभाव पंथाच्या प्रारंभीच्या काळात त्याला लाभलेली लोकप्रियता आणि झालेला उत्कर्ष पुढील काळात टिकला नाही. त्याची अप्रियता वाढली.

## महानुभावांची पंचकृष्ण व अवतार संकल्पना

महानुभाव पंथात पंचकृष्ण किंवा पंचवतार संकल्पना महत्त्वाची मानली जाते.या पंथात पंचवतारांची उपासना केली जाते.महानुभाव तत्त्वज्ञानानुसार परमेश्वराचे (१)अवतरदृश्यावतार, (२)परदृश्यावतार, (३)उभयदृश्यावतार असे तीन प्रकारचे अवतार आहेत.द्वापारीचे श्रीकृष्ण चक्रवर्ती, त्रेतायुगीचे श्रीदत्तात्रय प्रभू, द्वारावतीचे चांगदेव राऊळ म्हणजेच चक्रपाणी, ऋद्धिपूरचे गुंडम राऊळ म्हणजेच श्रीगोविंदप्रभू, प्रतिष्ठानचे चांगदेव राऊळ म्हणजेच चक्रधर स्वामी हे महानुभावांचे पंचकृष्ण किंवा पंचवतार आहेत. महानुभाव पंथात पंचकृष्ण हे परमेश्वराचे अवतार मानले जातात. श्रीदत्तात्रय प्रभू, श्रीकृष्ण, चक्रधर स्वामी हे परमेश्वराचे उभयदृश्य पूर्णावतार मानले जातात.गुंडम राऊळ म्हणजेच श्रीगोविंदप्रभू हे परदृश्यावतार मानले जातात.द्वारावतीचे चांगदेव राऊळ म्हणजेच चक्रपाणी हे अवतरदृश्यावतार मानले जातात.महानुभाव पंथात श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार मानला जात नाही.महानुभाव पंथातील दत्त हा एकमुखी, चतुर्भुज आहे.या पंथात इतर देवता क्षुद्र मानल्या जातात. पंचकृष्णांचा म्हणजेच परमेश्वरांचा संबंध जय स्थळांशी आला, अशा स्थळांना महानुभवांमध्ये ‘स्थाने’ म्हटले जाते, अशी एकूण १६५० स्थाने आज अस्तित्वात आहेत.कृतयुगात ‘हंसवतार’, ‘त्रेतायुगात ‘दत्तावतार’, द्वापारयुगात ‘कृष्णावतार’, कलियुगात ‘श्री चक्रधर’ हे प्रमुख चार अवतार महानुभाव पंथात मानले जातात.परमेश्वर नेहमी मनुष्यरूप धारण करून अवतार घेतो, अशी या पंथात मान्यता

दिसते.चक्रधर स्वामींनी “आपण स्वतः ईश्वरावतार असून आपणास अनुसरा व आपलेच चिंतन करा.” असा आदेश अनुयायी, शिष्यांना दिला आहे.

## महानुभावांचा आचारधर्म

महानुभाव संप्रदायात अहिंसेला व वैराग्याला विशेष महत्त्व आहे. अहिंसेबद्दल या पंथाचा कडक कटाक्ष आहे. महानुभाव हिंसा तीन प्रकारची मानतात.१] आगान्तुक हिंसा म्हणजे मानसिक हिंसा, २] अनारब्ध हिंसा म्हणजे वाचिक हिंसा, ३] प्रारब्ध हिंसा म्हणजे कृतीतून हिंसा."हिंसा वर्ते तिये स्थानी महात्मेया असु नये"हे सुत्र हेच सांगते की, प्रत्यक्ष तर सोडाच पण दुसरे कोणी हिंसेने वागत असतील तर तेथेही राहू नये.या पंथात चार प्रमुख नियमांवर भर दिलेला दिसतो, ते पुढीलप्रमाणे (१)शरणागती, (२)प्रसाद सेवा, (३)मूर्तिध्यान वा मूर्तिज्ञान, (४)नामस्मरण.यतिधर्म(संन्यास) व गृहस्थधर्म या दोहोंवर या पंथात भर दिलेला आहे. या पंथामध्ये जे संन्यस्त अनुयायी आहेत. त्यांच्यासाठी कडक विधि आहेत. हे विधी दोन प्रकारचे आहेत.

१) नित्य विधी – अटन, विजन, भिक्षा, भोजन, स्मरण, प्रसादसेवा, निद्रा हे विधी नित्यनेमाने करावे असे सांगितले आहे.अशा प्रकारे हे सात नित्य विधी आहेत. नित्यविधींना 'माहेर' म्हटले आहे, कारण या विधीत स्वेच्छा, उत्स्फूर्तता असते.

२) नैमित्यविधी - काही निमीत्ताने केल्या जाणाऱ्या विधीना 'नैमित्य विधी' असे म्हणतात.नैमित्य विधीना सासर असे म्हणतात, कारण येथे सक्ती कठोरपणा आहे या पंथाच्या सांसारिक उपासकांचे नामधारक साधक, वेधवंत, बोधवंत, वासनिक हे चार प्रकार मानण्यात येतात. सर्व अनुयायांनी उपासकांनी जुगार खेळणे, मांसाहार करणे, वेश्यागमन करणे, परस्त्री सेवना करणे, मद्यपान करणे, चोरी करणे, हिंसा करणे या सात व्यसनांपासून दूर रहावे, याबाबत पंथाचा कटाक्ष दिसतो.

## महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान

महानुभाव पंथ हा द्वैती पंथ असून या पंथात आत्मा व परमात्मा यांचे अस्तित्व वेगवेगळे मानले जाते.कारण प्रपंच हा अनादी, अनंत व नित्य असतो, तर कार्य प्रपंच व्यक्त, अनित्य असतो. महानुभवांनी जातिनिरपेक्षता व अहिंसा तत्त्वांचा पुरस्कार केला. "अहिंसा परमो धर्मः" या तत्त्वाला महानुभाव संप्रदायात महत्त्व आहे.या पंथात अनादी, अनंत अशी जीव, देवता, प्रपंच, परमेश्वर ही मूळ चार तत्त्वे सांगितली आहे.जीव हा 'बद्धमुक्त' असतो.जीव जन्माला येताना बद्ध अवस्थेत येतो, पण परमेश्वराची उपासना केल्यानंतर जीव मोक्ष मिळून मुक्त होऊ शकतो.देवता या नित्यबद्ध असतात, त्या केवळ जीवाला फळ देतात.देवता जीवाचा उद्धार करू शकत नाही.परमेश्वरप्राप्तीच्या दृष्टीने देवतांची उपासना अप्रमाण मनाली जाते.प्रपंच जड आहे, प्रपंच 'कारण प्रपंच' व 'कार्य प्रपंच' असे प्रकार केले जाते.परमेश्वर नित्यमुक्त असल्याने तोच जीवाचा उद्धार करू शकतो. "जीव व देवता ह्या परमेश्वर नाहीत त्यांच्या उपासनेने तात्कालिक फळे मिळतात, पण आत्यंतिक मोक्ष मिळत नाही." अशी महानुभवांची तात्त्विक धारणा आहे.

महानुभाव संप्रदाय हा वैदिक की अवैदिक याबद्दल मतमतांतरे दिसतात. "वेद हे कर्मरहाटीचे शास्त्र म्हणून त्याज्य आहेत," हे चक्रधरांचे मत त्यांचे वेदविरोधकत्व सूचित करते.महानुभावांना वेदवचने मान्य नाहीत, तर चक्रधरवचने हीच या संप्रदायमध्ये श्रुती मानली जाते.या पंथात व्यक्तीचे श्रेष्ठत्व जन्माने नव्हे, तर त्याच्या तत्त्वज्ञानाने ठरते, असे महानुभावांचे मत आहे.सर्व माणसे समान आहेत, यावर महानुभाव भर देतात.धर्मासाठी आम्ही नाही, धर्म आमच्यासाठी आहे, असे महानुभावांचे तत्त्वज्ञान सांगते.धर्म साध्य नाही, तर साधन आहे, अशी या पंथाची शिकवण आहे.

## चक्रधर स्वामींचे अलौकिक व्यक्तित्व

महानुभाव संप्रदायाचे संस्थापक आणि तत्त्वचिंतक चक्रधर स्वामी (इ.स.११९४-इ.स.१२७४) हे स्वरूपसुंदर व आकर्षक होते.चक्रधरांकडे वयस्तंभिनी विद्या व वेधवती शक्ती होती.आपल्या व्यक्तिमत्त्वाने आणि मधुर वाणीने जनतेला आकृष्ट करण्याचे विलक्षण सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते.गुजराती ही त्यांची मातृभाषा होती, तरी मराठीवरही त्यांचे उत्तम प्रभूत्व होते. संस्कृत भाषेचा व ग्रंथांचाही त्यांचा चांगला व्यासंग होता.चक्रधर स्वामींनी आपले संपूर्ण तत्त्वज्ञान सर्वसामान्यांना रुचेल, समजेल अशा तत्कालीन मराठी भाषेत सांगितले.एकाकी भ्रमणाच्या काळात चक्रधरांनी लोकजीवन-लोकमानसाचे प्रत्यक्ष निरीक्षण केले. त्या मध्ययुगीन यादवकालीन सामाजिक व धार्मिक परिस्थितीचे अवलोकन केले, नंतर प्रकटपणे समाज व धर्मसुधारणेचे कार्य सुरू केले.

ज्ञान, आत्मशोध व आत्मोधारासाठी गौतम बुद्धांनी केलेला सर्वसंग परित्याग आणि सर्व जीवांच्या उद्धारासाठी विरक्त होऊन चक्रधरांनी केलेला गृहत्याग दोन्ही घटनांमध्ये आपणास आश्चर्यकारक साम्य आढळते. चक्रधर हे सामाजिक समतेचे आद्यप्रवर्तक असून, त्यांनी समतेचे तत्त्वज्ञान मांडले आहे. ते अहिंसेचे पुरस्कर्ते होते. वर्ण व जातिविषमता, विटाळ-चांडाळ इ. कल्पना त्यांना मान्य नव्हत्या. वैदिक परंपरेला नाकारून स्त्री-शूद्रांसह सर्वांना मोक्षाचा समान अधिकार देणाऱ्या सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांचे नाव महाराष्ट्रातील समाजसुधारकांमध्ये अग्रक्रमाने घ्यावे लागेल.मध्ययुगीन काळात समतेचे तत्त्वज्ञान मांडून चक्रधरांनी धर्मक्रांती केली.

**महानुभाव पंथाची वैशिष्ट्ये**

१.महानुभाव संप्रदायात जातीभेद मान्य नाही.

२. महानुभावांत स्त्री-पुरुष समानता आहे.

३. महानुभाव पंथात उच्च-नीच असा भेद केला जात नाही.

४. महानुभाव पंथात श्रीमंत-गरीब हा भेद केला जात नाही.

५. महानुभाव कर्मकांड मानत नाही.

६. विटाळ-चांडाळ या कल्पनांना मान्यता नाही.

७. महानुभाव द्वैती पंथ आहे.

८. मराठी ही महानुभाव पंथाची पंथभाषा असून बहुतांश महानुभाव साहित्य मराठीतच आहे.

९. महानुभाव संप्रदायाने मराठी भाषेला 'शास्त्र काट्याची कसोटी' प्राप्त करून दिली.

१०. चक्रधर स्वामी हे सामाजिक समतेचे आद्यप्रवर्तक असून, त्यांनी समतेचे तत्त्वज्ञान मांडले आहे.

**महानुभाव वाङ्मयाची विभागणी**

महानुभाव वाङ्मयाची विभागणी पुढीलप्रमाणे केली जाते; १.चरित्रग्रंथ, २.सूत्रग्रंथ, ३.सातीग्रंथ(काव्य), ४.भाष्यग्रंथ, ५.साधनग्रंथ, ६.तात्त्विक ग्रंथ, ७.गीता टीका, ८.आख्यानक काव्य, ९.स्थलवर्णनपर ग्रंथ, १०.इतिहास ग्रंथ, ११.स्फुट रचना. महानुभाव मराठी वाङ्मयाचा इ.स.१३५० पूर्वीचे साहित्य हा पूर्वरंग, तर

इ.स.१३५० ते इ.स.१६८० हा उत्तररंग मानला जातो.महानुभाव वाङ्मयाचे वर्गीकरण श्रुती, स्मृती, वृद्धाचार, मार्गारूढी व वर्तमान असेही केले जाते.

१. श्रुती – चक्रधर स्वामीच्या लीळा, सूत्रे, वचने.
२. स्मृती – नागदेवाचार्यांचे सांगणे व त्या काळातील घटना.
३. वृद्धाचार – पंथ आचार्य परसरामबासांपर्यंतच्या घटना.
४. मार्गारूढी – परसरामबासांनंतरच्या घटना.
५. वर्तमान – आजकालचे महानुभाव साहित्य.

## महानुभावांच्या सांकेतिक लिप्या

काही महानुभाव आम्नायांनी सांकेतिक लिपीत आपले ग्रंथ निबद्ध केले.आपली ब्रह्मविद्या, धर्ममते भ्रष्ट होऊ नयेत, म्हणून इतरांपासून गुप्त ठेवण्याची आणि पंथीय वाङ्मयाचे पावित्र्य राखण्याची भावना वाढीस लागून त्यासाठी ग्रंथ सांकेतिक लिपीत लिहिण्यास येऊ लागले.रवळो व्यासाने इ.स. १३५३ मध्ये सकळ लिपी, तर इ.स.१३६३ मध्ये सुंदरी लिपी निर्माण केली. त्यानंतर पारमांडल्य, वज्रलिपी, अंकलिपी इ. अनेक लिप्या तयार झाल्या असल्या, तरी बहुतेक ग्रंथ सकळ लिपीतच आढळतात.

## महानुभाव पंथीयांचे मराठी वाङ्मय

महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर हे स्वतः गुजराती भाषिक असले, तरी ते मराठी भाषा अयिरत बोलत. आपल्या तत्त्वज्ञानाचा मराठी या लोकभाषेत त्यांनी प्रचार केला. त्यांचा हा दृष्टिकोण पंथाचे आचार्य नागदेव यांनी कटाक्षाने आचरणात आणला. त्यामुळे केशिराजांसारख्या संस्कृतज्ञ शिष्यांकडून त्यांनी माठी

भाषेत ग्रंथरचना करवून घेतली (नको गा केशवदेया : येणें, माझिया स्वामीचा सामान्य परिवारू नागवैस की : किंवा ‘तुमचा अस्मात् मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे निरुपल्ली मऱ्हाटी : तियाचि पुसा :) महानुभावांच्या मराठीविषयक आत्मीयतेच्या भावनेमुळे या पंथातील व्यक्तींनी विविध वाङ्मयप्रकारांत रचना करून मराठी साहित्य समृद्ध केला आहे.स्मृति-संकलनात्मक गद्य चरित्रवाङ्मय ही या पंथाची मराठी साहित्यास लाभलेली महत्त्वाची देणगी होय. महानुभाव वाङ्मयात चरित्रे, सूत्रवाङ्मय, टीकावाङ्मय, न्याय-व्याकरणादी शास्त्रे, क्षेत्र व व्यक्तिमहात्मवर्णने, स्तोत्रे, आरत्या इ. प्रकारचा समावेश आहे. निरनिराळ्या काळात पंथातील प्रतिभासंपन्न कवींनी लिहिलेल्या सात काव्यांना ‘साती ग्रंथ’ म्हटले जाते. यात नरेंद्रांचे रुक्मिणीस्वयंवर(रुक्मिणीसैंवर), भास्करभट्ट बोरीकरांचे शिशुपालवध व उद्धवगीता. दामोदर पंडितांचा वछाहरण, रवळो व्यासकृत सैह्याद्रिवर्णन, पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांचा ज्ञानप्रबोध आणि पंडित नारायण व्यास वहाळिये यांचे ऋद्धिपूरवर्णन यांचा समावेश होतो. हे साती ग्रंथ परमार्गाच्या परंपरेने मान्य केलेले आहेत. म्हाइंभट सराळेकर यांनी संकलित, संपादित केलेला ‘लीळाचरित्र’ हा मराठीतील आद्य गद्यचरित्र ग्रंथ इ.स.१२७८ मध्ये निर्माण झाला आहे. या ग्रंथात श्रीचक्रधरांच्या आठवणी-लीळा त्यांनी संकलित केल्या आहेत. लीळाचरित्राचे एकांक, पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे तीन भाग आहेत. लीळाचरित्राची भाषा साधी, सोपी व सरळ आहे. लीळाचरित्र हा ग्रंथ महानुभाव पंथाच्या सर्व वाङ्मयाचा पाया ठरला. सिद्धांतसूत्रपाठ व दृष्टांतपाठ यांसारखे ग्रंथ त्यातूनच निर्माण झाले. समाजाच्या सर्व थरांशी संबंध आलेल्या एका नवपंथसंस्थापकाचे हे चरित्र असल्याने त्यात समाजदर्शनही प्रत्ययकारी रीतीने घडते.म्हाइंभट सराळेकर यांनी निर्माण केलेला दुसरा ग्रंथ म्हणजे ‘गोविंदप्रभुचरित्र किंवा ऋद्धिपूरचरित्र’(इ.स.१२८८) हा होय.त्यात गुंडमराउळ किंवा गोविंदप्रभु या महानुभावांच्या पंचकृष्णांपैकी एका

अवताराच्या लीळा सांगितल्या आहेत.‘जतिचा दशकू’ म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या दहा आरत्या म्हाइंभटांच्या नावावर असून, त्या महानुभवांच्या नित्यपाठात असतात.‘लीळाचरित्रा’चा संस्कृत अनुवाद केसोबास यांनी ‘रत्नमालास्तोत्र’ या नावाने केला आहे. महानुभाव पंथांचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी यांचा ‘लीळाचरित्र’ या ग्रंथातील उपदेश केशीराज बास यांनी ‘सिद्धांतसूत्रपाठ’ व ‘दृष्टांतपाठ’ या नावांनी इ.स. १२८५ च्या सुमारास संकलित केला. ‘दृष्टांतपाठ’ याचा प्रथम सूत्र, दृष्टांत व दार्ष्टांतिक असा रचनाक्रम आहे. दृष्टांत पाठात अनेक लोककथा गुंफल्या आहेत. ‘स्मृतिस्थळ’ हा ग्रंथ नरेंद्रबास व इतरांनी इ.स.१३१३ मध्ये लिहिला, ज्यात पंथाचे प्रथम आचार्य व पंथ प्रसारक नागदेवाचार्यांच्या चरित्राचे चित्रण केले आहे.महानुभाव पंथाचे द्वितीय आचार्य बाईदेवबास म्हणजेच भावेदेव व्यास यांनी ‘पूजावसर’ हा ग्रंथ इ.स.१२९८ मध्ये लिहिला आहे.पूजावसरला ‘नित्यदिनी लीळा’ म्हणतात, कारण त्यात श्रीचक्रधरस्वामींची समग्र दिनचर्या आली आहे. महानुभाव आचार्य मुनीव्यास यांनी ‘श्रीचक्रपाणी’, ‘स्थानपोथी’ हे ग्रंथ निर्माण केले आहेत.नागदेवाचार्यांची चुलतबहीण महदायिसा म्हणजेच महदंबा (इ.स.१२२८-इ.स.१३०३) ही मराठीतील आद्य कवयित्री आहे.तिने धवळे, मातृकी रुक्मिणीस्वयंवर, गर्भकांड ओव्या इत्यादी रचना निर्माण केल्या आहेत.महानुभाव पंडित व वैय्याकरणी भीष्माचार्य यांनी मराठीतील पहिले व्याकरण ‘पंचवार्तिक’ या नावाने लिहिले आहे.हयग्रीवाचार्य यांनी भागवताच्या दशमस्कंदावर ‘गद्यराज’ हे निर्यमक श्लोकबद्ध काव्य लिहिले.गुर्जर शिवबासाने चक्रधरोक्त सुत्रांवर ‘लक्षणस्थळ’, ‘विचारस्थळ’, ‘आचारस्थळ’ हे ग्रंथ लिहिले.महानुभाव संप्रदायाच्या प्रारंभीच्या कालखंडात महाकाव्यसदृश्य ग्रंथरचना झाली, तर नंतरच्या काळात चौपद्या, धुवे, स्तोत्रे, आरत्या, धवळे, पदे अश्या

स्फुटरचना लिहिल्या गेल्या.महानुभावांचे बहुतांश गद्यग्रंथ संकल्पनात्मक स्वरूपाचे आहेत.

**समारोप**

श्री चक्रधरस्वामींनी स्वतंत्र प्रज्ञेने प्रेरित होऊन उपदेशिलेले परतत्त्वदर्शन वैशिष्ट्यपूर्ण आहे, यात शंका नाही. परंतु एक धार्मिक संप्रदाय म्हणून महाराष्ट्रात समाजावर प्रभाव पाडण्यात त्याला अल्प यश आले किंवा अपयशच आले. याचे एक महत्त्वाचे कारण अगदी उघड आहे. सामाजिक संस्था किंवा व्यवहारसंस्था टिकविण्याकरिता आवश्यक असे उच्च धार्मिक अधिष्ठान या संप्रदायाने सांगितले नाही.सूत्रभाष्य, अर्थनिर्णयनशास्त्र, व्याकरणशास्त्र, साहित्यशास्त्र निर्माण करून मराठीची उपासना, जोपासना करण्याचे महान कार्य महानुभावांनी केले.



**महानुभाव संप्रदाय**


श्री




पंचावतार
श्री गोपाल कृष्ण
श्री दत्तात्रेय प्रभु
सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी
श्री गोविंद प्रभु
श्री चक्रपाणी प्रभु
@Hitendra

# वारकरी संप्रदाय

वारकरी म्हणजेच भागवत संप्रदाय हा महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय वैदिक हिंदू धर्मांतर्गत भक्तिसंप्रदाय आहे.वारकरी संप्रदायाला ‘माळकरी संप्रदाय असेही म्हणतात.वारकरी हा वैष्णव संप्रदाय आहे.वारकरी परंपरा कृष्णोपासक, तशीच रामोपासकसुद्धा आहे. वारकरी संतांनी कर्मकांडावर टिका केली, तसेच बहुजनांना भक्तीचा सोपा, सुलभ मार्ग दाखविला.नियमितपणे वारी करणारा तो ‘वारकरी’ होय. ‘वारी’ या शब्दाचा कोशांतर्गत अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझार असा आहे.पंढरपूरचा विठ्ठल हा वारकरी पंथाचा आराध्य व उपास्य दैवत आहे.विठ्ठलाला विठोबा, पांडुरंग असेही म्हणतात.विठ्ठल हे विष्णूचे रूप मानले जाते.’’जय जय रामकृष्ण हरी” हा वारकरी पंथाचा मंत्रघोष आहे.

## वारकरी संप्रदायाचा परिचय

आषाढी, कार्तिकी महिन्यातील पंढरपूरची वारी ही वारकरी पंथातील महत्त्वाची परंपरा आहे.पंढरपूरची वारी आषाढी-कार्तिकी महिन्याच्या शुक्ल वा शुद्ध पक्षात असते, तर संतक्षेत्रातील वारी कृष्ण किंवा वद्य पक्षात असते.वारकरी संप्रदायात पंढरपूर हे मुख्य तीर्थक्षेत्र, चंद्रभागा नदी तीर्थ मानले जाते.आळंदी, देहू, सासवड, पैठण, त्र्यंबकेश्वर, मुक्ताईनगर, नरसी-बामणी, अरणभेंडी, मंगळवेढे, पिंपळनेर, सुदुंबरे इत्यादी वारकरी पंथातील इतर तीर्थस्थाने आहेत.संत नामदेव-ज्ञानेश्वर यांच्या पूर्वी विठ्ठल हे दैवत, आणि वारी परंपरा अस्तित्वात होती.विठ्ठल या देवतेचा उल्लेख श्रुतिस्मृतिपुराणात आढळते.विठ्ठलाला इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकापासून असाधारण महत्त्व, वैष्णव प्रतिष्ठा प्राप्त झाली.विष्णूपासून विष्णू ⟶विष्ट⟶विठ्ठल अशी विठ्ठलनामाची उत्पत्ती झाली.

“विठ्ठल हा लोकदेव, गोपजनांचा देव होता, नंतर त्याचे वैदिकीकरण झाले.” असे प्रतिपादन विदुषी दुर्गा भागवत तसेच डॉ.रा.चिं.ढेरे यांनी आपल्या ‘श्रीविठ्ठल : एक महासमन्वय’ या ग्रंथात केले आहे.संत नामदेव हे भागवत वारकरी संप्रदायाचे प्रचारक, प्रसारक असून त्यांनी भक्ती तत्त्वाचे बीजारोपण वारकरी पंथात केले आहे.संत नामदेव सुमारे ५४ वर्षे वारकरी पंथप्रसारासाठी झटले, त्यांनी पंजाबपर्यंत वारकरी-भागवत संप्रदायाचा प्रसार केला.शिखांच्या ‘गुरूग्रंथसाहिब’ या पवित्र धर्मग्रंथात संत नामदेवांची ६१ हिंदी पदे ‘नामदेव की मुखबानी’ या नावाने संग्रहित केली आहे.संत ज्ञानेश्वर यांनी वारकरी संप्रदायाला आपल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथांतून तात्विक अधिष्ठान मिळवून दिले.संत तुकाराम आणि इतर अठरापगड जातीतील संतांनी अभंगांद्वारे वारकरी परंपरेला समृद्ध केले.वारकरी संप्रदायात समृद्ध अशी संतपरंपरा दिसते.भागवत धर्मप्रसारक, आद्य कीर्तनकार, संतशिरोमणी संत नामदेव यांनी “नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥”अशी भूमिका स्वीकारून वारकरी संप्रदायाचा विस्तार केला.उत्तम चारित्र्य, धर्मनिष्ठा, भूतदया, सदाचार, नीती या तत्त्वांना वारकरी आचारधर्मात फार महत्त्व आहे.

“संतकृपा झाली। इमारत फळा आली॥१॥
ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया॥२॥
नामा तयाचा किंकर। तेणें रचिलें तें आवार॥३॥
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत॥४॥
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश॥५॥
बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केलें वोजा॥६॥”

या अभंगात तुकारामशिष्या संत बहिणाबाई पाठक-सिऊरकर या संतकवयित्रीने मध्ययुगीन काळातच वारकरी पंथाचा इतिहास काव्यबद्ध केला आहे.नाथ, दत्त आणि चैतन्य संप्रदायांच्या प्रवाहांचा संगम होऊन वारकरी संप्रदायाची इमारत

निर्माण झाली. नाथ संप्रदाय संत ज्ञानेश्वरांच्या, दत्त संप्रदाय संत एकनाथांच्या, तर चैतन्य संप्रदाय संत तुकाराम महाराजांच्या माध्यमातून वारकरी विचारधारेत आला. परंतु वारकरी संप्रदायाचा उगम नक्की कधी झाला?, हे निर्विवादपणे सांगता येत नाही.

## वारकरी संत परंपरा

प्रदीर्घ संतपरंपरा हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख वैशिष्ट्य आहे.संत ज्ञानेश्वर हे वारकरी पंथाचे मुख्य आचार्य आहेत.वारकरी पंथात अठरापगड जातीतील स्त्री-पुरुष संत परंपरा निर्माण झाली.इसवी सनाच्या तेराव्या शतकात संत नामदेव-ज्ञानेश्वर यांच्या प्रभावातून गोरोबा कुंभार, सावता माळी, जनाबाई, कान्होपात्रा, चोखामेळा, सोयराबाई, निर्मळा, बंका, कर्ममेळा, जोगा परमानंद, सेना न्हावी, नरहरी सोनार, परिसा भागवत, विसोबा खेचर राजाई, गोणाई, साखराई, लाडाई इ. विविध जातींतून संत निर्माण झाले. सतराव्या शतकात संत तुकाराम यांच्या प्रभावातून निळोबा पिंपळनेरकर, कचेश्वर ब्रह्मे, कान्होबा, बहिणाबाई, संताजी तेली जगनाडे, भागुबाई, गवरशेठ वाणी, नावजी माळी, शिवबा कासार, रामेश्वरभट्ट वाघोलीकर, गंगाधरपंत मवाळ, निळोबा पिंपळनेरकर, कचेश्वर ब्रह्मे महिपती इ.संतप्रभावळ निर्माण झाली.या संतांनी कमी-अधिक काव्यसृजन केलेले दिसते.

## वारकरी संप्रदायाची कीर्तनपरंपरा

वारकरी कीर्तन परंपरा संत नामदेवांनी सुरू केली असून, ती हरदासी कीर्तनापेक्षा वेगळी आहे.वारकरी कीर्तन परंपरेत गाण्यापेक्षा भजनावार भर असतो.वारकरी कीर्तनाचे स्वरूप आधुनिक काळात विष्णुबुवा जोग यांनी बदलले, त्यांनी कीर्तनात पूर्वरंग, उत्तररंग असे दोन भाग केले.मंदिरात जाऊन विठ्ठल दर्शन घेतल्यानंतर देवाला पाठ न दाखविता भजन करीत मागेमागे जाऊन चंद्रभागेच्या

वाळवंटात यायचे आणि मग कीर्तनास आरंभ करायचा, ही जुनी पद्धत होती. वारकरी कीर्तनात निरूपण असल्यामुळे त्या कीर्तनास कीर्तन म्हणण्याऐवजी निरूपण म्हणण्याची पद्धत वारकरी संप्रदायात आहे. वारकरी कीर्तनात उत्तररंगात निरूपणाच्या अभंगाचे सखोल आणि सविस्तर विवेचन केले जाते. नारदीय कीर्तनातील उत्तररंगात आख्यान लावण्याची पद्धत आहे, तशी ती वारकरी संप्रदायाच्या कीर्तनात नाही.सोनोपंत दांडेकर, धुंडामहाराज देगलूरकर आणि बाबामहाराज सातारकर हे थोर वारकरी कीर्तनकारांपैकी काही होत.आधुनिक काळातील वारकरी कीर्तनकारांनी प्रवचन, कीर्तन, ग्रंथप्रकाशन या मार्गाने पंथसेवा केली आहे.

**वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान**

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर व वारकरी पंथ प्राचीन आहे, परंतु संत ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाला तत्त्वज्ञानाचा पाया, आध्यात्मिक मानवतावादाचे अधिष्ठान दिले. वारकरी परंपरा अद्वैती मानणारा असून 'चिद्विलासवाद' हे वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे.वारकरी भक्तिपंथ असून भक्ती हा वारकरी दर्शनात पाचवा व परम पुरुषार्थ मानला जातो.

**वारकरी संप्रदायाचे कार्य**

महाराष्ट्रात मराठी लोकभाषेत बहुजनांना जागृत करण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले. महाराष्ट्रीय समाजात आध्यात्मिक समता प्रस्थापित करण्याचे कार्य वारकरी संतांनी केले.'मोक्षिकाधिष्ठित लोकोद्धार' या तत्त्वावर वारकरी पंथीय कार्य आधारित आहे. 'लोकभिमुखता'हे वारकरी पंथाच्या कार्याचे मुख्य वैशिष्ट्य आहे.इसवी सनाच्या सतराव्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांचे 'हिंदवी स्वराज्य' निर्माण करण्याचे कार्य साकार होण्यामागे वारकरी संतांचे अमूल्य योगदान

आहे.संत तुकारामांच्या 'पाईकीचे अभंगा'मुळे महाराष्ट्रीय समाजात धर्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, स्वामीनिष्ठा जागृत झाली, त्याचे साहाय्य छत्रपती शिवरायांना स्वराज्यस्थापनेत झाली.

## वारकरी संप्रदायाचे वाङ्मय

वारकरी पंथाची 'मराठी' ही धर्मभाषा असून, संतवाङ्मय मराठी लोकभाषेतून आविष्कृत झाले आहे. गीता, भागवत पुराण, ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरकृत हरिपाठ, एकनाथ भागवत, चतुःश्लोकी भागवत, एकनाथकृत हरिपाठ, तुकारामांची अभंगगाथा इत्यादी ग्रंथ वारकरी संप्रदायात प्रमाण मानले जातात.ज्ञानेश्वरी, एकनाथ भागवत, तुकोबांची अभंगगाथा हे ग्रंथ वारकरी संप्रदायातील प्रस्थान त्रयी मानले जातात.संतांनी आपले काव्य 'अभंग' या अस्सल मराठी छंदप्रकारात व्यवसायनिष्ठ भाषेत लिहिले.वारकरी संताच्या काव्याची भाषा मराठमोळी बोली आहे.संत काव्यात संतांनी व्यवसायनिष्ठ पारिभाषिक शब्द वापरले आहेत.

संत नामदेवांचे तीन हजार अभंग आज उपलब्ध आहेत.हे अभंग विठ्ठलवर्णनपर, संतचरित्रपर,वारकरी पंथीय आचारधर्म सांगणारे, नामस्मरण, भक्तिपर असे आहेत.संत ज्ञानेश्वरांनी रचलेली ज्ञानेश्वरी हे प्रसिद्ध गीतभाष्य वारकरी संप्रदायाचा आधारभूत, तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहे.भावार्थदीपिका, ज्ञानदेवी, देशिकार लेणे ही या ग्रंथाची अन्य नावे आहेत.अनुभवामृत म्हणजेच अमृतानुभव हा ज्ञानदेवांचा ग्रंथ वेदान्त दर्शनावरील ग्रंथ आहे.चांगदेव पासष्टी हा ज्ञानदेवांचा परमात्मा एकच असल्याचे प्रतिपादन करणारा लघुकाव्य ग्रंथ आहे.आज संत ज्ञानेश्वरांचे ७६५ अभंग उपलब्ध आहेत.ज्ञानेश्वरकृत 'हरिपाठ' हे २४ अभंगांचे संकलन वारकरी नित्यपाठात समाविष्ट असतात.संत एकनाथांनी खडतर बहामनी काळात वारकरी पंथपरंपरा अबाधित राखण्याचे महत्कार्य केले.त्यांनी काव्यग्रंथ, स्फुट काव्य, भारुडे, गौळणी, आरत्या असे विपुल, गुणवत्तापूर्ण सकस वाङ्मय निर्माण

केले.संत एकनाथांनी अभिजन आणि बहुजन दोन्हींच्या अभिरुची लक्षात घेऊन वाङ्मय सर्जन केले आहे.संत तुकारामांनी अस्सल लोकभाषेत साडेचार हजार अभंग निर्मिले आहेत, ते मराठीतील 'महाकवी' मानले जातात.

**संत काव्याची वैशिष्ट्ये**

वारकरी परंपरेत प्रामुख्याने पद्यात्मक साहित्यच प्रसवले गेले आहे.वारकरी परंपरेतील संतकाव्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील;

१. वारकरी संत काव्य अद्वैतविचारपर, चिद्विलासवादी तत्त्व मांडणारे काव्य आहे.
२. वारकरी संत काव्यात सामाजिक समतेचा पुरस्कार केलेला दिसून येतो.
३. वारकरी संत काव्य भक्तीपर, स्वधर्म आचरणावर भर देणारे आहे.
४. वारकरी संत काव्य अस्सल मराठमोळ्या बोलीभाषेत, व्यवसायनिष्ठ भाषेत आविष्कृत झाले आहे.
५. वारकरी संत काव्यातील अनुभव, आशय प्रामाणिक, विरक्तीपर असा आहे.
६. वारकरी संत काव्यात उत्कट भावच्छटा, भक्तिरसाला प्राधान्य आढळते.
७. वारकरी संत काव्य सहजस्फूर्त, स्वाभाविक, चैतन्यदायी आहे.
८. वारकरी संत काव्य तत्त्वचिंतनात्मक, संतांच्या आत्मानुभवावर आधारित आहे.
९. वारकरी संतांनी काव्यनिर्मिती विठ्ठल उपासनेचा एक भाग म्हणून आत्मिक उन्नतीसाठी केली असून, त्या काव्यात गुढवाद दृगोचर होतो.

**वारकरी संप्रदायाची लोकप्रियता**

वारकरी पंथ हा महाराष्ट्रातील सर्वात जास्त लोकप्रिय पंथ आहे, याची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील;

१. वारकरी संतांचे सर्वसामान्यांबरोबर अत्यंत जिव्हाळ्याचे नाते होते.वारकरी संत सर्व स्तरांतील, जातींतील होते.
२. वारकरी परंपरेत सरळमार्गी आचारधर्म सांगितला आहे.वारकरी आचारधर्मात कर्मकांडाला थारा नाही.
३. वारकरी हा प्रवृत्तीपर भक्तिमार्ग आहे.वारकरी परंपरेत भक्तीबरोबर ज्ञानाला महत्त्व आहे.
४. वारकरी परंपरेने प्रपंच-परमार्थ यांच्यात समन्वय साधलेला आहे.
५. वारकरी संतांची, अनुयायांची वृत्ती सर्वसंग्राहक आहे.
६. विठ्ठल हे दैवत वैदिक-अवैदिक, आर्य-अनार्य, अभिजन-बहुजन, हिंदू, जैन, बौद्ध यांच्यातील महासमन्वयाचे प्रतीक आहे.
७. वारकरी पंथांच्या प्रवक्त्यांमध्ये विचार-भावनेची श्रीमंती, त्याग, निष्ठा, सहिष्णुता, औदार्य हे गुण आढळून येतात.उदा. “तुका म्हणे तोचि संत। सोशी जगाचे आघात ॥”
८. वारकरी संतमंडळींना राजाश्रयाची आस नव्हती, सामान्य माणूस हाच वारकरी परंपरेचा कायम आधार राहिलेला आहे.
९. वारकरी पंथात भिक्षावृत्ती, अंधश्रद्धा, अज्ञान, जातिभेद यांना विरोध केलेला असून, देशीभाषा, श्रोत्यांबाबत आदरभाव व्यक्त केला आहे.उदा. ज्ञानेश्वरीतील श्रोतृसंवाद.

**समारोप**

थोडक्यात वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनावर खोलवर परिणाम केला आहे. या संप्रदायाने महाराष्ट्रीय जनतेला दिलेला समानतेचा आणि जिव्हाळ्याचा संदेश आजही प्रासंगिक आहे.या संप्रदायाचा

आचारधर्म भक्ती आणि साधेपणा यांवर आधारित असून, तो समाजाला पोषक ठरतो.

## वारकरी संप्रदाय








# शाक्त संप्रदाय

शाक्त हा हिंदू धर्मांतर्गत प्रमुख संप्रदाय आहे, जो देवी म्हणजेच शक्तीच्या उपासनेवर आधारित आहे.शाक्त पंथ हा शैव पंथाचा एक भाग मानला जातो.शाक्त पंथ म्हणजेच शक्तीवाद हा हिंदू धर्मातील तिसरा मोठा संप्रदाय मानला जातो.आज भारतात ३०.५ कोटी लोक शाक्त पंथीय आहेत.शाक्त संप्रदायाला 'शक्ती संप्रदाय' असेही संबोधले जाते.शाक्त संप्रदायात देवी(शक्ती) हीच परमदेवता मानली जाते व शक्तीच्या उपासनेवर लक्ष केंद्रित केले जाते.शाक्त पंथात देवी म्हणजेच शक्ती उपासना केली जाते. शाक्त पंथात संहारक व निर्माणकर्त्या देवीला म्हणजेच शक्तीला सर्वोच्च स्थान आहे.शक्ती पंथाच्या साधकांना 'शाक्त' असे म्हणतात.दुर्गा पूजा, नवरात्र हे उत्सव शाक्त परंपरेतील प्रमुख उत्सव आहेत.शाक्तांची देवीपूजा भोग आणि मोक्ष या दोन्हीसाठी असते. शाक्त पंथात उपासनेच्या दोन परंपरा दिसतात, साममार्गी म्हणजे सात्त्विक उपासना किंवा पूजा आणि वाममार्गी म्हणजे मंत्र, तंत्राचा वापर करून केलेली उपासना किंवा पूजा.साममार्गी साधक देवीची सात्त्विक पद्धतीने वैदिक मंत्रांच्या आधारे पूजा करतात.वाममार्गी साधक देवीची मंत्र, तंत्र तसेच मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा, मैथुन या पंचमकाराद्वारे उपासना करतात.शाक्त पंथात ज्ञान व कला याची देवी म्हणजे सरस्वती, संपत्ती व समृद्धी यांची देवी म्हणजे लक्ष्मी, सौंदर्य व कृपेची देवी त्रिपुर सुंदरी मानली जाते.

शाक्त तंत्रे शिवाच्या ऊर्ध्व मुखातून प्रसृत झाली, म्हणून त्यांना 'ऊर्ध्वम्नाय' असे समजले जाते.शाक्त पंथातील तांत्रिक उपासनेचे ध्येय भोग व मोक्ष आहे.भोग म्हणजे संभोग याच अर्थाने शाक्त तंत्रात हा शब्द वापरला जातो. शाक्त पंथात तांत्रिक उपासनेला 'कुलाचार किंवा वामाचार' असे म्हणतात. शाक्त पंथ हा जरी शैव पंथाचा

एक भाग मानला गेला असला, तरी शैव हा शिवप्रधान आणि शाक्त हा शक्तीप्रधान संप्रदाय आहेत. शाक्त पंथातील शिव-पार्वती संवादात्मक ग्रंथात शिव प्रश्न विचारतो, तर शक्ती त्याची उत्तरे देते अशी रचना आढळते.

**शाक्त संप्रदाय : इतिहास व तत्त्वदर्शन**

भारतात पाषाणयुगीन काळात देवी उपासनेचे पुरावे आढळतात.शिव आणि शक्तीची उपासना सिंधू संस्कृतीइतकीच जुनी आहे. ऋग्वेदातील उषा, अदिती आणि सरस्वती यांसारख्या देवतांच्या कल्पनांचा विकास होऊन शाक्त पंथात देवीला 'आदिशक्ती' मानले जाते.हडप्पा येथे सापडलेल्या देवी प्रतिमा इ.स.पूर्व ३००० वर्षापूर्वीच्या आहेत.सप्तमातृका हे शाक्त परंपरेचे पूर्वरूप आहे.यक्षिणी देवीचा उल्लेख इ.स.पूर्व दुसऱ्या-तिसऱ्या शतकातील केन उपनिषदात आहे. महाभारतात शैव व शाक्त पंथांचे अस्तित्त्व आढळते. इलांगो आदिगल याच्या 'शिलप्पादिकारम' या इसवी सनाच्या पहिल्या शतकातील पहिल्या तमिळ महाकाव्यात स्त्री पंथाचे उल्लेख आहे.मथुरा आणि बंगालमधील पुरातत्वीय पुराव्यांवरून असे सूचित होते की, दैवी स्त्रीत्वाची संकल्पना इ.स.च्या दुसऱ्या  शतकात अस्तित्वात होती.आद्य नवनाथ  व नाथयोगी मत्स्येंद्रनाथ हे नाथ परंपरेबरोबरच कौलमार्गाचे देखील प्रवर्तक मानले जातात.कौलमार्ग हा शाक्त पंथातील एक उपसंप्रदाय आहे.कुब्जिकामत, कुब्जिकोपनिषद, चिद्गगनचंद्रिका हे शाक्त परंपरेचे आधारभूत ग्रंथ आहेत.शाक्त पंथात काली आणि त्रिपुरा या देवींचे उपसंप्रदाय आहेत.

भारतातील प्राचीन सांख्य दर्शनात उद्धृत 'प्रकृती' ही स्त्री स्वरूपीच आहे.गुप्त काळात शाक्त पंथीय तत्त्वज्ञानाचा पूर्णपणे विकास झाल्याचे आढळतो.शाक्त पंथ शक्ती आणि शक्तिमान यांची एकात्मता म्हणजेच अद्वैत मानतो. शक्तागमांमध्ये  सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या व भासा या पराशक्ती मानल्या गेल्या

आहेत. 'नित्या', 'त्रिक', 'क्रम' आणि 'कुल' या संज्ञांचा संबंध मुख्यत्वे शाक्त पंथातील देवीच्या उपासनेशी आहे, जिथे यांचा वापर देवीच्या विविध रूपांचा, शक्तींचा किंवा तिच्या पंथांच्या पद्धतींचा उल्लेख करण्यासाठी होतो. 'नित्या' म्हणजे 'नित्या शक्ती', 'त्रिक' म्हणजे त्रिकाल सत्य, 'क्रम' म्हणजे क्रमवार पद्धत आणि 'कुल' म्हणजे एक प्रकारचा शाक्त मार्ग किंवा पंथ आहे, असे मानले जाते.शाक्त दर्शन हे अद्वैत दर्शन होय, त्यामध्ये शक्ती ही परमशक्ती मानली जाते.शिवादी तातत्वनची निर्मिती भगवती अंबेपासून झाली, असे शाक्त परंपरेत मानतात. “विश्व हे मूलतः शक्तीमध्ये आस्थित असून, ती शक्ती विश्वाला बाह्य स्वरूपात प्रकट करते.” हा शाक्त सिद्धांत ‘शक्तिपारम्यवाद’ आहे.पुढील काळात शैव व शाक्त दर्शन एकत्र येऊन “शांभव दर्शन’ निर्माण झाले.शांभव दर्शनात शिव व शक्ती यांमध्ये समानता दिसते.

क्रम संप्रदाय : क्रम संप्रदाय हा शाक्त काश्मिरी संप्रदाय आहे.हा संप्रदाय शक्तिपारम्यवादाचा पुरस्कर्ता पंथ आहे. सृष्टी, स्थिती, संहार, अनाख्या असा चार तत्त्वांचा क्रम मानणारा संप्रदाय असल्याने त्यास ‘क्रम संप्रदाय’ म्हटले जाते.या पंथातील काही प्रसिद्ध आचार्य ‘भासा’हे तत्त्वही महत्त्वाचे मानतात.महेश्वरानंद विरचित ‘महार्थमंजिरी’ व या ग्रंथावरील टीका ‘परिमल टीका’ हे ग्रंथ क्रमदर्शनाचे विवेचन करणारे ग्रंथ आहेत.

त्रिपुरा संप्रदाय : त्रिपुरा संप्रदायामध्ये क्रम संप्रदाय व कौल संप्रदाय यांचे अनुकरण आढळते.तीन शक्ती, तीन चक्रे, तीन धाम, तीन तत्त्वे या तीन पदार्थांची जननी त्रिपुरा मानली जाते. शिव, शक्ती, नर या तीन स्वरूपाचे विवेचन असल्याने या संप्रदायास ‘त्रिक दर्शन’ म्हणतात.या संप्रदायाचा प्रसार काश्मीरमध्ये राजा अनंतवर्मन (इ.स.८५५ ते ८८३) याच्या काळात झाले.नंतरच्या कालखंडात त्रिपुर दर्शनाचा प्रसार बंगाल व केरळमध्ये झाला.

त्रिपुर संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाला ‘वामकेश्वर दर्शन’ म्हणतात.या दर्शनात ‘संविच्छत्ती’ हे परमतत्त्व मानले जाते, या तत्त्वातूनच शिव व शक्ती निर्माण झाली.

हिला ‘महात्रिपुरसुंदरी’ म्हणतात.महात्रिपुरसुंदरीच्या उपासनेचे अंतर्याग व बहिर्याग हे दोन भाग आहेत, यातून साधकाला भोग आणि मोक्ष प्राप्त होतो. ‘नित्याषोडशशिकार्णव’(वामकेश्वर तंत्र) हा त्रिपुरा संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ आहे.आदिशंकराचार्य यांनी ‘सौंदर्यलहरी’या प्रसिद्ध स्तोत्रात या संप्रदायाचे विवेचन केले आहे.त्रिपुरसुंदरी ही परमोच्च शक्तीचेच रूप मानले जाते.ही परमोच्च शक्ती सुंदर युवतीच्या रूपात प्रकट होते, त्यामुळे या संप्रदायास ‘सौभाग्य संप्रदाय’ असेही म्हणतात. त्रिपुर संप्रदाय या संप्रदायात श्रीचक्र आणि श्रीयंत्र यांची उपासना महत्त्वाची अंगे मानली गेली आहेत.अमृतानंद, शिवानंद, लक्ष्मीधर, भास्करराव या आचार्यांनी ‘नित्याषोडशशिकार्णव’(वामकेश्वर तंत्र), योगिनीहृदय या ग्रंथातून या संप्रदायाचे विस्तृत विवेचन केले आहे.शाक्त पंथीय ग्रंथ संस्कृतप्रमाणेच बंगाली, मैथिली, राजस्थानी, ब्रज, हिंदी, पंजाबी या भाषांमध्ये रचले गेले आहेत.चंडीमंगल, कालीमंगल इत्यादी गीते व स्तोत्रे या लोकभाषांतून रचली गेली आहेत.बंगालमधील दक्षिणेश्वरी काली मंदिरातील पुजारी रामकृष्ण परमहंस यांनी नवशाक्त पंथाचे सार प्रकट केलेले दिसते.

## शाक्त संप्रदायाचे वाङ्मय

शाक्त पंथात देवी माहात्म्य, देवी भागवत पुराण, कालिका पुराण, देवी उपनिषदे हे महत्त्वाचे ग्रंथ मानले जातात.ऋग्वेदातील श्रीसूक्त हे लक्ष्मीचा, तर वाक् सूक्त हे सरस्वतीचा निर्देश करते. ऋग्वेदातील देवी सूक्त किंवा अम्भ्राणी सूक्त हे आठ श्लोकांचे काव्य वाक्(वाणी) देवीला समर्पित आहे.वैदिक वाङ्मयात उषा, वाच, सरस्वती(नदी), पृथ्वी, निऋति(संहारक), अदिती, श्रद्धा या देवींचा उल्लेख आहे.देवी उपनिषद, शाक्त उपनिषदे हा शाक्त परंपरेतील लघु उपनिषदे समूह आहे.शाक्त उपनिषदांमध्ये सीता उपनिषद, त्रिपुरातापिणी उपनिषद, देवी उपनिषद, त्रिपुरा उपनिषद, भावना उपनिषद, सौभाग्यलक्ष्मी उपनिषद, सरस्वतीरहस्य उपनिषद व बहुचर्च उपनिषद ही समाविष्ट आहेत.

देवी माहात्म्य हे इ.स.दहाव्या-अकराव्या शतकात रचले गेले, या ग्रंथाला 'दुर्गासप्तशती', 'देवी माहात्म्यम्', 'शत चंडी' 'चंडी पाठ' अशी देखील नावे आहेत.हे ७०० श्लोकांचे स्तोत्र असून, यात महादेवीचे वर्णन आहे.देवी माहात्म्य हे स्तोत्र मार्कंडेय पुराणाचा एक भाग आहे.देवी भागवत पुराण १८००० श्लोकांचे पुराण असून, त्याचे रचनाकार वेदव्यास मेल जातात. देवी भागवत पुराणात ३१८ अध्याय असलेले बारा सर्ग आहेत.हे पुराण इसवी सनाच्या नवव्या ते चौदाव्या शतकाच्या दरम्यान निर्माण झाले आहे.कालिका पुराण हे आसाममध्ये रचले गेले.कालिका पुराण हा इसवी सनाच्या अकराव्या किंवा बाराव्या शतकातील ग्रंथ असावा, असा अंदाज अभ्यासकांनी केला आहे.या ग्रंथाचे श्रेय मार्कंडेय ऋषींना दिले जाते.

ललिता सहस्त्रनाम हे ब्रह्मांड पुराणांचा भाग असलेले संस्कृत स्तोत्र दक्षिण भारतात इसवी सनाच्या नवव्या ते अकराव्या शतकात हयग्रीवाने रचले आहे, हे स्तोत्र त्रिपुरसुंदरी वर्णनपर , स्तुतीपर केली आहे.इसवी सनाच्या अकराव्या शतकातील 'देवीगीता' हा देवीभक्तिपर पहिला शाक्तपंथीय ग्रंथ मानला जातो. 'महानिर्वाण तंत्र' हा अठराव्या शतकातील शाक्त पंथीय तांत्रिक ग्रंथ आहे.

"या देवी सर्वभूतेषु विद्या रूपेण संस्थिता" हा श्लोक देवी दुर्गेच्या विविध रूपांचे वर्णन करतो. या श्लोकात देवीला विद्या, बुद्धी, शक्ती, स्मृती, दया, तुष्टी अशा विविध गुणांच्या रूपात वंदन केले आहे.हा श्लोक मार्कंडेय पुराणातील आहे

**शाक्त संप्रदायाचे मराठी वाङ्मय**

कालिकापुराण या ओवीवृत्तात्मक मराठी ग्रंथाचा कर्ता शारंगधर हा असून, या ग्रंथात एकूण ३१ अध्याय आणि १७३४ ओव्या आहेत. सदर ग्रंथात सोमवंशाचे वर्णन करून कालिका माहात्म्य वर्णन केले आहे. कासार समाजाची उत्पत्ती देणारा हा ग्रंथ आहे.या ग्रंथाच्या प्रारंभी शारंगधर सांगतो की, "हा ग्रंथ संस्कृत

पद्मपुराणातील उत्तरखंडातील कालिकामाहात्म्यावरून लिहिला आहे.” या ग्रंथाचे मराठी लेखन करण्यामागचा उद्देश तो पुढीलप्रमाणे स्पष्ट करतो:

“या संस्कृताच्या आगरी||ग्रंथी मऱ्हाठी अर्थु भरी||कथा प्रगट करी||दावी श्रोतयाते||हे संस्कृताची पेटी||उघडुनिया प्राकृतीं करी दृष्टी||कथा बोलेन मऱ्हाटी||हरिकिर्तीची||”

या ओव्या दर्शवतात की, शारंगधराने संस्कृतातील ‘कालिकामाहात्म्य’ मराठीत सुलभपणे सादर करून सामान्य लोकांना समजावे, हा उद्देश ठेवला आहे. ‘कालिकापुराण’ हा ग्रंथ मराठी भाषेच्या प्राचीनतेचा आणि साहित्यिक समृद्धीचा एक महत्त्वाचा पुरावा आहे. शारंगधराने इ.स. १२४७ -१२६० च्या सुमारास लिहिलेला हा ग्रंथ यादवकालीन मराठी भाषेचे वैशिष्ट्य दर्शवतो. सोमवंशाचे वर्णन, कालिका माहात्म्य, आणि कासार समाजाची उत्पत्ती यांचे वर्णन करणारा हा ग्रंथ मराठी साहित्याच्या इतिहासात मोलाची भर घालतो. देवगिरीच्या यादव राजांची वंशावळ आणि विठ्ठलाची स्तुती यामुळे हा ग्रंथ सांस्कृतिक आणि ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

मराठी साहित्यात शाक्त पंथावर थेट आणि विस्तृत अशी स्वतंत्र साहित्य निर्मिती कमी असली तरी, शाक्त पंथाचा प्रभाव आणि विचार तंत्रागम साहित्य, देवी माहात्म्य आणि काही मध्ययुगीन व आधुनिक काळातील विविध साहित्य प्रकारांमध्ये आढळतो.शाक्त पंथाची मूळ तत्त्वे, जसे की शक्तीची उपासना, देवीचे महत्त्व आणि अद्वैतता, ही मराठी साहित्यिकांच्या लेखनातून वेळोवेळी व्यक्त झाली आहेत.

## शाक्त पंथाचा मराठी साहित्यातील प्रभाव:

शाक्त पंथाशी संबंधित अगणित ग्रंथ तमिळनाडूसारख्या दक्षिणेकडील भागांमध्ये रचले गेले आहेत. यातील अनेक ग्रंथ संस्कृतमध्ये आहेत आणि त्यांचा

मराठी साहित्यावर अप्रत्यक्ष प्रभाव दिसून येतो.शाक्त पंथातील नवदुर्गा आणि महाविद्या यांसारख्या संकल्पना मध्ययुगीन मराठी संत साहित्यात अनेकदा आढळतात.

संतांनी हरिहर ऐक्याची कल्पना मांडली असली, तरी काही संत विचारांमध्ये शक्ती आणि स्त्री-शक्तीच्या उपासनेचा अंश दिसतो, जो शाक्त पंथाशी संबंधित आहे. दत्त सांप्रदायिक व रेणुकाभक्त संत विष्णुदास(कृष्णा रावजी धांदरफळे) यांनी 'माझी रेणुका माउली' या भजनाची रचना केली, ज्यात त्यांनी रेणुका मातेचे ‘अनाथांची माय’ म्हणून वर्णन केले आहे.त्यांच्या भजनाने रेणुका मातेच्या कनवाळू आणि वात्सल्यपूर्ण स्वभावाला अधोरेखित केले आहे.

“दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी” या देवीच्या आरतीचे कवी तेलंगणातील नरहर मालुकवी हे आहेत. ही एक अत्यंत लोकप्रिय मराठी आरती असून, ती जगदंबेची स्तुती करते आणि तिच्याशिवाय संसारिक जीवनातून तरणे कठीण असल्याचे नमूद करते.

**समारोप**

थोडक्यात शाक्त हा हिंदू धर्मांतर्गत प्रमुख स्त्री देवतांची उपासना संप्रदाय आहे.‘शाक्त’ म्हणजे शक्तीचे उपासक होय.शाक्त पंथ हा शैव पंथाचा एक भाग मानला जातो.शक्तीवाद हा हिंदू धर्मातील तिसरा मोठा संप्रदाय मानला जातो.शाक्त अनुयायांनी संस्कृत, प्राकृत, देशी लोकभाषांतून विपुल, समृद्ध वाङ्मय रचना केली आहे.

# शाक्त संप्रदाय







# गाणपत्य संप्रदाय

गाणपत्य संप्रदाय हा हिंदू धर्मातील एक प्रमुख संप्रदाय आहे, ज्या संप्रदायात गणपतीला सर्वोच्च उपास्य दैवत मानून त्याची पूजा केली जाते. त्या संप्रदायाच्या अनुयायांना 'गाणपत्य' म्हणतात. या संप्रदायात गणपतीला परब्रह्म, परमात्मा मानले जाते, जो सर्व सृष्टीचा निर्माता, रक्षणकर्ता आणि संहारकर्ता आहे.गाणपत्य संप्रदायात सर्व देवांची उत्पत्ती गणपतीपासून मानलेली आहे. हिंदू धर्मातील पाच प्रमुख संप्रदायांमध्ये 'गाणपत्य संप्रदायचा समावेश केला जातो.गाणपत्य संप्रदायात गुप्त व प्रगट दोन्हीही स्वरूपात गणेश उपासना केली जात असे.गाणपत्य संप्रदायात गणपती शिवाचा प्रतिस्पर्धी व इतर सर्व देवांहून श्रेष्ठ मानला जातो.जैन, बौद्धांत सुद्धा गणेश उपासना केली जाते.भारताबाहेरील पूर्वेकडील देशांत गणेश उपासना दिसते.केरळमधील गणेश मंदिरांना 'होमपुरे'म्हणतात, या मंदिरांत नित्य होम होतो.महाराष्ट्रातील अष्टविनायक स्थाने गाणपत्य पंथीयांमध्ये महत्त्वाची मानली जातात.

## गणपती देवतेची उत्पत्ती

आदि शंकराचार्य यांनी गणपतीला पाच प्रमुख देवतांमध्ये स्थान दिले आहे.शिवापासून गणपतीची उत्पत्ती झाली असल्याचे देवोत्पत्तीशास्त्रात (थिऑगॉनी) उल्लेख आहे.तंत्रमार्गात गणपतीची उत्पत्ती विविध फलप्राप्तीच्या यंत्र-मंत्रापासून झाली असल्याचे म्हटले आहे.गणपतीच्या शक्तिदेवतेला 'श्रीअंगीनी' या नावाने संबोधले जाते.उभे, बसलेल्या अवस्थेतील, नृत्यावस्थेतील, एकमुखी, पंचमुखी, द्विभुज ते दशभुज, द्विनेत्र वा त्रिनेत्र शक्तीसमवेत, गणपतीपरिवारासमवेत अशा विविध प्रकारच्या मूर्ती सापडलेल्या आहेत.गणपती अनार्य लोकांचा देव नंतर आर्यांनी स्वीकारला.मनुस्मृतीत 'गणपती' शुद्रांचा देव आहे, असा उल्लेख

आहे.गाणपत्यांना वैदिक ब्राह्मणांमध्ये मानाचे स्थान नव्हते, असे उल्लेख मिळतात.गुप्तकाळात गणेश देवता लोकप्रिय झाल्याचे आढळते.गणपतीला 'विघ्नहर्ता' व नशीब आणणारा देव मानले जाते.कला-विज्ञान संरक्षक, बुद्धी व शहाणपणाचा देव असे गणपतीचे वर्णन केले जाते.गणपतीचा प्राचीनतम उल्लेख ऋग्वेदात आढळतो.ऋग्वेदातील दोन ऋक् मंत्र "गणानां त्वा गणपति हवामहे" व "विषु सदा गणपते" हे वैदिक गणपतीचा निर्देश करतात.ऋग्वेदात गणपतीला 'ब्रह्मणस्पति', 'वाचस्पति' असे म्हटले आहे.गणपतीचं वर्ण ज्योतिर्मय म्हणजेच लालसर सोनेरी वर्ण असून, त्याच्या हातात अंकुश, कुऱ्हाड ही अस्त्रे आहेत असे प्राचीन वर्णन आढळते.पुराणात गणपतीला 'शिवहर', 'पार्वतीपुत्र' या नावाने उल्लेखिलेले आहे.अनार्य लोकांच्या हस्तिदेवता, लंबोदर यक्ष यांच्या एकत्रीकरणातून गणपती देवतेची निर्मिती झाली असावी, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे.गणपतीचे वाहन मूषक(उंदीर) हे आदिम संस्कृतीचे प्रतीक मानले जाते.गणपतीचा उल्लेख वैदिक कालखंडातील वाङ्मयात 'रुद्रगण', 'ब्रह्मणस्पति', 'वाचस्पति'म्हणून, उत्तर वैदिक कालखंडातील वाङ्मयात 'विनायक' म्हणून, पुराणांत 'विघ्नहर्ता' म्हणून उल्लेख आढळतो.वाकाटक राजवटीच्या नगरधन या राजधानीत इ.स.पाचव्या-सहाव्या शतकातील लहान गणेश मूर्ती सापडल्या आहेत.राष्ट्रकूटकालीन वेरूळ लेण्यांमध्ये गणेश प्रतिमा दिसतात.

**विनायकी – तांत्रिक गाणपत्यांची देवता**

विनायकी ही हत्तीचे डोके असलेली हिंदू देवी तांत्रिक गाणपत्यांची उपास्य देवता मानली जाते.विनायकी संदर्भात पौराणिक कथा वा मूर्तीशास्त्राची पूर्ण व्याख्या आढळत नाही.स्त्री गणेश, वैनायकी, गजानना, गणेशायनी, गजमुखी, गजस्या, विघ्नेश्वरी अशी विनायकी या स्त्री देवतेची इतर नावे आहेत.काही संस्कृती अभ्यासक विनायकीकडे चौसष्ट योगिनी किंवा मातृका म्हणून पाहतात.विद्वान कृष्णन याच्या मते "विनायकी ही हत्तीच्या डोक्याची सुरुवातीची मातृका आहे, जी गणेशाची

ब्राह्मण शक्ती, एक तांत्रिक योगिनी आणि स्वतंत्र देवी अशा तीन भिन्न स्वरूपांचे मिश्रण आहे.''जैन, बौद्ध परंपरेत विनायकी ही स्वतंत्र देवी मानली जाते.बौद्ध धर्मात विनायकीला 'गणपती हृदय' असे म्हटले आहे. 'विनायकी ही पार्वतीची मैत्रीण मालिनी असावी, जिचे डोके हत्तीसारखे होते व जीने गणपतीचा सांभाळ केला.' असे काही अभ्यासकांचे मत आहे.वनदुर्गा उपनिषदामध्ये विनायकी स्त्री देवतेचा उल्लेख आढळतो.विनायकी ही तांत्रिकांमध्ये गणपतीची शक्ति मानतात.विनायकीची शिल्प प्रतिमा पुण्याजवळील शिवाच्या भुलेश्वर मंदिरात दिसते.

**गणपतीची विविध नामे**

गणपती या दैवतेची अनेक नावे गाणपत्य संप्रदायात लोकप्रिय आहेत.गणपतीची ब्रह्मणस्पति, वाचस्पति ही वैदिक नावे आहेत.उत्तर वैदिक कालखंडातील आणि दक्षिण भारतात लोकप्रिय असलेले गणपतीचे नाव म्हणजे 'विनायक' होय.विनायक म्हणजे विशिष्ट रूपाने जो नायक (नेता) आहे तो. 'हेरंब' म्हणजे दीनजनांचा तारणकर्ता. पुराणात विघ्नहर्ता हे गणपतीचे नाव आढळते.वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, विकट, लंबोदर ही गणपतीचे देहविशेष सांगणारी नावे गणेश उपासकांमध्ये प्रसिद्ध आहेत.

**गाणपत्य संप्रदाय उत्पत्ती**

इसवी सनाचे पाचवे शतक ते नववे शतक या दरम्यान गाणपत्य संप्रदाय उदयाला आला आहे, असे रा.गो.भांडारकरांसारखे अभ्यासक मानतात.इ.स.चौथ्या शतकातील 'याज्ञवल्क्य स्मृति' या धर्मशास्त्रीय ग्रंथात महागणपतीची पूजा करण्यास सांगितली आहे.गणपतीचा याज्ञवल्क्य स्मृतित  विनायक असा अंबिकेचा पुत्र, पार्वतीपुत्र म्हणून सर्वप्रथम उल्लेख आढळतो, तसेच गणेश पूजनाचे विवरण आढळते.इसवी सनाच्या आठव्या शतकात भवभूतीच्या 'मालतीमाधव' या

नाटकात श्री गणेशाचे स्तवन दिसते.इसवी सनाच्या आठव्या-नवव्या शतकातील कोरीव लेखांत गणपती दैवताचे व गाणपत्यांचे उल्लेख आलेले दिसतात.कालिदासाचे साहित्य, पंचतंत्र, नाट्यशास्त्र या ग्रंथांत गणेश देवता दिसत नाही.बौधायन सूत्रात गणपतीचा ‘विनायक’ म्हणून उल्लेख आढळतो.डब्लू.वॉर्ड यांच्या मते बंगालमधील ज्या हिंदूंनी गणपतीची ‘विघ्नकर्ता’ ऐवजी ‘विघ्नहर्ता’या रूपात उपासना केली, त्यातून गाणपत्य संप्रदाय उदयाला आला.ऋग्वेदातील सूक्त निर्माते द्रष्टा ऋषी गृत्समद यांना आद्य गाणपत्य मानले जाते. मुद्गल, भृशुंडी, वरेण्य, गणेशयोगी हे महागाणपत्य मानले जातात.मध्ययुगीन काळातील चिंचवडचे मोरया गोसावी, त्यांचे शिष्य गोसावी नंदन हे महत्त्वाचे गाणपत्य आहेत. भाद्रपद महिन्यातील गणेश चतुर्थी व्रत, माघी गणेश जन्म जयंती यांना गाणपत्य पंथात महत्त्वाचे स्थान आहे.

## गाणपत्य संप्रदायातील महत्त्वाचे ग्रंथ व स्तोत्रे

गणेश पुराण, मुद्गल पुराण, गणपत्युपनिषद, गणेश संहिता, गणेश गीता, गणेशकल्प, गणपतिरहस्य, गणेशसहस्त्रनाम, गणेशमाहात्म्य आणि ब्रह्मवैवर्त पुराणातील ‘गणेशखंड’ हे गाणपत्य संप्रदायाचे प्रमुख ग्रंथ आहेत. “ॐ एकदन्ताय विद्महे वक्रतुण्डाय धीमहि तन्नो दन्ति प्रचोदयात्।” हा गणेश गायत्री मंत्र, “वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ। निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा॥” हा गणेश मंत्र गाणपत्य संप्रदायात लोकप्रिय आहे. ‘गणेश पंचरत्न स्तोत्र’ हे आदिशंकराचार्य यांनी विनायकाच्या स्तुतीपर स्फुट श्लोक काव्य इसवी सनाच्या आठव्या शतकात रचले आहे. “मुदा करात्त मोदकं सदा विमुक्ति साधकम्।” या गणेश पंचरत्न स्तोत्रात पहिले पाच श्लोकांमध्ये पाच रत्नांसारख्या विनायकाच्या विविध गुणांचे वर्णन केले आहे. ‘श्रीगणेश अथर्वशीर्ष’ हे गणपतीला समर्पित असलेले एक महत्त्वाचे स्तोत्र असून, ते 'ॐ नमस्ते गणपतये' या मंत्राने सुरू होते.अथर्वशीर्ष हे चौदा श्लोकांचे एक लघु उपनिषद असून, ते इसवी सनाच्या सोळाव्या किंवा सतराव्या शतकातील असल्याचे

अभ्यासक सांगतात. अथर्वशीर्ष हे अथर्ववेदाशी संबंधित आहे.यामध्ये गणेशविद्या सांगितलेली आहे.गणेशाच्या उपासकांमध्ये या उपनिषदाला विशेष महत्व आहे.अथर्वशीर्ष हे गणक ऋषी यांनी लिहिले आहे. ‘गणपती बाप्पा मोरया’ या घोषवाक्यात महान गाणपत्य मोरया गोसावी यांच्या नावाबरोबर गणपतीचे नाव जोडले गेले आहे.

## गाणपत्य संप्रदायातील सहा भेद

गाणपत्य संप्रदायातील सहा भेद किंवा उपसंप्रदाय आनंदगिरीने ‘शांकरदिग्विजय’ या ग्रंथात तसेच धनपतीने त्यावरील भाष्यग्रंथात सांगितले आहेत, ते पुढीलप्रमाणे; (१)महागणपती, (२)हरिद्रागणपती, (३)उच्छिष्टगणपती, (४)नवनीतगणपती, (५)स्वर्णगणपती आणि (६)संतानगणपती. आनंदगिरीने शेवटच्या तीन भेदांची नवनीत, स्वर्ण आणि संतानगणपती अशी जी नावे दिली आहेत, त्यांचे अनुक्रमे ऊर्ध्वगणपती, पिंगलगणपती आणि लक्ष्मीगणपती असेही प्राचीन पर्याय आहेत. तथापि आनंदगिरीने दिलेली नावेच विशेष रूढ आहेत.यातील गणेशनामांचा संबंध जय द्रव्यांपासून गणपती मूर्ती बनवित, त्या द्रव्यांशी असावा.टी.ए.गोपीनाथ राव आणि एच्.डी.भट्टाचार्य यांनी आपल्या ‘हिस्टरी अँड कल्चर ऑफ द इंडियन पीपल’ उपसंप्रदायांचा या ग्रंथात पुढील पाच उपसंप्रदायांचा अंतर्भाव ‘शक्तिगणपती’ या वर्गात केला असून त्यांचे मूर्तिविशेषही प्रमाणभूत प्रतिमाविद्याविषयक ग्रंथांच्या आधारे तपशिलांसह दिले आहेत: (१) उच्छिष्टगणपती: लालवर्ण, चतुर्भुज. (२) महागणपती : रक्तवर्ण, दशभुज. (३) ऊर्ध्वगणपती : सुवर्णपीतवर्ण, षड्भुज. (४) पिंगलगणपती : पिंगटवर्ण, षड्भुज. (५) लक्ष्मीगणपती : शुभ्रवर्ण, चतुर्भुज वा अष्टभुज. प्रतिमाविद्याविषयक विविध ग्रंथांत ह्या पाचही मूर्तींच्या तपशिलांबाबत थोडीफार तफावत आढळते. या मूर्ती शक्तिदेवीसमवेत असल्याबाबत मात्र सर्वांतच एकवाक्यता आढळते. हरिद्रागणपती या उपसंप्रदायातील अनुयायी मुख व दोन्ही दंडावर ‘एकदंत’ किंवा ‘गणेशमुख’

गोंदवून घेत असे.गाणपत्य संप्रदायातील सहा भेदात मूर्ती, रूप, नाम, उपासनेचे शब्द-मंत्र, उपदेश यांबाबत भिन्नता दिसते.गणपती सर्व देवांचे, सृष्टीचे आदिकारण, अनादी-अनंत आहे, त्याच्या मायेनेच ब्रह्मादी सर्व देव व विश्व निर्माण झाले आहे, याबाबत सर्व गाणपत्य उपसंप्रदायांचे एकमत दिसते. ‘उच्छिष्टगणपती’ या गाणपत्य उपसंप्रदायाने वाममार्गी उपासना पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो.यात देवी ही शिवाची शक्ती न मानता गणपतीची शक्ती मानलेली आहे.या उपसंप्रदायात गणपतीचे नाव ‘हेरंब’असे आहे.या उपसंप्रदायाला कर्मकांड, जातिभेद, विवाहाची बंधने मान्य नाहीत.या उपसंप्रदायात स्त्री-पुरुषांतील मुक्त व स्वैर संभोग हा उपासनेचा सर्वोत्तम प्रकार मानला गेला आहे.या उपसंप्रदायात पुरुषांना हेरंबरूप मानण्यात येते.एच.टी.कोलब्रुक यांच्या मते “‘उच्छिष्टगणपती’ या उपसंप्रदायाचे उपासक, अनुयायी कपाळावर शेंदराचा टिळा तसेच तोंडात तोबरा भरून उष्ट्या तोंडाने उपास्य देवतेची उपासना करतात, म्हणून त्या उपसंप्रदायाला ‘उच्छिष्टगणपती’ असे नाव पडले.

## गणपती आणि मराठी वाङ्मय

### महानुभाव संप्रदाय

मराठी साहित्याच्या प्रारंभ काळापासून गणेशाचे उल्लेख आहेत.मराठी भाषेमधील आद्य वाङ्मयकार असलेल्या महानुभाव पंथातील कवी नरेंद्र अयाचित यांच्या ‘रुक्मिणीस्वयंवर’ काव्यग्रंथात गणपतीचा असा उल्लेख येतो;

“तेया गणरायाचे उदार रूपडे थोरपण जिंकले होडे।
कवीस शब्दब्रह्मीची राणिव कोडे, जेणे पाहिले तो सिंदुरे आंडंबरे।।
गोर मेरु जसा, तयाचे ठायी सिद्धीचे सर्ग, नानाविध वसती भोग।
तेण आधारे अग्नेय सुखावले।।”

## वारकरी संत साहित्य

वारकरी संप्रदायाच्या संतसाहित्यातील गणपतीचा उल्लेख पुढीलप्रमाणे;

१. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील खालील नमनाची ओवी सुप्रसिद्ध आहे;

"ओम नमोजी आद्या | वेदप्रतिपाद्या | जयजय स्वसंवेद्या | आत्मरूपा ||
देवा तुचि गणेशु| सकलमतिप्रकाशु| म्हणे निवृत्तीदासु | अवधारिजोजी ||"

२. नामदेवांनीही गणेशस्तवनाचा अभंग लिहिला आहे. त्यात ते म्हणतात;

"लंबोदरा तुझा, शोभे शुंगदंड करीतसे खंड दुश्चिन्हांचा ||

चतुर्थ आयुधे शोभतासी हाती भक्ताला रक्षिती निरंतर ||"

३. संत तुकाराम एका अभंगात गणपतीला नाचत येण्याची विनंती करतात;

"गणराया लौकरी येई । भेटी सकलांसी देई।।

अंगी सिंदूराची उटी । केशरकस्तुरी लल्लाटी।।

पायी घागर्या वाजती । नाचत आला गणपती।।

तुका म्हणे पाही । विठ्ठल गणपती दुजा नाही।।"

प्रसिद्ध गाणपत्य 'गोसावी नंदन' हे महाराष्ट्रातील प्रसिद्ध गणेशभक्त होते. त्यांनी ज्ञानमोदक हा गाणपत्य संप्रदायातील ग्रंथ रचला आहे. गोसावी नंदन यांनी ' ज्ञानमोदक' या ग्रंथात एकपणे एक देवा एकदंता । तुझी एकात्मता अनेकतत्त्वी।। असे प्रारंभी वर्णन केले आहे. गोसावी नंदन यांनी 'नाना परिमळ दुर्वा शेंदुर शमिपत्रें', 'कपोल झरती मदें शुंडा बहु साजे', 'सिंदुर लाल चढ़ायो अच्छा गजमुखको' या गणपतीच्या मराठी व हिंदी आरत्यांचे लेखन केले आहे.समर्थ संप्रदायाचे संस्थापक समर्थ रामदास यांची 'सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची' अत्यंत लोकप्रिय आरतीचे

लेखन केले आहे. ‘जय देव जय देव जय वक्रतुंडा। सिंदुरमंडित विशाळ सरळ भुजदंडा॥।’ ही आरती कलाकवी मुक्तेश्वर यांनी रचली आहे.

## मराठी संगीत नाटकातील गणपती स्तवन

मराठी संगीत नाटकातील प्रारंभीच्या नटेश्वर व गणपती स्तवनाला ‘नांदी’ असे म्हणतात. ‘श्रीगणराज नर्तन करी’(घाशीराम कोतवाल), ‘नमन नटवरा विस्मय कारा’, ‘पंचतुंड नररुंड मालधर’(संगीत शाकुंतल), नमुनि ईशचरणा(संगीत सौभद्र) या काही नांदी नाट्यपदांमध्ये गणेश स्तवन केले आहे.

## लोकसाहित्य व लोकसंस्कृती

गणपती संतवाङ्मय व शास्त्रपुराणांबाहेर पडून लोकसंस्कृतीतही अनेक ठिकाणी आला आहे.

## तमाशातील गणगायन

तमाशातला प्रारंभीचा गण गणेशस्तवनाचा असतो. यात गणपती ऋद्धीसिद्धींसह नाचत येतो;

शाहीर पठ्ठे बापूराव आपल्या कवनात म्हणतात – ‘‘तुम्ही गौरीच्या नंदना। विघ्न कंदना। या नाचत रमणी। जी जी जी||’’

## कोकणातील दशावतार व बाल्यानृत्य

कोकण व गोमंतकातील दशावतारी लोकनाट्यात गणपती स्तवनाची प्रथा दिसतो.सर्वप्रथम सूत्रधार रंगभूमीवर येऊन विघ्नहर्त्या गणपतीला आवाहन करणारे धृपद म्हणतो.ते संपण्याच्या सुमारास ऋद्धिसिद्धीसहित गणपती रंगमंचावर येतो.त्याच्या मागोमाग सरस्वती येते.गणपतीचे आवाहन संपले, की सूत्रधार

सरस्वतीची स्तुती करतो. सरस्वती त्याला आशीर्वाद देते. यानंतर प्रत्यक्ष दशावतार खेळाला सुरुवात होते.

कोकणातील गणपतीच्या नाचाची गाणी प्रसिद्ध आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील बाल्यांचा गणपतीचा नाच दमदार व लक्षवेधी असतो. बाल्यांचे गणपती गीते पुढीलप्रमाणे; “यावे नाचत गौरीबाळा। हाती घेऊनी पुष्पांच्या माळा। सर्वे ठायी वंदितो तुला| यावे नाचत गौरीबाळा।”, “गणा धाव रे मला पाव रे”

**स्त्री ओवीगीतांमधील गणपती**

लोकगीतामध्येही गणपतीचे वर्णन येते. कार्तिकेय गणपती भावांचा झगडा, शंकरपार्वतीचे बालकौतुक असे अनेक विषय यात आहेत. एका लोकगीतातले वर्णन असे;

“हिथं बस तिथं बस, गणू माज्या बाळा ।।

आमी जातो आमी जातो, सोनारू साळा ।।

सोनारीन बाई ग सोनारू दादा ।।

बाळाचं पैजण झालंका न्हाई ?

फिरून येजा फिरून येजा गवराबाई गवराबाई ।।

हिथं बस तिथं बस, गणू माज्या बाळा।।”

गवराबाईने म्हणजे गणपतीच्या आईने (गौरीने) गणेशबाळासाठी सोनाराकडे पैजण करायला टाकले आहेत आणि सोनाराने ते अजून दिले नाहीत, असे वर्णन ओवीगीतात आहे.

## समारोप

एकूणच भारतात व आग्नेय-पूर्व आशियात प्रसिद्ध असलेली गणपती ही देवता सर्वसमावेशक, समन्वयवादी, सर्वसंग्राहक आणि लोकप्रिय आहे, असे दिसते.गाणपत्य संप्रदाय आज फारसा प्रचलित नाही, परंतु आज गणपतीची देवता स्वरूपात केली जाणारी उपासना खूप लोकप्रिय झालेली आहे.

**गाणपत्य संप्रदाय**



उच्छिष्टगणपती



महागणपती



हेरंब गणपती



**कापालिक गणपती**

# गाणपत्य संप्रदाय









# पाशुपत संप्रदाय

पाशुपत संप्रदाय हा शैवांतर्गत सर्वात प्राचीन धर्म संप्रदाय मानला जातो.उत्तर भारतात प्रचलित असणाऱ्या शैव पंथांत पाशुपत पंथ सर्वांत प्राचीन आहे.पाशुपत या संप्रदायाला 'आगामान्त संप्रदाय' असे देखील म्हटले जाते. पाशुपत हा अनेक माहेश्वर शैव पंथांपैकी एक पंथ आहे.रुद्रशिव वा पशुपतीस आपले उपास्य दैवत मानणारा हा पंथ आहे.सर्व जीवांचे अधीश्वर 'शिव' आहेत, यावर पाशुपतांचा विश्वास आहे.गुजरातमध्ये सोळंकी राजवटीत पाशुपत संप्रदायाला राजधर्माची मान्यता होती.पाशुपत परंपरेत लिंगरूपात शिवाची उपासना केली जाते.यजुर्वेदात 'रुद्राध्याय' असून त्यात रुद्र शिवाचा उल्लेख आहे, म्हणजेच यजुर्वेदकाळापासून शिवाची परमेश्वर म्हणून उपासना प्रचलित असल्याचे आढळते. श्वेताश्वतरोपनिषद यामध्ये शिवाला विश्वाचा एकमेव शास्ता मानले आहे. महाभारतातही पशुपतीस उपास्य दैवत मानणाऱ्या पाशुपत पंथाचा उल्लेख आढळतो. महाभारताच्या शांतिपर्वाच्या २४९ व्या अध्यायात पाशुपत तत्त्वज्ञानाचे वर्णन, तर २८० व्या अध्यायात पाशुपत संप्रदायाचे वर्णन आले आहे.काही विद्वान 'श्रीकंठ' याला पाशुपत पंथाचे संस्थापक मानतात.

## लकुलीश व त्याची शिष्यपरंपरा

'लकुलीश वा नकुलीश' (इ.स.२००) हा गुजरातमध्ये कायावरोहण (भडोचजवळील कारवान म्हणून प्रसिद्ध) क्षेत्रांत होऊन गेलेला पाशुपत मताचा अध्वर्यू आहे. शैव धर्मातील सर्वात जुन्या पंथांपैकी एक असलेल्या पाशुपतांच्या सिद्धांताचा उपदेशक होता.प्रत्यक्ष भगवान शिवाने पाशुपत पंथ स्थापन केला आणि पंथाची तत्त्वे विशिष्ट ऋषींना शिवाने गुप्तपणे उपदेशिली, असे पाशुपत संप्रदायाच्या आगम ग्रंथात म्हटले आहे. लिंगपुराण व वायुपुराणतील दुसऱ्या एका कथेनुसार

ब्रह्मचारी शिवाने स्मशानात जाऊन एका अज्ञात व्यक्तीच्या मृतदेहात प्रवेश करून नवा अवतार धारण केला. ह्या मृतदेहाशेजारी त्याचे लकुल (लाकुड) पडले होते. शिवाने मृतदेहात प्रवेश करताच तो मृतदेह जिवंत झाला. हाच शिवाचा अठरा अवतारांपैकी आद्य असा लकुलीश वा नकुलीश अवतार होय.लिंगपुराणात लकुलीश यास शिवाचा अठरावा आणि शेवटचा अवतार मानला जातो.लकुलीश हा पुनरुज्जीवनवादी, सुधारणावादी, दार्शनिक गुरू, योग प्रणालीचा प्रणेता होता.लगुड वा काठी धारण केलेल्या ईश्वर किंवा एक काठी किंवा गदा वा काठी असलेला स्वामी असा 'लकुलीश' या शब्दाचा अर्थ होतो. वायुपुराणानुसार लकुलीश हा व्यास आणि कृष्ण यांचा समकालीन होता आणि रुद्र (शिव) चा अठ्ठाविसावा अवतार होता.लकुलीशाने जैन, विशेषतः बौद्ध धर्मांचा विरोध केला.कौरूष्य, कुशिक, गार्ग्य, मित्र हे लकुलीशाचे शिष्य मानले जातात.या शिष्यांनी पाशुपत परंपरेत चार शाखा निर्माण केल्या.नकुलीशाची शिष्यपरंपरा नकुलीश ⟶ कौशिक ⟶ गार्ग्य ⟶ मैत्रेय ⟶ कौरुष ⟶ ईशान ⟶ परगार्ग्य ⟶ कपिलांड ⟶ मनुष्यक ⟶ कुशिक ⟶ अत्री ⟶ पिंगल ⟶ पुष्पक ⟶ बृहदार्य ⟶ अगस्ती ⟶ संतान ⟶ राशीकर वा कौंडिण्य ⟶ विद्यागुरू अशी सांगितली जाते.नंतरच्या काळात लकुलीश यांचे योगीश्वर शिवात रूपांतर झाले. लकुलीशमूर्ती भारतात सर्वत्र आढळतात, ज्या नग्न व ऊर्ध्वमेढ्र (उत्थितलिंग) अशा त्या आहेत. मोहें-जो-दडो येथेही पशुपतीच्या मूर्ती सापडल्या आहेत.भारतातील प्राचीन सिंधु संस्कृतीतील शिक्क्यांवर पशुपतींची मुद्रा निर्माण केलेल्या दिसतात.

## लकुलीशाचे ऐतिहासिकत्व

इ.स.३८० मधील दुसऱ्या चंद्रगुप्तचा शिलालेख, इ.स.१४० मधील हुविष्कची नाणी,इसवी सनाच्या चवथ्या शतकापासून दुसऱ्या चंद्रगुप्तच्या राजवटीपासून लकुलीश प्रतिमा, शिल्प कोरलेल्या दिसतात.गुजरात मधील

कायावरोहण (कारवान), टिंबरवा येथील लकुलीश्वर मंदिर, राजस्थानमधील मंदिरे, ओडिशा राज्यात भुवनेश्वर मधील लक्ष्मणेश्वर समूह मंदिरे, पूर्व भारतातील मंदिरे, महाराष्ट्रातील घारापुरी गुंफा, तामिळनाडू मधील पांड्य राजांनी इसवीसनाच्या सातव्या शतकात कोरलेल्या मदुराईजवळील अरिट्टापट्टी येथील मंदिर, तेलंगणातील जोगुलांबा गदवाल जिल्ह्यातील अलामपूर येथील कुडावेली संगमेश्वर आणि बालब्रह्मेश्वरस्वामी मंदिरे या मंदिरांवर लकुलीशाच्या प्रतिमा शिल्पांकित केल्या आहेत.पाषाणात खोदलेल्या घारापुरी एलिफंटा लेणी इसवी सन नववे ते तेरावे शतक यादरम्यान निर्माण करण्यात आल्या असून, त्या लकुलीश पाशुपत पंथीय लेण्या आहेत.या लेण्यातील सदाशिव मूर्ती उल्लेखनीय आहे.

**पाशुपतांचे तत्त्वज्ञान**

ईश्वर म्हणजे पती.पती हा त्याने निर्माण केलेल्या जीवांना/पशुंना या संसारपाशातून मुक्त करतो.शिव हाच पशुपती मानला जातो.लकुलीश यानेच प्रथम या पंथाचे तत्त्वज्ञान सुसूत्रपणे मांडले व त्याला दार्शनिक रूप दिले, म्हणून पाशुपत दर्शन नकुलीश दर्शन मानले जाते. पाशुपतांचे तत्त्वज्ञान द्वैत-अद्वैत यांची सांगड घालणारे भेदाभेदवाद म्हणून ओळखले जाते.लकुलीशाने प्रतिपादित केलेल्या पाशुपताच्या तत्त्वज्ञानात्मक सिद्धांताला ‘ईश्वर कर्ता वद: (सार्वभौम अस्तित्वाची सर्जनशील शक्ती)’ असे म्हटले जाते.योग हा पाशुपतांमध्ये चित्तशुद्धी घडविणारा विधी मानला जातो.शिवच विश्वाची उत्पत्ती, स्थिती व लय आहे, असे पाशुपत समजतात.पाशुपत दर्शनात कार्य, कारण, योग, विधी व दुःखांन्त हे पाच पदार्थ मानले आहेत, कार्य म्हणजे सुख-दुःखयुक्त संसार.कारण म्हणजे ईश्वर.योग म्हणजे ध्यान, समाधी, मंत्रजप.विधी म्हणजे दिवसातून तीन वेळा भस्म लावणे व गूढचर्या धारण करणे.दुःखान्त म्हणजे मोक्षप्राप्ती.मुक्तीच्या अवस्थेत जीव हा शिवात विलीन होत नाही, तर त्याला ‘शिवसायुज्य’ प्राप्त होते, अशी पाशुपतांची धारणा आहे.पाशुपत दर्शनात प्रत्यक्ष, अनुमान आणि आगम ही तीन प्रमाणे मानली जातात, तर

भस्मस्नान, भस्मायण, जप, प्रदक्षिणा, उपवास इत्यादी व्रत आहेत. पाशुपत मतानुसार पशुपती हा सर्व देवांमध्ये प्रमुख आहे, ते सर्व सृष्टीचे निर्माते आहेत. पशूचा अर्थ संपूर्ण सृष्टी, म्हणजे ब्रह्मापासून स्थावरपर्यंत सर्व द्रव्य आहे.लकुलीश व नकुलीश हा या पंथाचा आद्य प्रवर्तक मानला जातो.पाशुपत पंथ गुजरात व राजस्थानमध्ये मुख्यतः पसरला. माधवाचार्य (सु. चौदावे शतक) यांनी आपल्या सर्वदर्शनसंग्रहात पाशुपत पंथाचे तत्त्वज्ञान ‘नकुलीश दर्शन’ नावाने विस्ताराने मांडले आहे. लकुलीशाने हठयोग, तंत्रवाद तसेच सांख्यांचे विश्वशास्त्रीय सिद्धांत आणि सांख्य तत्त्वांशी संबंधित द्वैत यांचे पुनर्संचयन केले असे म्हटले जाते. गुणरत्न (सु. चौदावे शतक) याने तर वैशेषिकांना ‘पाशुपत’ म्हटले आहे. न्यायवार्तिककार उद्योतकराने स्वतःस ‘पाशुपताचार्य’ म्हटले आहे.

## पाशुपतांचे वाङ्मय

पाशुपतांचा मूळ सूत्रग्रंथ माहेश्वररचित म्हणजेच आद्य शिवावतार नकुलीशरचित ‘पाशुपत सूत्र’ हा संस्कृत ग्रंथ असून, त्यावर कौंडिण्य (इ.स.५००) याने रचलेले ‘पंचार्थीभाष्य’ आहे. 'अथर्वशरस्', 'नीलारुद्र' आणि 'कैवल्य' ही तीन पाशुपत उपनिषदे आहेत. लकुलीश पाशुपतांचे सिद्धांत सायण माधवांच्या ‘सर्वदर्शनसंग्रह’ या इसवी सनाच्या चौदाव्या शतकातील ग्रंथात विस्ताराने सांगितले आहेत.

## पाशुपतांचा आचारधर्म

पाशुपतांच्या धार्मिक आचारात भस्माला विशेष महत्त्व आहे. त्यांच्या मते भस्मस्नान म्हणजे खरा यज्ञ. पाशुपत साधूंना सिद्धी प्राप्त झाल्या, तरी त्यांचा उपयोग करण्याने समाधीस व्यत्यय येतो. म्हणून सिद्धींच्या नादी लागणे अयोग्य मानले आहे. पाशुपताने स्वीकारलेल्या योगपद्धतींमध्ये दिवसातून तीन वेळा शरीरावर भस्म चोळणे, ध्यान करणे आणि 'ॐ' या शक्तिशाली शब्दाचा जप करणे यांचा समावेश

आहे.साधे संन्यस्त जीवन जगणे, लोभ व क्रोधत्याग करणे, क्षमाशील असणे, ओंकाराचा उच्चार करून व योग आचरून शिवाशी एकरूप होणे, अशी या पंथाची सुरुवातीची शिकवण होती.पंथाची ही मूळ शिकवण व आचार पुढे अधोगतीस जाऊन अघोरी पंथ व कापालिक पंथ उत्पन्न झाले.पाशुपत अनुयायांच्या अधोगतीमुळे पंथात बीभत्सपणा व अश्लीलता निर्माण झाली.

**समारोप**

प्राचीन भारतात लकुलीशाचा प्रचंड प्रभाव होता, हा प्रभाव प्रथम उत्तरेत,त्यानंतर भारताच्या दक्षिणेत वेगाने पसरला.प्राचीन काळात पाशुपत मत गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र या भारतातील प्रदेशात, जावा, सुमात्रा, कंबोडिया या आग्नेय आशियातील भागात विशेष लोकप्रिय असल्याचे आढळते.मध्ययुगीन काळातील नाथ, वीरशैव लिंगायत, नायनमार या भक्तिप्रधान शैवसंप्रदायांवर लकुलीश दर्शन व पाशुपत पंथीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसतो.

# पाशुपत संप्रदाय

## लकुलीश प्रतिमा













लकुलीश्वर मंदिर,कायावरोहण

## नाथ संप्रदाय

नाथ हा प्राचीन व लोकप्रिय शैव संप्रदाय योगमार्गाने मोक्षप्राप्तीवर भर देतो.नाथ पंथाचा नेपाळ, आसाम, बंगाल, पंजाब, उत्तर भारतापासून श्रीलंकेपर्यंत प्रसार झालेला आहे.नाथ पंथाचा उगम आदिनाथ शंकरापासून मानतात.नवनाथ हे नाथ संप्रदायातील महत्त्वाचे पुरुष मानले जातात.नाथ पंथात मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ हे प्रमुख गुरू मानले जातात.नाथ पंथात योगप्रधानता महत्त्वाची मानली गेली आहे.योगसाधनेच्याद्वारे सिद्धावस्था प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे, आत्मज्ञान प्राप्त करणे याला नाथांमध्ये महत्त्व आढळते.योगद्वारे कुंडलिनी जागृत करणे नाथ परंपरेत महत्त्वाचे समजले जाते.नवनाथ हे नाथ संप्रदायातील नऊ महान संतांचे समूह आहेत, जे भगवान विष्णूचे नवनारायण या अवतारांचे पृथ्वीवरील रूप मानले जातात. यात मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, जालिंदरनाथ, कानिफनाथ, भर्तरीनाथ, रेवणनाथ, नागनाथ आणि चर्पटीनाथ यांचा समावेश होतो. या नाथांची उपासना आजही भारतात मोठ्या प्रमाणावर केली जाते आणि ते चिरंजीव मानले जातात. नाथ पंथात ‘आदेश’ व ‘अलख निरंजन’ हे शब्दमंत्र महत्त्वाचे मानतात.नाथांचे मच्छिंद्रनाथ हे प्रथम गुरू व पंथ संस्थापक , तर गोरक्षनाथ हे नाथ पंथाचे प्रसारक, प्रणेते मानले जातात.नाथ या शब्दाचा अर्थ ‘रक्षणकर्ता किंवा ‘स्वामी’ असा होतो.नाथ परंपरेचा उद्गम आदिनाथ शिवापासून झाल्याने ‘नाथ संप्रदाय’ हे नाव पडले.नाथ पंथ शैव संप्रदायातील योगप्रधान संप्रदाय आहे.नाथ परंपरेचा प्रारंभ इ.स.आठवे ते बारावे शतक यादरम्यान झाला आहे.नाथ पंथ कदली बनात स्थापन झाला.नाथ पंथाच्या उगमस्थानाबाबत अभ्यासकांमध्ये मतभिन्नता आहे, हिमालय, नेपाळ, पंजाब, उत्तरप्रदेश, आसाम, बंगाल, महाराष्ट्र, आंध्रप्रदेशातील श्रीशैल पर्वत अशी काही नाथ पंथाची उगमस्थाने मानली जातात. नाथ संप्रदायाला योग संप्रदाय, सिद्ध संप्रदाय, अवधूत संप्रदाय, दर्शनी संप्रदाय, गोरखनाथी संप्रदाय, कानफाटा

संप्रदाय, गुरू संप्रदाय अशी देखील नावे समाजात रूढ आहेत.  नाथ परंपरेत शिवशक्ती, दत्तगुरू ही प्रमुख उपास्य दैवते मानली गेली आहेत, तर विष्णू, आदिशक्ती, नवनारायण(नवनाथ), भैरवनाथ ही देखील दैवते महत्त्वाची आहेत.'शिव हा अनन्य, अखंड, अद्वय, अविनाशी, धर्महिन व निरंग असल्यामुळे 'अकुल' मानला जातो.आदिनाथ हा शक्तियुक्त परशिव मानला जातो.'शिव हा विश्वनिर्मितीची इच्छाशक्ती, तर कुल हे विश्वनिर्मितीचे कारण आहे.'असे मत नाथ पंथीयांचे दिसते.  नाथ पंथात सामाजिक बांधिलकी, प्रेम, त्याग, भक्ती, काम, भोग, मोक्ष यांना महत्त्व आहे.नाथ संप्रदायात दीक्षा घेतल्यानंतर 'नाथ' ही उपाधी लावतात.नाथ परंपरेतील दर्शनी पंथ अनुयायी दर्शन म्हणजेच कुंडल धारण करतात.

'शिव हेच अंतिम सत्य, शिव हाच पिंड, ब्रह्मांडाचा आधार होय' हे नाथ पंथाचे तत्त्वज्ञान आहे.नाथ पंथीयांचे ध्येय 'योगमार्गाने सिद्धावस्था व अवधुतावस्था प्राप्त करणे.' हे आहे.'शिवशक्ती सामरस्य हेच अंतिम ध्येय आहे.' असे नाथ व तांत्रिक कौलमार्गीचे अनुयायी मानतात.पिंड(देह) हे ब्रह्मांडाची छोटी आवृत्ती आहे, असा नाथांचा विश्वास आहे.कौलमार्गीचे साधक मद्य, मांस, मत्स्य, मैथुन, मुद्रा हे पंचमकार करताना आढळतात. नाथ परंपरेचा वारकरी, महानुभाव, दत्त या पंथ परंपरांशी निकटचा संबंध आहे.नाथ संप्रदाय वर्णव्यवस्थेला मानत नाही.बौद्ध धर्मातील 'महायान' पंथातील तांत्रिक कर्मकांडांची परंपरा नाथांनी चालवली.रूपनाथ मंदिर हे मध्य प्रदेशातील कटनी जिल्ह्यातील बहोरीबंद तालुक्यात वसलेले एक नाथ पंथीय ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळ आहे.या मंदिराजवळ सम्राट अशोकाचा शिलालेख आहे.बौद्ध वज्रायन परंपरेतील ८४ सिद्ध व नाथ परंपरेतील ८४ सिद्ध या धर्मकल्पनांमध्ये साम्य आढळते.नाथ परंपरेने महाराष्ट्रात भक्ती परंपरा रुजवली, देशीभाषांचा पुरस्कार, मठांची स्थापना केली.नाथ परंपरेत दुर्गा, भैरव, नरसिंह, राम, हनुमान या अभिजन दैवतांबरोबर, म्हसोबा, वेताळ

ही लोकधर्मातील दैवते, मुसलीन पीर, फकीर यांचा उल्लेख आढळतो.त्र्यंबकेश्वर, द्वारका, पुष्कर, रामेश्वर, हिंगळजा, गिरनार, गोरखपूर, पैठण ही नाथांची तीर्थस्थाने आहेत. त्र्यंबकेश्वर हे नाथांचे मुख्य तीर्थस्थान असून, गुरू गोरक्षनाथांनी इतर नाथांना व ८४ सिद्धांना उपदेश 'अनुपम शिळा' येथे केला.ब्रह्मगिरीवरील कौलगिरीच्या पोटाला 'अनुपम शिळा' म्हणतात. 'अनुपम शिळा' म्हणजे उपमा नसलेली शिळा.अनुपम शिळेला बोलीभाषेत 'अनुपान शिळा' असे म्हणतात.नाथ परंपरेत अनुपम शिळेला खूप महत्त्व दिसते.नाथ परंपरेत अहल्या नदीला 'गंगा' मानतात.आज नाथ परंपरेत १३ उपपंथ विद्यमान आहेत.नाथ पंथात नागपंचमीला महत्त्व आहे.

गुरू गोरक्षनाथांनी सांगितलेला प्रत्येक शब्द जसाच्या तसा नऊ जणांनी ग्रहण केला, त्यांना 'नवनाथ' असे म्हणतात, तर तो उपदेश ऐकून ८४ जण उभे राहिले व त्यांना त्यातील भावार्थ समजला, म्हणून त्यांना 'सिद्ध'म्हणतात.नवनाथ हे नऊ नारायणांचे अवतार मानले जातात.गोरख शिष्य अमरनाथ, गहिनीनाथ हे महाराष्ट्रातील नाथ संप्रदायाचे मूळ पुरुष आहेत.

**नाथ संप्रदायाचे विशेष**

१. अद्वैतवाद, योगशक्ती, हरिहरऐक्य, कृष्णभक्ती, गुरुनिष्ठा, देशीभाषांमध्ये संहित्यनिर्मिती हे नाथसंप्रदायाचे ठळक विशेष आहेत.
२. नाथपरंपरेत सगुण-निर्गुण उपासनेला महत्त्व आहे.
३. नाथ पंथ सर्वसंग्राहकता व समन्वयवादी संप्रदाय मानला जातो.

## शाबरी विद्या

नाथ पंथ प्रवर्तक गोरक्षनाथ यांनी निर्माण केलेली शाबरी विद्या मंत्र, भूत, पिशाच्च्य बाधा, संकटे व पीडा नष्ट करणारी मानली गेली आहे.शाबरी विद्या मच्छिंद्रनाथ व गोरखनाथांकडून 'शाबरीकवच' या संस्कृत काव्याद्वारे प्रसृत करण्यात आली, या विद्येत इतर नवनाथांनी भर घातली आहे.शाबरी विद्येद्वारे मनातील सर्व इच्छा पूर्ण होतात, असे 'शाबरीकवच' या ग्रंथात सांगितले आहे.

## नाथ परंपरा आणि इतर धर्म-संप्रदाय

ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत यांना गोरक्षनाथ, आजोबा गोविंदपंत, आजी निराबाई, भाऊ निवृत्तीनाथ यांना गहिनीनाथ यांचा अनुग्रह होता.ज्ञानेश्वरी हा नाथ तत्त्वज्ञानाचा ठेवा मानला जातो.ज्ञानेश्वर गोरक्षनाथांना 'विषयविध्वंसैकवीर' असे म्हणतात. ज्याचा अर्थ 'विषय (वासना) विध्वंस करणारा एकमेव वीर पुरुष' असा होतो. संत ज्ञानदेव यांनी गोरक्षनाथांचा गौरव करण्यासाठी या विशेषणाचा उपयोग केला आहे, कारण गोरक्षनाथांनी योगिनींच्या जाळयातून आपले गुरू मत्स्येंद्रनाथांना सोडवले होते.'विषयविध्वंसैकवीर' हे उपाधि गोरखनाथांच्या आध्यात्मिक सामर्थ्याला आणि इंद्रियांवर विजय मिळविण्याच्या त्यांच्या क्षमतेला दर्शवते. ज्ञानेश्वर भावंडे, आद्यकवी मुकुंदराज, विसोबा खेचर या नाथपरंपरेतीलच व्यक्ती आहेत. चक्रधर स्वामींचे गुरू गुंडम राऊळ, चांगदेव राऊळ हे नाथपरंपरेतील आहेत. राऊळ'हे नाथ पंथातील संबोधन आहे.स्वतः चक्रधर नाथवाणीची स्तुती करतात.महानुभावांचा उगम नाथपरंपरेत आहे.दत्त संप्रदायाप्रमाणेच नाथ परंपरेत गुरूला महत्त्वाचे स्थान आहे, असे दिसते.नाथ परंपरेत दत्तात्रेयांना आदर्श गुरू मानले आहे.नाथ-महानुभाव-दत्त अशा सर्व परंपरांमध्ये 'अवधूत' या संबोधनाला विशेष महत्त्व आढळते.समर्थ संप्रदायावर नाथांचा मोठा प्रभाव असल्याचे आढळतो.समर्थ

संप्रदायातील ‘दासबोध’ या ग्रंथाला आधार ग्रंथ म्हणून ‘अवधूतगीता’ हा नाथ ग्रंथ आहे.समर्थ रामदासांनी नाथसिद्धांची आरती लिहिलेली आहे.काश्मिरी शैव संप्रदाय म्हणजेच नाथ संप्रदाय होय.महाराष्ट्रात पाशुपत भराडी हे शैव अनुयायी नंतर नाथ परंपरेचे पाईक बनले. मच्छिंद्रनाथ यांच्या कौल मार्गाचा संबंध बौद्ध व शाक्तांशी आलेला आढळतो.नाथ परंपरेत देखील तंत्रमार्गी अनुयायी आहेत.नवनाथांमधील जालिंदरनाथ, चर्पटीनाथ हे बौद्ध होते.नीमनाथ, पारसनाथ हे जैन योगी नाथानुयायी होते.नाथ परंपरेत योगप्रधानतेमुळे त्यांचा संबंध पातंजली योगशी देखील होता. नाथ परंपरेवर सांख्य मताचा देखील प्रभाव आहे.नाथ परंपरेप्रमाणे कापालिक मत आदिनाथांनी सुरू केले असे मानले जाते.कानिफनाथ स्वतःला ‘कापालिक’ म्हणतो.नाथ परंपरेत किमया(अल्केमी), रसवाद अंतर्भूत झालेले दिसतात.गोरक्षनाथ हे रसविद्येचे आविष्कारक मानले जातात.बोगर हा तमिळ सिद्ध, पुलिपाणी हा चीनी सिद्ध यांवर नाथपरंपरेचा प्रभाव दिसतो.नाथ व वीरशैव या संप्रदायांचा एकमेकांशी दृढ संबंध होता. अल्लमप्रभू आणि गोरक्षनाथ हे दोघे मच्छिंद्रनाथांचे शिष्य असल्याने गुरुबंधू होते. अल्लमप्रभू, रेवणसिद्ध, मरूळसिद्ध हे वीरशैव नाथसिद्ध आहेत.कबीर साहित्यावर नाथ परंपरेचा प्रभाव आढळतो.संत मीराबाईंचा कृष्ण नाथजोगी आहे.महाराष्ट्रातील सर्व सांप्रदायिक संतांनी परंपरेतून प्रेरणा घेतली आहे.आनंद वारकरी संप्रदायावरदेखील नाथांचा प्रभाव जाणवतो.एकनाथ, तुकाराम, रामदास, कबीर आदी संतांनी नाथ पंथातील दोषांवर टिका केली आहे.अमरनाथ, गहिनीनाथ, चांगदेवराऊळ, गुंडमराऊळ, चक्रधर, मुकुंदराज, चांगवटेश्वर, निवृत्तींनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, सत्यमलनाथ, गैबीनाथ, चांदबोधले, जनार्दन स्वामी, एकनाथ इ. अनेक महापुरुषांवर नाथ संप्रदायाचा प्रभाव दिसतो.

## नाथ संप्रदायाचे कार्य

१. नाथांनी विशुद्ध आचार व निष्कलंक चारित्र्य यांचे महत्त्व वाढविले.
२. वाममार्गी तांत्रिकांचा प्रभाव कमी केला.
३. तीर्थयात्रा, रूढी, कर्मठता, शब्द प्रामाण्य, पंडिती वाद, बाह्याचारचे अवडंबर यांना विरोध केला.
४. हाडिपा सारख्या अंत्यज व अडबंगनाथासारख्या शेतकऱ्यांना पंथात प्रवेश दिला.भतृहरी, गोपीचंद यांसारखे राजे, गोपीचंदाची आई मनावती, योगिनी मुक्ताबाई, गुप्तनाथ म्हणजे रशिनची गंगाबाई अशा स्त्रीया इ. पंथात सामील करून घेतले
५. साहित्य निर्मिती आणि पंथ प्रसारासाठी लोकभाषांचा स्वीकार व पुरस्कार केला.
६. सर्वसामान्यांसाठी मोक्षमार्ग खुला केला.
७. नाथ पंथाने हिंदू-मुस्लिम समन्वय करण्याचे कार्य केले.
८. तत्त्वज्ञानात उत्तम व विशुद्ध गोष्टींचा समावेश केला.

## नाथ परंपरेतील वाङ्मय आणि गोरक्षनाथ

नाथ परंपरेतील बहुतांश साहित्य आज उपलब्ध नाही.नाथ पंथाची पायाभरणी गोरक्षनाथांनी केली.तत्कालीन अतिरेकी भोगवादाला प्रतिक्रिया म्हणून आत्यंतिक मनोनिग्रह, अपरिग्रह, आचार शुद्धता यांवर गोरक्षनाथांचा भर होताश्लोक .गोरक्षनाथांनी गोरक्ष सिद्धांत संग्रह, अवधूतगीता, गोरक्षकल्प, गोरक्षकौमुदी, गोरक्षगीता, गोरक्षचिकित्सा, गोरक्षपंचक, गोरक्षसंहिता, गोरक्षपद्धती, हठयोग, हठयोगसंहिता, ज्ञानशतक, गोरक्ष-अमर संवाद, महार्थमंजिरी, परास्तोत्रम्, कुंडलाभरणम् इत्यादी अठ्ठावीस ग्रंथाचे कर्तृत्त्व गोरक्षनाथांकडे दिले जाते.

## नाथ परंपरेतील ग्रंथ

१. सिद्ध-सिद्धांत पद्धती : सिद्ध-सिद्धांत पद्धती हा ग्रंथ गोरक्षनाथांनी संस्कृतमध्ये लिहिलेला असून ‘सिद्धमत’ आणि ‘सिद्धमार्ग’ या नावांनी देखील ओळखला जातो.नाथ पंथाचे सिद्धांत, साधना यांचे शास्त्रीय विवेचन या ग्रंथात आले आहे.या ग्रंथाचे सहा अध्याय असून ३५३ श्लोक संख्या आहे.पिंडाधार, पिंडविचार, समरसीकरण यांचे विवेचन या ग्रंथात केले आहे.

२. गोरक्षपद्धती : गोरक्षनाथांनी संस्कृतमध्ये लिहिलेला २०० श्लोकांचा ग्रंथ म्हणजे ‘गोरक्षपद्धती’.या ग्रंथातील पहिले शतक ‘गोरक्ष शतक’, तर दुसरे शतक ‘योगशास्त्र’ म्हणून ओळखले जाते.नाथपंथीय अनुयायी या ग्रंथास मुळ ग्रंथ मानतात.

३. अमनस्कयोग : गोरक्षनाथांनी संस्कृतमध्ये लिहिलेला अमनस्कयोग हा ग्रंथ ईश्वर-वामदेव संवादात्मक असून योगस्थान, योगासने, क्रियायोग, यांचे वर्णन या ग्रंथात आले आहे.

४. हठयोग प्रदीपिका : योगीन्द्र स्वात्मराम याने रचलेला ‘हठयोग प्रदीपिका’ हा ग्रंथ चार अध्यायांचा असून ३८२ श्लोकांचा आहे.मठलक्षण, यम-नियम, योग्याचा आहार, विहार, प्राणायाम, योगमुद्रा, बंध, समाधी स्वरूप इ.योगसंबंधित गोष्टींची चर्चा या ग्रंथात केली आहे.या ग्रंथाने आधुनिक काळात योगप्रसारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## नाथ परंपरेतील मराठी सारस्वत व वाङ्मय

नाथ परंपरेतील सत्यमलनाथ, शिवदिनकेसरी, विसोबा खेचर, संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, चोंभा कवी हे मराठी सारस्वत आहेत.संत ज्ञानेश्वर हे वारकरी पंथातील प्रमुख संत वंशपरंपरा आणि गुरूपरंपरेने नाथ पंथीय होते.त्यांनी

निर्माण केलेला ‘अमृतानुभव’ म्हणजेच ‘अनुभवामृत’ ग्रंथ नाथ परंपरेत महत्त्वाचा मानला जातो.

१. सत्यमलनाथ : संत ज्ञानेश्वरांनंतरचा महत्त्वाचा नाथ पंथीय पुरुष म्हणजे ‘सत्यमलनाथ’ होय. सत्यमलनाथ यांनी मराठीत ‘सिद्धांतरहस्य’ हा ग्रंथ शके १६०२ मध्ये लिहिला आहे.या ग्रंथात दहा प्रकरणे, सोळा हजार श्लोक आहेत.’ललित प्रबंध’ असे देखील या ग्रंथाचे नाव दिसते.या काव्यग्रंथाची अभंगवृत्तात रचना आहे, तसेच या ग्रंथात वेदान्त निरूपण, ज्ञानेश्वर स्तुती आढळते.
२. शिवदिनकेसरी : केसरीनाथांचे शिष्य असणारे कीर्तनकार ‘शिवदिनकेसरी’ यांनी मराठीत ‘विवेकदर्पण’, ‘ज्ञानप्रदीप’ या ग्रंथांची रचना केली आहे. स्फुट श्लोक, पदे, अष्टके, स्फुट काव्यरचना त्यांनी लिहिली आहे.ठसकेबाजपणा हे शिवदिनकेसरींच्या काव्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. “भाव धरा रे देव अपुलासा करा रे”, “आजि तुम्ही ऐका, सखा सहोदर म्हणजे पैका” ही त्यांची पदे विशेष लोकप्रिय आहेत.त्यांनी विठ्ठल, जगदंबा या देवतांवरही पदरचना केली आहे. शिवदिनकेसरींच्या काव्यात मराठी भाषेविषयी अभिमान दिसतो.
३. विसोबा खेचर : वारकरी संप्रदायातील आद्यसंत असलेल्या नामदेवांचे गुरू म्हणून परिचित ‘विसोबा खेचर’ मूळचे नाथ संप्रदायातील महान योगी होत. विसोबा खेचर यांनी ‘शडूस्छळी’ (षट्स्थळ) या ग्रंथाची रचना केली आहे. या ग्रंथात ६७७ ओवीसंख्या व तीन अध्याय (विभाग) असून वीरशैव तत्त्वज्ञानाचे दर्शन घडते. या ग्रंथात विसोबा खेचरांची गुरूपरंपरा आदिनाथ – मत्येंद्रनाथ – गोरक्षनाथ – मुक्ताई – चांगा वटेश्र्वर – कृष्णनाथ (रामकृष्णनाथ) – खेचर विसा अशी आलेली आहे. या परंपरेतील मुक्ताई

म्हणजे ज्ञानेश्वरभगिनी मुक्ताबाई नाही.श्री नामदेव महाराज गाथामध्ये विसोबांचे दोन अभंग आढळतात. विसोबा पुढे वारकरी संप्रदायाचा एक भाग झालेले आढळतात.

४. चोंभा कवी : नाथ परंपरेतील एक महत्त्वाचा कोळी जातीचा कवी म्हणजे 'चोंभा कवी' होय, हा इसवी सनाच्या चौदाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेला.त्याने 'उखाहरण' या काव्याची रचना इ.स.१३७८ मध्ये केली आहे.या ग्रंथात १८ अध्याय असून २०११ ओवीसंख्या आहे.अनिरुद्ध-उषाच्या प्रेमकथेचे वर्णन असे या ग्रंथाचे कथानक आहे.या काव्यग्रंथात चोंभाची प्रतिभाशाली बुद्धिमत्ता दिसते.हरिहर ऐक्यभावाचे वर्णन, ज्ञानेश्वरकालीन मराठी भाषेचा प्रभाव, पौराणिक थाटाच्या शैलीत लेखन हे 'उखाहरण' चे काही विशेष आहेत.पवाडे, दळवाडे, झळंबले तिन्ही लोक, निसाणा घावो दिला, कोमाइला, उसिणा घाई झुंजावे यासारखे ज्ञानेश्वरकालीन शब्दप्रयोग या ग्रंथात आहेत.

**समारोप**

थोडक्यात नाथ संप्रदायाने मध्ययुगीन काळात भक्ती चळवळ देशीभाषांमधून प्रसारित करण्यात महत्त्वाचे योगदान केले.नाथ संप्रदाय हा महाराष्ट्राच्या पंथ व संत परंपरेतील एक अत्यंत महत्त्वाचा व प्रभावी संप्रदाय मानला जातो. या संप्रदायाची मुळे भारतातील प्राचीन योगपरंपरेत आहेत. नाथ संप्रदायाने महाराष्ट्रात संतपरंपरेला तत्त्वज्ञानाचा पाया दिला.योगाभ्यास, नामस्मरण व भक्तीच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत आध्यात्मिक साधना पोचवली.नाथ संप्रदायाने पुढे संत परंपरेवरही प्रभाव टाकला. ज्ञानेश्वर महाराजांच्या 'अमृतानुभव' या ग्रंथावर नाथ पंथाचा प्रभाव स्पष्ट दिसतो.

# नाथ संप्रदाय







# वीरशैव लिंगायत संप्रदाय

कर्नाटक व महाराष्ट्र प्रामुख्याने या दोन राज्यांमध्ये पसरलेला भक्ती संप्रदाय म्हणजे 'वीरशैव लिंगायत संप्रदाय' होय. या पंथाला 'शिवाद्वैत धर्म', 'शैवागम' असेही म्हणतात.इसवी सनाच्या बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर(इ.स. ११०५ – इ.स. ११६७) यांनी 'वीरशैव लिंगायत' संप्रदायाचे प्रवर्तन केले.महात्मा बसवेश्वर हे क्रांतिकारक समाजसुधारक, मानवतावादी विश्वकवी, क्रियाशील नेते, स्त्री स्वातंत्र्याचे आद्य प्रणेते व आद्य समाजसुधारक असून त्यांनी विश्वबंधुतत्वाचा संदेश दिला आहे.बसवेश्वरांनी श्रमतत्त्वज्ञान स्पष्ट केले व श्रमाला प्रतिष्ठा दिली.काही अभ्यासक 'एकांत रामय्या' यास वीरशैव लिंगायत पंथाचे संस्थापक मानतात.जातवेद मुनींनी महात्मा बसवेश्वरांना वीरशैव संप्रदायाची दीक्षा दिली, असे काही वीरशैव मानतात.बहुतांश विद्वान महात्मा बसवेश्वर यांनाच 'वीरशैव लिंगायत संप्रदाय' संस्थापक मानतात.वीरशैव, पंचाचार्य परंपरा बसवपूर्व आहे.लिंगायत संप्रदाय मानवतेची शिकवण, साधी राहणी, उच्च विचारसरणी व सामाजिक सुधारणांना महत्त्वाचे मानले जाते. गळ्यातील इष्टलिंग हे सत्याचे प्रतीक आहे.सर्व समान आहेत, हा वीरशैव लिंगायत पंथाचा आधार आहे.या संप्रदायात ब्राह्मणी वर्चस्ववादाला विरोध केला.या पंथाने वेदप्रामाण्य, वैदिक धर्मव्यवस्था नाकारली आहे.हा संप्रदाय महात्मा बसवेश्वर यांच्या विचारधारेवर चालणारा आहे.लिंगायत कट्टर शाकाहाराला महत्त्व असून, मद्य, मांस, भिक्षेत मिळणारे अन्न निषिद्ध आहे.

"वी शब्देन उच्चते विद्या शिवजीवैक्यबोधिका।
तस्या रमन्ते ये शैवा वीरशैवास्तु ते मता:।।"

अशी वीरशैवांची संस्कृतमध्ये व्याख्या केली जाते. या श्लोकाचा मराठी अर्थ " 'वी' या अक्षराने शिव आणि जीव यांच्या एकरूपतेचे ज्ञान देणाऱ्या विद्येचा बोध होतो.

जो शैव या विद्येत रमतो, तो ‘वीरशैव’ होय.”असा आहे.वेद व आगाम यांचा कर्ता शिव हा एकच आहे, असे लिंगायत मानतात.जातिभेद दूर करून मानवतावादी समाज निर्माण करावा, ही लिंगायत आचारधर्माची शिकवण आहे.

**वीरशैव लिंगायत संप्रदाय परिचय**

१. इसवी सनाच्या बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर(इ.स. ११०५ – इ.स. ११६७) यांनी ‘वीरशैव लिंगायत’ संप्रदायाचे प्रवर्तन केले.
२. वीरशैव लिंगायत संप्रदायाचे प्रमुख उपास्य दैवत शिव आहे.
३. लिंगायतांना लिंगवंत, शरण, बसव धर्म किंवा जंगम धर्म या नावांनीही ओळखले जाते.
४. वीरशैव लिंगायत संप्रदाय एकेश्वरी संप्रदाय मानला जातो.
५. वीरशैव लिंगायत संप्रदायाची धर्मभाषा कन्नड ही आहे.
६. वीरशैव लिंगायत संप्रदायाने पंथप्रसार व संहित्यनिर्मितीसाठी कन्नड, मराठी या लोकभाषांचा स्वीकार केला आहे.
७. ‘कायकवे कैलास’ म्हणजेच ‘कार्य हेच कैलास आहे’ या तत्त्वाला या पंथात महत्त्व आहे.
८. वीरशैव लिंगायत या पंथात श्रमप्रतिष्ठेला विशेष महत्त्व आहे.
९. वीरशैव लिंगायत संप्रदायाचे तत्त्वज्ञान शक्तिविशिष्टाद्वैती स्वरूपाचे आहे.
१०. वीरशैव लिंगायत या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात बुद्धीप्रामाण्यवाद आणि अनुभावी विचारांना महत्त्व दिले जाते.
११. वीरशैव लिंगायत या पंथाच्या दर्शनात ‘षट्स्थल’ ‘शिवाचार’(सामाजिक समानता) महत्त्व आहे.भक्तिस्थल, महेश्वरस्थल, प्रसादीस्थल, शरणस्थल, ऐक्यस्थल ही ‘षट्स्थल’ आहेत.

१२. वीरशैव लिंगायत संप्रदायाचे धर्मचिन्ह इष्टलिंग आहे, तसेच धर्मसंस्कार लिंगधारण म्हणजेच इष्टलिंग हा होय.

१३. इष्टलिंग हे ज्ञानाचे, भक्तीचे, ब्रह्मांडाचे प्रतीक आहे.

१४. वीरशैव लिंगायत या संप्रदायातील लिंग उपासना निर्गुण, निराकार परमात्म्याची उपासना मानली जाते, लिंग समन्वयशीलता, परब्रह्माचे प्रतीक मानले जाते.

१५. वीरशैव लिंगायत पंथात अष्टावरणाला महत्त्व आहे, गुरू, लिंग, जंगम, पादोदक, प्रसाद, विभूती, रुद्राक्ष, मंत्र ही अष्टावरणे आहेत.

१६. वीरशैव लिंगायत संप्रदाय शून्य सिद्धांताला मानतो.

१७. वीरशैव लिंगायत संस्कृती अवैदिक शरण संस्कृती मानली जाते.या संस्कृतीमध्ये सदाचार(कायक-दासोह-प्रसाद), गणाचार (धर्म सरंक्षककर्ता), भृत्याचार(स्वयंसेवक, करसेवा) यांना महत्त्व आहे.

१८. वीरशैव लिंगायत संप्रदायात लिंगाचार, सदाचार, शिवाचार, गणाचार, भृत्याचार यांना महत्त्व आहे.

१९. वीरशैव लिंगायत संप्रदायाची बसवकल्याण ही शरणभूमी, तर कुडलसंगम हे ऐक्यक्षेत्र आहे.

२०. वीरशैव लिंगायत संप्रदायाचे परमध्येय 'लिंगांगसामरस्य' म्हणजे शिव-जीव ऐक्य हे होय.

२१. वीरशैव लिंगायत संप्रदायात 'सिद्धांत शिखामणी' हा जगद्गुरू रेणुकाचार्य हा धर्मग्रंथ व कन्नड वचन साहित्य महत्त्वाचे आहे.

२२. वीरशैव लिंगायत संप्रदायाचे ध्येय हे जाति-वर्ण-वर्ग रहित धर्मासोबत शरण समाज निर्माण (कल्याण राज्य निर्माण) आहे.

## वीरशैव लिंगायत ध्वज

लिंगायत धर्माचा एक अधिकृत ध्वज नाही, परंतु सामान्यतः वापरला जाणारा एक ध्वज असून त्यात पंचरंगी पट्ट्या आणि मध्यभागी एक तारांकित लिपीचिन्ह असते, जी धर्माची ओळख दर्शवते. हा ध्वज लिंगायत अनुयायांच्या एकात्मतेचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे.

## ध्वजाची वैशिष्ट्ये

१. ध्वजावर पाच रंगांचे पट्टे असतात, जे लिंगायत धर्माच्या प्रमुख तत्त्वांचे आणि शिकवणींचे प्रतिनिधित्व करतात.
२. ध्वजाच्या मध्यभागी एक तारांकित लिपीचिन्ह (ज्याला कधीकधी "शंकराचे चिन्ह" देखील म्हटले जाते) असते, जी इष्टलिंगाचे प्रतीक आहे.
३. हा ध्वज लिंगायत समुदायाच्या एकतेचे आणि इष्टलिंगावरील श्रद्धेचे प्रतीक आहे.

विशेषतः धार्मिक मिरवणुकांमध्ये आणि समारंभांमध्ये समुदायाची ओळख आणि एकतेचे प्रदर्शन करण्यासाठी हा ध्वज वापरला जातो.

## वीरशैव लिंगायत संप्रदाय तत्त्वज्ञान

शक्तिविशिष्टाद्वैत हा वीरशैव सिद्धांताचा एक महत्त्वाचा भाग आहे, ज्यामध्ये शिव आणि त्याची शक्ती (ऊर्जा) अविभाज्य मानले जातात, एकरूप असूनही भिन्न आहेत. या सिद्धांतानुसार, शिव हा परब्रह्म आहे आणि शक्ती ही शिवामध्ये नेहमी वास करते, त्यांचे अस्तित्व एकरूप असते. विश्वाच्या निर्मितीमध्ये शिवाचा अंश असल्यामुळे, शिवामध्येही शक्ती असतेच, ज्यामुळे शिव व शक्तीच्या एकात्मतेचे स्पष्टीकरण मिळते. शक्तिविशिष्टाद्वैतानुसार, शिव आणि शक्ती एकच आहेत, परंतु त्यांचे दोन भिन्न स्वरूप आहेत. जसे सूर्यामध्ये किरणे असतात आणि किरणांमध्ये

सूर्य असतो, त्याचप्रमाणे शिव आणि शक्ती यांच्यात एक संबंध आहे. हा सिद्धांत वीरशैव दर्शनाशी संबंधित आहे आणि शिवागमांवर आधारित आहे. या दर्शनानुसार, ईश्वर म्हणजे शिव असून तो नेहमी शक्तीने युक्त असतो. विश्वाची निर्मिती करताना शिवाच्या अंशात शक्ती असतेच. शिवाच्या ठिकाणची शक्ती ही दोन प्रकारची असू शकते. वीरशैववाद चार घटकांना महत्त्व देतो: प्रकृति (पदार्थ), पुरुष (स्व), परा-प्रकृती आणि परब्रह्म (आत्मा). या चार घटकांमध्ये अविभाज्य संबंध असतो, हे शक्तिविशिष्टाद्वैतामधून स्पष्ट होते. थोडक्यात, शक्तिविशिष्टाद्वैत म्हणजे 'शक्तीने युक्त असलेले अद्वैत' होय, जिथे शिव आणि त्याची शक्ती एक आहेत पण त्यांच्या रूपांचे भेद आहेत.

## वीरशैव लिंगायतांचे वाङ्मय

वीरशैव लिंगायत अनुयायांनी कन्नड व मराठी या लोकभाषांमध्ये मोठ्या प्रमाणावर साहित्यनिर्मिती केली आहे.

**वचन साहित्य :** महात्मा बसवेश्वर यांनी इसवी सनाच्या बाराव्या शतकात बसवकल्याण येथे ‘शिवानुभव मंटप’(अनुभव मंटप) स्थापन केले.या धार्मिक संसदेतून कन्नड भाषेमध्ये विपुल वचनसाहित्य निर्माण झाले.लिंगायतांनी कन्नडमध्ये निर्माण केलेले जीवनवादी साहित्य म्हणजे ‘वचनसाहित्य’. हे कन्नडमधील आद्य साहित्य मानता येईल.अनेक शैव संतांद्वारा वेळोवेळी सांगितली गेलेली वचने हे ‘वचन साहित्य’ होय. कन्नडमध्ये वचन साहित्याला ‘वचनशास्त्र’ म्हटले जाते. एम.एम.कलबुर्गी यांनी ‘सुंदर आचरणाची सुंदर अभिव्यक्ती म्हणजे वचन’ अशी वचनांची व्याख्या केली आहे. वचन साहित्याला आठशे वर्षांचा इतिहास आहे. वचन निर्मितीच्या प्रारंभकाळी वचनांना ‘सुक्ती’ म्हणून संबोधले जायचे.कन्नड संस्कृतीत शैवसंतांना ‘शिवशरणरू’ म्हटले जाते. जेडर दासिमैयाँ व अजगण्णा हे बसवण्णाचे पूर्वसुरीचे शरण मानले जातात. वचनांचे वर्गीकरण खालील

प्रकारात केले जाते : १. सूत्रात्मक, २. वर्णनात्मक, ३. उपदेशात्मक, ४. प्रार्थनात्मक, ५. सती -पती भावात्मक, ६. विरक्तात्मक, ७. गूढात्मक आणि ८. आत्मगत. आशयानुसार वचनाचे आध्यात्मिक, सामाजिक व लिंगायतधर्मीय असे तीन प्रकार साधारणपणे मानता येते. अनुभव मंटपाचे पहिले अध्यक्ष अल्लमप्रभू यांची वचने ही आध्यात्मिक स्वरूपाची, बसवण्णांची वचने ही सामाजिक स्वरूपाची, तर बसवण्णांचे भाचे चन्नबसवण्णा (अनुभव मंटपाचे तिसरे आणि अखेरचे अध्यक्ष) यांची वचने लिंगायतधर्मीय अशा स्वरूपाची आढळतात. याच विभागणीमध्ये ७७० शरण-शरणींची वचने विभागता येतील. या ७७० शरणांमध्ये ७० स्त्रिया होत्या व त्याही वचननिर्मिती करीत होत्या हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

वचन साहित्यात भक्ती, समर्पणभाव, सदाचारी वर्तन, आत्यंतिक प्रेम, शांती यांनी युक्त यथार्थ जीवन, आध्यात्मिक अनुशासन यांचे विवेचन सामर्थ्यपूर्ण भाषेत वचनसाहित्यात केले आहे. वचनामध्येही शरण संतांनी आपली ओळख दाखवणारी वचनांकिते वापरली आहेत. त्यांनी थेट स्वतःचे नाव वापरले नाही. पण ते ज्या गावातून किंवा प्रदेशातील आलेले आहेत तिथल्या प्रसिद्ध शिवस्थानाचे नाव त्यांनी वापरले आहे. उदा. बसवण्णा कुडल संगमशी संबंधित होते,म्हणून ते शिवस्थान कुडलसंगमेश्वर असे वचनांकित वापरतात. बसवण्णा व त्यांचे शरण सहकारी सिद्धरामय्या, अल्लमप्रभू, माडिवाळ माचय्या, चन्नबसवण्णा, अक्कमहादेवी, नागम्मा इत्यादी शरण-शरणींची वचने अत्युच्च दर्जाची व साहित्यिक उंची दाखविणारी आहेत. विशेषतः अक्कमहादेवीची वचने ही इतर वचनकारांपेक्षाही अधिक श्रेष्ठ आहेत. अनुभव मंटप अस्तित्वात आल्यानंतर मोठ्या प्रमाणात या प्रकारच्या नीतीविचारांची निर्मिती होऊ लागली, तेव्हा त्याला वचन म्हटले जाऊ लागले होते. बसवोत्तर काळात वचनांना लिंगायत धर्माचे ‘आगम’ म्हणजे शास्त्र म्हणून मान्यता मिळाल्यावर वचनांना ‘वचनागम’ असेही संबोधले जाऊ लागले. वचन साहित्यात प्रामुख्याने मानवी मुल्यांचा आत्मस्वर आविष्कृत झाला असून

त्याचबरोबर वीरशैव संप्रदायातील शक्ती-विशिष्टाद्वैत, षटस्थल, अंगलिंग- संबंध, लिंगधारणादी अष्टावरण इत्यादी उपासनात्मक बाबीही त्यात प्रकट केल्या आहेत.

कन्नड वचन साहित्याची नेमकी संख्या देणे कठीण आहे, कारण यात अनेक वचनकारांच्या हजारो वचनांचा समावेश आहे.बसव समितीने २५०० वचनांचे संकलन केले आहे.

## वीरशैव लिंगायतांचे मराठी वाङ्मय

मध्ययुगीन मराठीत लिंगायत संतकवींनी विपुल रचना केली आहे.शांतलिंग स्वामी, मन्मथस्वामी, शिवलिंग, लिंगेश्वर, बसवलिंग, महादेव, लक्ष्मण महाराज, शिवडस, गुरुदास, चन्ना, बाळाबुवा कबाडी, शंकर मुगेंद्र, शिवगुणदास, बसवदास, भावंडीबाई हे मराठी भाषेत लिहिणारे वीरशैव रचनाकार आहेत.यातील शांतलिंग स्वामी, मन्मथस्वामी हे वीरशैव रचनाकार महत्त्वाचे मानले जातात.

शांतलिंग स्वामी(इ.स.१५५३-इ.स.१६२३) हे शिंगणापूर येथील संतकवी आहेत.त्यांना शिवयोगी, शांतेश्वर, शांतनीळकंठ या नावांनी देखील ओळखले जाते.त्यांनी मराठीत विवेकचिंतामणी, शांतबोध, करणहसुगे(कर्णहस्तुकी) हे ग्रंथ लिहिले आहेत. या ग्रंथात त्यांनी वीरशैव तत्त्वज्ञानाचे विवेचन केले आहे.निजगुणस्वामी यांच्या ‘विवेकचिंतामणी’ या कन्नड ग्रंथाचा अनुवाद शांतलिंग स्वामी यांनी केला आहे, यात ‘षट्स्थल’ सिद्धांताचे विवेचन आहे. करणहसुगे(कर्णहस्तुकी) हा वेदांतातील पंचीकरण या विषयावरील ग्रंथ आहे.

मन्मथस्वामी (इ.स.१५६०-इ.स.१६१३) हे मराठवाड्यातील कपिलधार येथील एक वीरशैव संत व कवी होते. मन्मथस्वामी हे संत तुकारामांचे समकालीन असून आद्य शैव अभंगरचनाकार मानले जातात.मन्मथस्वामींनी मराठीत विपुल काव्यरचना व ग्रंथरचना केली आहे. त्यांनी षट्स्थलसिद्धांतावर रचलेल्या

‘परमरहस्य’ या आध्यात्मिक ग्रंथाची रचना केली आहे.परमरहस्य या ग्रंथात शक्तिविशिष्टाद्वैत, षट्स्थल, अष्टावरण या सिद्धांतांचे सुगम विवेचन आढळते. गुरूनागी, गुरूप्रसाद, शिवगीता, शिवस्तोत्र, अनुभवानंद, स्वयंप्रकाश, आनंदलहरी, अभंगगाथा इ. मराठी ग्रंथरचना त्यांच्या नावावर सांगितली जाते.

**समारोप**

थोडक्यात, लिंगायत संप्रदाय हा एक सामाजिक सुधारणावादी आणि शैव धर्मातील एकेश्वरवादी पंथ आहे.वीरशैव लिंगायत या संप्रदायाची धर्मभाषा कन्नड असून, वीरशैव लिंगायत अनुयायांनी कन्नड व मराठी या लोकभाषांमध्ये विपुल प्रमाणावर साहित्यनिर्मिती केली आहे.

# वीरशैव लिंगायत संप्रदाय



महात्मा बसवेश्वर



मन्मथस्वामी

## लिंगायत ध्वज



# वीरशैव लिंगायत संप्रदाय

अनुभव मंटप (जगातील पहिली लोकशाही संसद)







अल्लमप्रभु



अक्कमहादेवी



**चन्न बसवण्णा**

# दत्त संप्रदाय

मध्ययुगीन काळातील एक महत्त्वाचा महाराष्ट्रातील भक्त संप्रदाय म्हणजे ‘दत्त संप्रदाय’ होय. दत्त संप्रदायाची उपास्य देवता दत्तात्रेय आहेत.दत्त हे दैवत आदर्श संन्यासी, योग अधिपती, आदर्श गुरू मानले जाते. पुराणे व अर्वाचीन पाच उपनिषदांतून दत्तास वर्णाश्रमधर्माची प्रतिष्ठा राखणारा, गुरुतत्त्वाचा आदर्श आणि योगाचा उपदेशक म्हटले आहे.दत्त हे दैवत इ.स.पाचव्या शतकातील पुराण वाङ्मयात लोकप्रिय झाल्याचे आढळते.मार्कंडेय पुराणात सतराव्या-अठराव्या अध्यायात दत्तात्रेयांचा उल्लेख आढळतो.दत्त संप्रदाय हा प्रत्यक्षवादी, सगुणवादी अवधूत संप्रदाय आहे.दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान ‘अद्वैती तत्त्वज्ञान’ आहे.दत्त परंपरेत गुरुचरणांना खूप महत्त्व आहे.नृसिंह सरस्वती या महाराष्ट्रीय विभूतीमुळे दत्त संप्रदाय महाराष्ट्रात अधिक लोकप्रिय झाला.महाराष्ट्रात दत्त पंथाचा जातिभेदातीत, संप्रदायातीत, धर्मातीत प्रसार झालेला आढळतो.गुरुतत्त्वाची शिकवण, आत्म्याचे परमात्म्याशी एकरूप होणे, योगाच्या माध्यमातून आंतरिक अनुभूती प्राप्त करणे ही या संप्रदायाची काही वैशिष्ट्ये आहेत.जीवनाला आवश्यक असलेल्या मंत्रशास्त्राचे संवर्धन करण्याचे महान कार्य दत्त पंथाने केले आहे.नृसिंह सरस्वती हे दत्त संप्रदायाचे प्रवर्तक आहेत.या संप्रदायात वर्णाश्रमधर्माचे विशेष महत्त्व आहे.पुराणे व पाच उपनिषदे यांतून वर्णाश्रमधर्माची प्रतिष्ठा राखणारी, गुरुतत्त्वाचा आदर्श, योगाचा उपदेशक असे दत्त परंपरेचे वर्णन करता येईल.दत्त हा अवधूत जोगी आहे.दत्त उपासनेला संप्रदायाचे स्वरूप नृसिंह सरस्वती यांच्यामुळेच प्राप्त झाले.श्रीपाद श्रीवल्लभ हे दत्तात्रेयांचे पहिले अवतार मानले जातात, तर नृसिंह सरस्वती हे दत्तात्रेयांचे दुसरे अवतार मानले जातात.अक्कलकोट स्वामी समर्थ म्हणजेच नृसिंह

भान हे दत्तात्रेयांचे तिसरे अवतार मानले जातात.माणिकप्रभू हे दत्तात्रेयांचे चौथे अवतार मानले जातात.

जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, अक्कलकोट स्वामी समर्थ, वासुदेवानंद सरस्वती, या महापुरुषांनी दत्त संप्रदायाची परंपरा अविरत चालू ठेवली.दत्ता पंथांने शैव-वैष्णव, हिंदू-मुस्लिम समन्वयवादी विचार मांडला. दत्त संप्रदायात पुजोपचारासाठी मूर्तीऐवजी पादुका प्रशस्त मानल्या जातात.दत्त संप्रदायाच्या औदुंबर, नरसोबाची वाडी, गाणगापूर या ठिकाणी दत्त पादुकांची स्थापना केली आहे.पांचाळेश्वर, नरसोबाची वाडी, माहुर, गाणगापूर, लाड कारंजे, कुरवपूर, गिरनार ही दत्त परंपरेतील महत्त्वाची स्थाने आहेत.गुरुचरित्र या मराठी ग्रंथाचे रचनाकार सरस्वती गंगाधर यांची मातृभाषा कानडी होती.तेलुगू भाषेत दत्त परंपरेबद्दल लिखाण वेंकटराव यांनी केले आहे.सौराष्ट्रात दत्तोपासना बाबा किनराम अघोरी या सत्पुरुषाने अठराव्या शतकात सुरू केली, त्यांना गिरनार येथे दत्तात्रेयांचा साक्षात्कार झाला होता.

**दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान**

दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान 'अद्वैती तत्त्वज्ञान' आहे.

१. ब्रह्म हे अखिल, अभंग, निरुपाधिक, शुद्ध, शांत, निर्गुण, नित्यानंद आहे.तेच जगद्रूपाने नटलेले आहे.
२. परब्रह्माची त्याहून निराळी असणारी इच्छाशक्ती म्हणजे प्रकृती, तिच्यापासून त्रिगुणात्मक मात्रा, भूतसृष्टी व तिन्ही लोक उत्पन्न होतात.
३. जे मूळ परब्रह्म स्वरूप आहेत, परंतु भिन्न -भिन्न देह धारण केल्यामुळे भिन्न भिन्न दिसतात, ते जीव होत.

## दत्त संप्रदाय व इतर परंपरा

श्रीपाद श्रीवल्लभ पंथ, निरंजन रघुनाथ , प्रकाश, स्वरूप, चैतन्य, आनंद, आळंदीतील नृसिंह सरस्वती, विदर्भातील देवनाथ स्वामी, आनंद संप्रदाय, स्वामी समर्थ, अवधूत आणि सकलमत या उप-परंपरा दत्त संप्रदायांतर्गत इतर पंथ-परंपरा आहेत.

महानुभाव पंथाचे आदिकारण दत्त होय, असे चक्रधरांनी म्हटले आहे. त्यांचा दत्तात्रेय त्रिमुखी नसून तो एकमुखी, चतुर्भुज आहे. तो परब्रह्माचा अवतार आहे. सूत्रपाठ, लीळाचरित्र इ. महानुभाव ग्रंथांतूनही दत्तमाहात्म्य वर्णिले आहे.महानुभाव वाङ्मयातील साती काव्यग्रंथात समाविष्ट उद्धवगीता या कवीश्वरबास म्हणजेच भास्करभट्ट बोरीकर यांच्या काव्यात दत्तात्रेयाला नमन केली आहे, तर रवळो व्यासांच्या सैह्याद्रिवर्णन या काव्यग्रंथ दत्तमहिमेवर आधारित आहे.

वारकरी संप्रदायातील संतांनी तसेच आनंद संप्रदायी लोकांनी दत्तात्रेयाविषयी आदर व्यक्त केला आहे.संत तुकारामांनी आपल्या अभंगात ‘‘तीन शिरे सहा हात तया माझे दंडवत’’ असे दत्ताचे वर्णन केले आहे.दत्तात्रेयाने प्रवर्तिलेल्या चैतन्य संप्रदायाच्या एका शाखेत एकोणिसाव्या शतकात भैरव अवधूत नावाचे एक सत्पुरुष झाले. त्यांनी आपल्या ‘ज्ञानसागर’नामक ग्रंथात दत्तोपासनेचा प्रचार केला आहे.समर्थ संप्रदायातील दासबोध या प्रमुख ग्रंथावर दत्त परंपरेतील ‘अवधूतगीता’ व ‘गुरूगीता’ या ग्रंथांचा प्रभाव आढळतो.

## दत्त संप्रदायातील वाङ्मय

‘अवधूतगीता’ हा ग्रंथ दत्त परंपरेत प्रमाण मानला जातो.अथर्ववेदात ‘दत्तात्रेय उपनिषदा’ चा समावेश आहे.प्रत्यक्ष दत्तगुरूंनी ‘दत्तसंहिता’ हा ग्रंथ रचला

असल्याची दत्त परंपरेत मान्यता आहे.परशुराम यांनी ‘दत्तसंहिता’ या ग्रंथावर आधारित ‘परशुराम कल्पसूत्र’ हा पन्नास खंडांचा ग्रंथ निर्माण केला.या ‘परशुराम कल्पसूत्रा’ वर सुमेधाने ‘त्रिपुररहस्य’ नावाची रचना केली.प्राचीन काळात अवधूतोपनिषद, जाबालदर्शनोपनिषद, दत्तात्रयोपनिषद ही तीन उपनिषदे दत्त अवतारावर आधारित उपनिषदे रचली गेली.दत्तमाहात्म्य व दत्तप्रबोध हे दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञानात्मक ग्रंथ आहेत.अनंतसुत विठ्ठलबोवा उर्फ कावडीबुवा यांनी ‘दत्तप्रबोध’ हा ग्रंथ शके १७८२ मध्ये रचला असून त्यात ६१ अध्याय व १४२३६ ओव्या आहेत. ‘दत्तप्रबोध’ मध्ये दत्तात्रेय कथा, सिद्धांच्या कथा, गुरूपरंपरेतील सत्पुरुषांच्या कथा रचलेल्या आहेत.‘गुरूलीलामृत’ हे वामनबोवा यांचे काव्य अक्कलकोट स्वामींचे शके १७८५ मधील चरित्र असून, त्यात ५५ अध्याय ९७५७ ओव्या आहेत.दत्तमाहात्म्य या ग्रंथाची रचना टेंबेस्वामी यांनी केली आहे.गुरुचरित्र या सरस्वती गंगाधर यांच्या ग्रंथात दत्त संप्रदायाचा आचारधर्म सांगितला आहे.गुरुचरित्र हा दत्त परंपरेतील प्रमुख ग्रंथ असून, त्याची रचना इ.स.१४८० मध्ये झाली आहे.गुरुचरित्रामध्ये ५२ अध्याय असून ७४९१ ओव्या आहेत.मंगलाचरण, गुरूभक्ती, गुरूप्रसाद हे या ग्रंथाचे तीन मुख्य भाग आहेत.अवधूत गीता, गुरूगीता, जीवन्मुक्तगीता या ग्रंथात दत्त संप्रदायाच्या सिद्धांताचे निरूपण केले आहे. गुरुचरित्र या मराठी ग्रंथाचे रचनाकार सरस्वती गंगाधर यांची मातृभाषा कानडी होती.तेलुगू भाषेत दत्त परंपरेबद्दल लिखाण वेंकटराव यांनी केले आहे. बाबा किनराम अघोरी या सत्पुरुषाने ‘विवेकसार’ हा ग्रंथ लिहिला.दत्त परंपरेतील ‘श्रीदत्तलीलामृताब्धीसार’ हा ग्रंथ इ.स.१८९७ मध्ये रचला गेला.

‘करुणात्रिपदी’ ही करुणरस प्रधान दत्त उपासनेपर भक्ती स्तोत्र रचना वासुदेवानंद सरस्वती यांनी केली आहे.’दत्तपुराण’ हे आधुनिक पुराण वासुदेवानंद सरस्वती यांनी लिहिले आहे.बापनाचार्युलु यांनी रचलेले संस्कृत ‘सिद्धमंगल स्तोत्र’

श्रीपाद श्रीवल्लभ महिमापर असून त्यांच्या नित्य उपासनेत समाविष्ट आहे.दत्त बावनी हे संत श्री रंग अवधूत महाराज यांनी रचलेले बावन्न ओळींचे स्तोत्र आहे, जे दत्तगुरु, श्रीपाद श्रीवल्लभ आणि नृसिंह सरस्वती स्वामी यांच्या लीलांचे वर्णन करते.मूळ दत्तबावनी गुजराती आहे.

**दत्त संप्रदायातील मराठी सारस्वत**

दत्त संप्रदायाची धर्मभाषा प्रामुख्याने मराठीच आहे.दत्त परंपरेतील बहुतांश मुख्य ग्रंथ मराठीतच आहेत.सरस्वती गंगाधर, जनार्दन स्वामी, संत एकनाथ म्हणजे एकनाथ स्वामी, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, नारायण महाराज जालवणकर हे काही दत्त सांप्रदायिक मराठी सारस्वत आहेत.सरस्वती गंगाधर जरी कानडी भाषिक असले, तरी त्यांनी मराठी भाषेतच 'गुरुचरित्र' हा दत्त पंथाचा प्रमुख ग्रंथ रचला आहे.

जनार्दन स्वामी(शके १४२६ ते १४९७)(इ.स.१५०४ ते १५७५) : जनार्दन स्वामी हे संत एकनाथांचे गुरू असून दत्तभक्त होते.त्यांनी पंचीकरणावर 'आत्मानात्म विवेकसार' हा ओवीवृत्तात्मक मराठी ग्रंथ रचला, तर 'जीवप्रबोध' हा तेलुगू ग्रंथ लिहिला आहे.जनार्दन स्वामींनी उपनिषदवेदान्तावर 'भावगीता' रचिली.त्यांनी अनेक दत्तभक्तिपर स्फुट अभंगरचना केल्या आहेत.

एकनाथ स्वामी (इ.स.१५३० ते १५९९) : संत एकनाथ म्हणजेच एकनाथ स्वामी हे वारकरी व दत्त या दोन्ही पंथात महत्त्वाचे मानले जातात.दत्त-विठ्ठल भेद नाही, अशी त्यांची श्रद्धा होती.एकनाथांनी यदु-अवधूत संवादातून अवधूत-दत्तात्रेय ऐक्य कल्पून दत्तभक्ती व्यातक केली आहे.त्यांच्या अभंग वाङ्मयात दत्तमहिमा, दत्तमानसपूजा, व्यक्त केली आहे.एकनाथांनी दत्तजन्मावर ६७ ओव्यांचे लहान प्रकरण लिहिले आहे.

''त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।

त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।"

ही दत्ताची आरती एकनाथ स्वामींनीच रचली आहे. "दत्त माझी माता। दत्त माझा पिता।" असे दत्तदर्शनाचे अनुभव व्यक्त करणारे अभंग एकनाथांनी रचले आहेत.

दासोपंत(इ.स.१५५१ ते १६१५) : दासोपंत हे दासो दिगंबर म्हणूनही ओळखले जातात.दासोपंत यांना नाथपंचकातील प्रमुख संतकवी मानले जाते.ते आंबेजोगाई येथे वास्तव्यास होते.दासोपंतांनी सुमारे १०० ग्रंथांचे लिखाण केले आहे.गीतार्णव, गीतार्थबोधचंद्रिका, पदार्णव, वाक्यवृत्ती(गद्यग्रंथ), पंचीकरण, दत्तात्रेय माहात्म्य इ.ग्रंथांचे लेखन दासोपंतांनी केले आहे.

नामामृतस्तोत्र, प्रबंधस्तोत्र, शिवस्तोत्र, गुरूस्तोत्र, षोडशस्तोत्र इ.स्तोत्रे दासोपंतांनी रचली आहेत. गीतार्णव हा सव्वा लाख ओवीसंख्या असलेला बृहद काव्यग्रंथ असून, त्यातील १२०५५ ओव्याचे उपलब्ध आहेत.या ग्रंथात दासोपंतांनी स्वतःचा उल्लेख 'दिगंबरानुचर' असा केला आहे.'ग्रंथराज' हा १२०० ओवीसंख्या असलेला काव्यग्रंथ दासबोधाचा पूर्ववतारच होय. गीतार्थबोधचंद्रिका हे ८८८९ ओव्याचे काव्य गीताभाष्य आहे.पदार्णव हे सव्वा लाख स्फुट पदांचा बृहद काव्यग्रंथ असून, त्यातील १६०० पदेच उपलब्ध आहेत.ही पदे अंतःशुद्धी व भक्तीवर आधारित आहेत.पासोडी हे दासोपंतांचे अनोखे पंचीकरणावर आधारित काव्य असून त्याचे लेखन ४० फुट पासोडीवर केले आहे.

मुक्तेश्वर(इ.स.सतरावे शतक) : संत एकनाथांचा नातू असलेला मुक्तेश्वर हा मराठीतील प्रसिद्ध पंडित कवी, कलाकवी मानला जातो.तो दत्तभक्त असून, स्वतःला दत्ताच्या पदकमळातील भ्रमर असे म्हणत असे.त्याला रामायण लिहिण्याची प्रेरणा नरसोबाच्या वाडीला झाली.त्याचे स्वतःचे नाव 'मुद्गल' होते, त्याने आपल्या आराध्य देवतेचे नाव 'मुक्तेश्वर' स्वीकारले.तो स्वतःला 'अवधूत' म्हणतात असे.

निरंजन रघुनाथ(शके १७०४ ते १७८९)(इ.स.१७८२-१८५५) : निरंजन रघुनाथ हे दत्तोपासक होते. निरंजनस्वामींनी स्वत:च आत्मचरित्रपर 'आत्मप्रचीति' व 'साक्षात्कार' अशी दोन प्रकरणे ओवीबद्ध, रसाळ व उद्बोधक अशी लिहिली आहेत. स्वात्मप्रचिती, साक्षात्कार यांसारखी दत्तभक्ती अनुभवांवर प्रकरणे त्यांनी रचली आहेत.

नारायण महाराज जालवणकर(शके १७२९ ते १७८९) : नारायण महाराज जालवणकर हे निरंजन रघुनाथांचे शिष्य होत.त्यांनी दत्तभक्तिपर 'सप्तसागर' या ग्रंथाचे लेखन केले आहे.चिद्ररत्नमाला, गुरूपादुकाष्टक, बोधाष्टक, निर्वाणपंचक, सिद्धयोगाष्टक अशी स्तोत्रे, धावे, स्फुट पदे अशी विपुल रचना नारायण महाराज जालवणकर यांनी केली आहे.

**समारोप**

थोडक्यात दत्त परंपरेत जात, धर्म किंवा संप्रदायातील भेदभावापलीकडे भक्तजन आहेत. दत्त पंथाने बहामनी इस्लामी राजवटीत वैदिक धर्माविषयी अभिमान जागृत करून हिंदू धर्माचे पुनरूज्जीवन केले.दत्त परंपरेने हिंदू-मुस्लिम ऐक्य व या दोन भिन्न संस्कृतीतील संघर्षाची धार बोथट करण्याचे कार्य केले.दत्त संप्रदाय एक सोपी आध्यात्मिक वाटचाल शिकवतो, ज्यामुळे अनेक भक्तांना आत्मशांती मिळते.

# दत्त संप्रदाय




दत्तात्रेय श्रीपाद श्रीवल्लभ



श्रीनृसिंह सरस्वती

# समर्थ संप्रदाय

समर्थ संप्रदाय शिवकाळात समर्थ रामदास यांनी स्थापन केलेला अत्यंत महत्त्वाचा पंथ आहे. समर्थ रामदास यांच्या कार्य, शिकवणुकीतून प्रवर्तित झालेला संप्रदाय म्हणजे ‘समर्थ किंवा रामदासी संप्रदाय’ होय.समर्थ संप्रदायातील शिष्य, अनुयायी यांना ‘रामदासी’ असे म्हणतात, म्हणून समर्थ संप्रदायाला ‘रामदासी संप्रदाय’ असेही म्हणतात.

## रामदासी पंथाचा परिचय

इस्लामचे सार्वत्रिक स्वरूपाचे धार्मिक व राजकीय आक्रमण यांच्या विरोधाच्या प्रेरणेतून रामदासी पंथाची स्थापना झाली.समर्थ संप्रदायाचे उपास्य दैवत श्रीराम, हनुमान हे आहेत.“जय जय रघुवीर समर्थ” हा या संप्रदायाचा मंत्र आहे.रामभक्ती, बलोपासना, मारुती उपासना, मठ, मारुती मंदिरे हे रामदासी पंथाचे काही विशेष आहेत.रामदासी पंथात लोकजागृतीला विशेष महत्त्व आहे.समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान ‘समर्थ रामदासांचे कल्याणस्वामी, वेणाबाई, अक्काबाई इ. समर्थांचे प्रारंभिक शिष्य होते.रामदासी पंथात स्त्रीयांना देखील परमार्थाचा अधिकार होता.भक्ती-शक्ती समन्वय, परमार्थ निरूपण, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेमावर भर, युवा संशक्तीकरण हे समर्थ संप्रदायाचे वेगळेपण सांगता येईल.सज्जनगड, चाफळ, शिवथरघळ ही तीर्थे समर्थ संप्रदायात पूजनीय मानली जातात.रामदासांनी चाफळ येथे श्रीरामाची स्थापना केली.दासबोध, मनाचे श्लोक हे समर्थ सांप्रदायिक अनुयायांचे नित्यपाठातील ग्रंथ आहेत. दिनकरस्वामी यांच्या ‘स्वानुभवदिनकर’, आत्माराम महाराज यांच्या ‘दासविश्रामधाम’ व हरिस्वामी यांच्या एका पदात रामदासी पंथविशिष्ट आचारधर्म सांगितला आहे.दररोज दासबोधाचे दोन समासांचे व मनोबोधाचे अकरा श्लोकांचे  पठण करणे, हा रामदासी अनुयायांचा आचार आहे.

हरिकथानिरूपण, राजकारण, सर्वांविषयी सावधपण व साक्षेप ही समर्थ संप्रदायाची चतुःसूत्री आहे.

भजन, प्रार्थना, मंत्रजप, वैराग्य, विवेक, इंद्रियविरोध, वर्णाश्रमधर्माचे पालन, स्नानसंध्यादी नित्यकर्मे, एकान्ती मानसपूजा या समर्थ संप्रदायाच्या इतर संप्रदायांहून वेगळ्या गोष्टी आहेत.ब्रह्मचर्यव्रत, हुरमुजी वस्त्रे, विवेक-वैराग्य, इंद्रियविरोध, भिक्षावृत्ती, निस्पृहता, ईश्वरभक्ती हाच रामदासी संप्रदाय होय.

समर्थ संप्रदायात रामनवमी(चैत्र शुद्ध नवमी), हनुमान जन्म(चैत्र पौर्णिमा) व दास नवमी(माघ वद्य नवमी) हे दिवस वार्षिक उत्सव म्हणून साजरे केले जातात.

**समर्थ रामदास स्वामी : व्यक्तित्व आणि कवित्व**

समर्थ रामदास हे मध्ययुगीन कालखंडातील, सतराव्या शतकातील ज्ञानी, भक्तिमान आणि कर्मयोगी संतकवी होते.समर्थ रामदासांनी छत्रपती शिवरायांना उपदेश केला, असे काही अभ्यासक व सांप्रदायिक म्हणतात, परंतु त्याबाबत आधार सापडत नाही.समर्थांनी भारतभ्रमण, अकरा मारुतींची स्थापना, मठ स्थापना केली.त्यांचा रामराज्य स्थापनेचा उद्देश असून त्यांनी राजकारणाचा धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भाव केला. सामाजिक जीवनाची नैतिक परिशुद्धी करणे, हे रामदासांच्या राजकारणाचे मर्म होते.समर्थ हे विरक्त संत होते, परंतु त्यांचा दृष्टिकोण सक्रिय प्रवृत्तीपर होता.समर्थ रामदास स्वामी यांचा जन्म चैत्र शु. ९, शके १५३० म्हणजेच २४ मार्च १६०८ रोजी मराठवाड्यातील जांब या लहानशा गावी झाला.त्यांचे पूर्ण नाव ‘नारायण सूर्याजीपंत ठोसर’ असे होते. त्यांच्या आईचे नाव राणूबाई असे होते.राम आणि सूर्य ह्यांची उपासना त्यांच्या घरात होती.सूर्याजीपंत अनेक मुमुक्षूंना ‘अनुग्रह’ देत. रामदासांचे वडील बंधू गंगाधर ‘श्रेष्ठ’ आणि ‘रामी

रामदास’ या नावांनीही ओळखले जातात.प्रच्छन्न जडवादी तत्त्वज्ञान, हरिकथा निरुपण, राजकारण व सर्वांविषयी सावधपण हे समर्थांच्या कार्याचे विशेष आहेत.समर्थांची स्वधर्म रक्षणासाठी स्वराज्य हवे, अशी भूमिका होती.त्यांनी प्रयत्नवाद, लोकसंग्रहाचा पुरस्कार केला. ‘परकीय आक्रमणाचा प्रतिकार पराक्रमाने करावा.’ अशी समर्थांची शिकवण होती.त्यांनी परमार्थाबरोबर प्रवृत्तीपरतेचा महिमा ठाशीवपणे सांगितला.समर्थांनी सांगितलेल्या संन्यस्त वृत्ती, उदंड भ्रमण, भिक्षावृत्ती, भिक्षा या शिष्यत्वाच्या खुणा त्यांच्या समाजनिरीक्षणाशी संबंधित आहेत.हुरमुजी रंगाची वस्त्रे, मस्तकी जटाभार, गळयात मेखला, काखेत कुबडी, पायात खडावा हा समर्थांचा वेषच नंतर रामदासी अनुयायांचा विशेष वेष बनला.छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर दोन वर्षांनी समर्थांचा मृत्यू झाला.समर्थ रामदासांचा मृत्यू माघ कृ. ९, शके १६०३ म्हणजेच १३ जानेवारी, १६८१ रोजी सज्जनगड या ठिकाणी झाला.

**रामदासी पंथाचे तत्त्वज्ञान**

समर्थ पंथाचे तत्त्वज्ञान एकवीस समासी म्हणजे जुना दासबोध, नवा दासबोध, आत्माराम, पंचसमासी, सप्तसमासी या समर्थ रामदासांच्या ग्रंथ व स्फुट प्रकरणांतून दृगोचर होते.समर्थ पंथाचे तत्त्वज्ञान परंपरागत अद्वैत सिद्धांत, त्याला भक्तीची जोड याच्या संमिश्रणातून निर्माण झाले आहे.या तत्त्वज्ञानावर द्वैतमताची छाया दिसते.समर्थांनी आपल्या तत्त्वज्ञानात भागवतातून नवविधाभक्तीची कल्पना, तर गीतेतून ज्ञानोत्तर कर्म, अवतार कल्पना घेतल्या आहेत.सगुणापेक्षा निर्गुणाचे महत्त्व, आत्मनिवेदन हा भक्तीचा वेगळा उलगडा हे समर्थ तत्त्वज्ञानाचे विशेष सांगता येतील. समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान प्रच्छन्न जडवादी तत्त्वज्ञान मानले जाते.समर्थ रामदासांचे तत्त्वज्ञान अद्वैतवादावर आधारित होते, ज्यात केवळ ब्रह्म हेच सत्य आहे

असे मानले जाते. त्यांनी 'ब्रह्म', 'माया', 'जीव' आणि 'जगत्' या संकल्पनांवर चिंतन केले.त्यांच्या मते, आध्यात्मिक अनुशासनातून आणि कर्तव्यनिष्ठेने समाजसेवा केली पाहिजे. त्यांचे तत्त्वज्ञान संत एकनाथ यांच्या विचारांवर आधारित होते आणि त्यांनी 'दासबोध', 'आत्माराम', आणि 'मनाचे श्लोक' यांसारख्या ग्रंथांमधून मानवी जीवनाच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीचा संदेश दिला.

**समर्थ रामदासांच्या तत्त्वज्ञानाची प्रमुख वैशिष्ट्ये :**

१. अद्वैतवाद: त्यांच्या तत्त्वज्ञानात ब्रह्म हेच एकमेव सत्य आहे आणि बाकी सर्व माया आहे असे मानले जाते.
२. ब्रह्म, माया आणि जीव: त्यांनी ब्रह्म, माया, जीव आणि जगत् यांसारख्या संकल्पनांवर सखोल चर्चा केली.
३. कर्तव्य आणि सेवा: रामदासांनी समाजाची सेवा करण्यासाठी आणि आपले कर्तव्य चोख बजावण्यासाठी आध्यात्मिक शिस्त व कर्तव्यावर भर दिला.
४. साधना: त्यांनी भक्ती, रामनाम जप आणि निष्काम कर्मयोगाचे महत्त्व सांगितले.
५. समाजोन्नती: समाजाच्या नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी त्यांनी कार्य केले,ज्यामध्ये ११०० मठ आणि हनुमान व श्रीराम मंदिरांची स्थापना यांचा समावेश होता, परंतु इतिहासाच्या निकषावर समर्थांच्या मठांची संख्या टिकत नाही.आंध्रप्रदेशात इंदूरबोधन, तर दक्षिण तंजावर जवळ रामदासी मठ स्थापन करण्यात आले होते.

**रामदासी पंथीय वाङ्मय**

समर्थ रामदासांचे अपार लेखन हा रामदासी पंथीय वाङ्मयाचा मूलाधार आहे.प्रपंच-परमार्थ विवेक, प्रयत्नवादाचा पुरस्कार, लोकसंग्रहाचा ध्यास,

देशकालपरिस्थितीचे उत्कट भान हे समर्थ विचारांतील विशेष त्यांच्या वाङ्मयात देखील आढळतात.कल्याणस्वामी(अंबाजी) हे समर्थांचे लेखनिक व वाङ्मयनिर्मितीचे साक्षीदार होते.समर्थ रामदासांनी एकवीस समासी(जुना दासबोध), दासबोध, रामायणातील सुंदरकांड, युद्धकांड; करुणाष्टके, मनाचे श्लोक हे ग्रंथ; मारुती स्तोत्र , अस्मानी-सुलतानी, परचक्रनिरूपण, आनंदवनभुवनी, रामवरदायिनी, जुनाट पुरुष, चौदा ओवी शते, जनस्वभाव गोसावी ही प्रसंगोचित स्फुट प्रकरणे लिहिली आहेत. करुणाष्टके हा रामदासांच्या साधकावस्थेतील ग्रंथ असून, त्यात भावनेची उत्कटता व कारुण्यभाव दिसतो.मनाचे श्लोक किंवा मनोबोध ही भुजंगप्रयात वृत्तातील समर्थांची रचना विशेष लोकप्रिय आहे.दासबोध हा रामदासी पंथाचा मुख्य ग्रंथ असून, त्यात समर्थांचे सर्व विचारधन सामावले आहे.याखेरीज समर्थांनी ‘‘सुखकर्ता दुःखहर्ता’’ ही प्रसिद्ध असलेली गणपतीची आरती, ‘‘लवथवती विक्राळा ब्रह्मांडे माळा’’ ही शंकराची आरती समर्थांनीच रचली आहे.मनाचे श्लोक या काव्याचा उर्दू अनुवाद शहा तुराव चिश्ती यांनी मध्ययुगीन काळात केला आहे.काव्यग्रंथ, स्फुट कविता, प्रासंगिक कविता, वेदान्त प्रकरणे, अभंग, श्लोक, भूपाळ्या, आरत्या अशी बरीच रचना समर्थांनी केली आहे.दासबोध, मनाचे श्लोक, आत्माराम ही समर्थ संप्रदायातील प्रस्थानत्रयी मानली जाते.समर्थांच्या साहित्यविचारांवर ‘रामदासांचे साहित्यशास्त्र’ हा ग्रंथ इ.स.१९७३ मध्ये भा.श्री.परांजपे लिहिला आहे.

समर्थांखेरीज रामदासांचे वडील बंधू गंगाधर उर्फ ‘श्रेष्ठ’ किंवा ‘रामी रामदास’, गिरीधरस्वामी, मेरूस्वामी, माधवस्वामी, वेणास्वामी, हरिबुवा भोंडवे, आत्माराम महाराज एक्केहाळीकर ते एकोणिसाव्या शतकातील हंसराजस्वामी अशी व्यापक ग्रंथकारांची परंपरा समर्थ संप्रदायाला लाभली आहे.यांनी समर्थचरित्रपर, तत्त्वज्ञानपर, कथापर व स्फुट संहित्यरचना केल्या आहेत.समर्थ रामदासांची अनेक

पौराणिक पद्धतीची चरित्रे गिरीधरस्वामी, हनुमंतस्वामी, महिपतीबुवा, दिनकरस्वामी, मेरूस्वामी, उद्धवसुत यांनी लिहिली आहेत.

पारमार्थिक अधिकार मोठ्या असलेल्या समर्थशिष्या वेणाबाई म्हणजेच वेणास्वामी या अत्यंत महत्त्वाच्या संत कवयित्री आहेत, त्यांनी सीतास्वयंवर, रामायण, पंचीकरण, रामागुहक संवाद, कौल आख्यान, स्फुट पदे अशी विपुल साहित्यरचना केली आहे.

**समारोप**

स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात समर्थांचे चरित्र व त्यांच्या ग्रंथांतील शिकवणूक यांना देशभक्तीचा स्फुल्लिंग उत्पन्न करण्याच्या दृष्टीने अतिशय प्रभावी स्थान प्राप्त झाले.लोकमान्य टिळक, न्या.रानडे, इतिहासाचार्य राजवाडे यांच्यावर समर्थ संप्रदायाच्या विचारांचा प्रभाव आढळतो.विसाव्या शतकातील ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, शंकर श्रीकृष्ण देव, अनंतदास रामदासी, श्रीधर स्वामी, मसुरकर महाराज, अण्णाबुवा कालगावकर, प्रा.के.वि.बेलसरे, नानासाहेब धर्माधिकारी श्रेष्ठ व विख्यात समर्थ सांप्रदायिक आहेत.

# समर्थ संप्रदाय









# नागेश संप्रदाय

'नागेश संप्रदाय' चैतन्य संप्रदाय परंपरेतून निर्माण झालेला, अद्वैत तत्त्वाला महत्त्व देणारा मानला जातो.नागेश संप्रदायामध्ये नाथ पंथाप्रमाणेच गुरूभक्ती, हठयोगाला महत्त्व दिले आहे.वडवळसिद्ध नागेश (इ.स.१३६४ –इ.स.१४१८) यांच्यापासून नागेश संप्रदाय परंपरा सुरू झाली. नागनाथ हे नवनाथापैकी असून ते साक्षात शंकराचाच अवतार होय, असे मानले जाते.नागेश संप्रदाय हा महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवर उदयाला आलेला पंथ आहे.नागेश संप्रदायाला 'नागनाथ संप्रदाय' असेही म्हणतात.नागेश संप्रदायामध्ये मठपरंपरा आढळते, नागेश संप्रदायाचे चार ठिकाणी मठ आहेत. "महाराष्ट्रातील वारकरी पंथाच्या वाङ्मयात वीरशैव संस्काराच्या ज्या काही खुणा सापडतात, त्याचा मागोवा नागेश संप्रदायाच्या द्वारा घेता येण्याजोगा आहे. हेच नागेश संप्रदायाचे ऐतिहासिक महत्त्व आहे." असे मराठी वाङ्मयेतिहासकार ह.श्री.शेणोलीकर म्हणतात.वीरशैव संप्रदायाचा वारकरी संप्रदायाशी असलेला धागा नागेश संप्रदायाद्वारे अधिक स्पष्ट होतो.

## नागेश संप्रदायाची ओळख

**सर्वसमावेशक स्वरूप**: नागेश संप्रदाय हा सर्वसमावेशक आणि सर्वसंग्राहक असल्याने, याने मराठी धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात विशेष स्थान निर्माण केले आहे.

**साहित्यिक योगदान**: या संप्रदायाच्या अनुयायांनी आपले तत्त्वज्ञान मांडण्यासाठी साहित्यनिर्मिती केली, ज्यामुळे मराठी साहित्य समृद्ध झाले.

**समकालीन संप्रदाय**: मध्ययुगीन काळात वारकरी, महानुभाव, दत्त, समर्थ, सुफी, वीरशैव यांसारख्या इतर अनेक संप्रदायांसोबत नागेश संप्रदायही मराठी साहित्याच्या प्रवाहाचा भाग बनला.

## नागेश संप्रदायाचा आचारधर्म

या संप्रदायात योग साधनेला महत्त्व असून हठयोगावर विशेष भर आहे.नागेश पंथाचे उपास्य दैवत शिव आहेत.हा संप्रदाय अद्वैत शुद्ध वेदांतावर आधारित पंथ आहे. इतर संप्रदायांशी समन्वय, भक्ती मार्गाचा पुरस्कार, जातिभेद मान्य नाही, व्रत, पोशाख, पताका, माळ ही बाह्य अवडंबरे मान्य नसलेला, पंचमकारांपासून दूर, गुरूकृपेवर भर,महाशिवरात्रीचे महत्त्व, निर्गुणोपासकता हे नागेश पंथाच्या आचारधर्माचे विशेष आहेत.नागेश पंथात भक्तांना बुक्का लावला जातो, तसेच चक्री भजनाला महत्त्व दिसते.

## वडवळसिद्ध नागेश : एक परिचय

वडवळसिद्ध नागेश किंवा नागनाथ महाराजांविषयी अशी आख्यायिका सांगण्यात येते की, सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ (चंद्रमौळी) येथे राहणाऱ्या हेग्रस नावाच्या भारद्वाज गोत्री ब्राह्मणास मानस सरोवराकाठी नागनाथांनी प्रथम दर्शन दिले. त्यांच्या अंगावर अनेक नाग खेळत असत. म्हणून त्यांचे ‘नागनाथ किंवा नागेश’ असे नाव प्रसिद्ध झाले. पुढे ते हेग्रस यांच्या समवेत मोहोळला आले.तेथे गावातील समाजकंटकांच्या त्रासाला कंटाळून ते एका अरण्यात हेग्रस व अन्य भक्तगणांसह गेले. तेथे एका वठलेल्या वडाखाली बसले असता, त्यांनी शिष्यास त्या झाडाला पाणी घालण्यास सांगितले. पाणी घालताच त्या वडास पालवी फुटली. म्हणून त्यांना ‘वडवाळसिद्ध नागनाथ’ असे म्हटले जाऊ लागले. वडवळसिद्ध नागेश किंवा नागनाथ महाराज हे सिद्ध पुरूष चौदाव्या शतकात होऊन गेले. महाराष्ट्र व कर्नाटक ही त्यांची कार्यभूमी होती.

## नागेश संप्रदायाची तीर्थस्थाने

नागेश संप्रदाय हा महाराष्ट्र-कर्नाटक राज्यांमध्ये पसरलेला संप्रदाय आहे.या संप्रदायाची महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यात तीर्थस्थाने आहेत.नागेश संप्रदायाची मानुर, देगांव, मोहोळ, मार्डी, केंदूर, पाबळ, कन्हेरसर, निमगाव ही महाराष्ट्रातील, तर जाजनमुगळी, महागांव ही कर्नाटकातील तीर्थस्थाने आहेत.

## नागेश संप्रदायाचे वाङ्मय

नागेश संप्रदायांमधील कवींनी अभंग, आरत्या, पोवाडे, लावणी, साकी, फाकी या रचनाबंधांतून लेखन केले आहे.या संप्रदायातील कवींनी लोकसंस्कृतीशी निगडीत रचनाबंध वापरले आहेत.नागेश संप्रदायातील महत्त्वाचे कवी अज्ञानसिद्ध, बहिरापिसा जातवेद यांना नागनाथांचे सान्निध्य लाभले होते.ते नागेश संप्रदायाचे महत्त्वाचे पाईक व कवी होते.'नागेशलीलामृत'(इ.स.१८४८) हा नागेश पंथातील महत्त्वाचा ग्रंथ भानजी त्रिंबंक यांनी लिहिलेला असून, नागनाथ संप्रदायाचे स्वरूप, शिष्यपरंपरा, स्थानमाहात्म्य, तत्त्वज्ञान, चैतन्य संप्रदायाशी असलेला संबंध यांवर प्रकाश टाकलेला आहे.हा ग्रंथ ४० अध्याय आणि ५३३४ ओव्यांचा आहे.या ग्रंथात नागेश →अज्ञानसिद्ध →सिद्धलिंग →नागोजीबाबा →भुजंग →शिवराम → नागेश → भानजी त्रिंबंक अशी स्वतःची गुरूपरंपरा कवी सांगतो.वीरशैव लिंगायत संतकवी मन्मथ-शिवलिंगस्वामी हे नागेश संप्रदायात देखील महत्त्वाचे मानले जातात.त्यांनी स्वयंप्रकाश, अनुभवानंद, ज्ञानबोध, गुरूगीताटीका, शिवगीताटीका, परमरहस्यामृत हे ग्रंथ लिहिले आहेत.नसरुद्दीन, आलमखान हे मुस्लिम नागेशाचे भक्त मानले जातात.आलमखान या पठाण नागेश शिष्याने काही मराठी पदरचना केली आहे.मानुरमधील एकलिंग तेली यांनी 'आत्मसार' हा ग्रंथ, तर काही अभंग, आरत्या लिहिल्या आहेत.नागेश पंथी अनुयायी भुजंगबुवा, दत्तचैतन्य, आलमखान, बोलेराम, सिद्धलिंगबुवा, नागोजीबुवा, रघुनाथबुवा यांनी अभंग, आरत्या, उपदेशपर,

आध्यात्मिक पदरचना केल्या आहेत. सिद्धलिंगबुवा शिष्य चवंडा यांनी 'नागनाथ चरित्र' व काही अभंग लिहिले आहेत.देगांव येथील अवधूत सोनार यांनी मराठीबरोबरच हिंदीतून अभंगरचना केली आहे.हेग्रजचे वंशज 'नरहरबुवा' यांनी 'सिद्धांत रत्नाकर' हा ४४१९ ओव्यांचा काव्यग्रंथ लिहिला आहे.किल्लारी मठातील रघुनाथबुवा यांनी चक्रीभजन लिहिले आहेत.उद्धव चिद्धन यांनी 'बहिंरभट चरित्र' लिहिले आहे.अनंत बल्लाळ यांनी 'नागेश चरित्र', 'बहिंरभट चरित्र' या रचना लिहिल्या आहेत.विनायक शंकरराव मोहोळकर यांनी इ.स.१९९४ मध्ये 'श्रीनागेश चरित्र व श्री अज्ञानसिद्धकृत स्वरूपनिर्वाण पृच्छापत्र' या ग्रंथात सर्व चरित्रांचे संकलन केले आहे. 'नागेशदर्पण' हा विनायक मोहोळकरांचा ग्रंथ इ.स.१९९१ मधील ग्रंथात नागेश संप्रदायाचे आचार, पंथाचा पूर्व इतिहास, नागेश चरित्र, ३२ संतांच्या अभंगांचा,संतांच्या ५० आरत्या, चक्रीभजने इ. समावेश आहेत.या ग्रंथात रघुनाथबुवा यांची १५ चक्रीभजने, ३९ साकी, आरती, नमस्कार, फाकी संकलन केल्या आहेत.

### कवी अज्ञानसिद्ध

अज्ञानसिद्ध हे नागेश संप्रदायाचे आद्य आचार्य मानले जातात. हेग्रसच्या मुलीचा मुलगा म्हणजे अज्ञानसिद्ध होय.अज्ञानसिद्ध यांनी 'वरद नागेश'(इ.स.१४३०) हा वेदांतपर ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात बारा अध्याय असून २१२५ ओव्या आहेत.या ग्रंथाची रचना आद्यकवी मुकुंदराजाच्या 'विवेकसिंधु' प्रमाणे आहे.या ग्रंथात नागेश पंथाचे तात्त्विक विचार मांडले आहेत.या ग्रंथाची रचना गुरू-शिष्य संवादाच्या स्वरूपाची आहे. "परमात्मा हा अंतिम सत्य व परममंगल असून त्याला कोणत्याही विकाराचा स्पर्श होऊ शकत नाही." असे परमात्म स्थितीचे वर्णन 'वरद नागेश' या ग्रंथात केले आहे.स्वरूपनिर्वाण, तत्त्वबोध, जीवब्रह्मभेदलक्षण, पृच्छापत्र, काळज्ञान, अकालज्ञान, संकटहरणी हे अज्ञानसिद्ध यांचे इतर काही तत्त्वज्ञानपर ग्रंथ आहेत.याशिवाय अष्टके, भारुडे, आरत्या,

डफगाणी, पंचीकरण प्रमेय ही काही स्फुटकाव्ये अज्ञानसिद्ध यांनी लिहिली आहेत.कवी अज्ञानसिद्ध यांनी आपल्या विपुल रचनांमधून नागेश संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची मांडणी करून मराठी साहित्यात मोलाची भर टाकलेली आहेत.

**बहिरापिसा जातवेद**

बहिरापिसा जातवेद हे कृष्णचरित्रकार कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. बहिरापिसा जातवेद हे बहिंरभट या नावाने देखील ओळखला जातो.ते मराठीतील कथावाङ्मयाचे कवी मानले जाते.त्यांना वडवळसिद्ध नागेशांनी आत्मज्ञान दिले. त्यांनी प्रथम इस्लाम धर्मात धर्मांतर केले होते, परंतु वडवळसिद्ध नागेशांच्या प्रभावातून ते पुन्हा हिंदू धर्मात आले. बहिरापिसा जातवेद यांनी 'भैरवी'(बहिरवी) हा भागवतातील दशमस्कंदावरील विस्तृत टीकाग्रंथ लिहिला आहे.हा ग्रंथ पाऊण लाख ओवीसंख्या असलेला असून साठ अध्यायांचा आहे, परंतु आज या ग्रंथातील १६२८४ ओव्याच उपलब्ध आहेत.भैरवी हा मधुर रचनाबंध असलेला काव्यग्रंथ आहे.शृंगारवर्णने, रासक्रीडा, कात्यायनी व्रत, कृष्ण-रुक्मिणी विवाह, कृष्णविरहातून व्याकुळ स्त्रियांची लडिवाळ संभाषणे या ग्रंथात आली आहेत.मधुरता, ओघवती कथनशैली ही भैरवी या ग्रंथाचे विशेष आहेत.पंडितकवी असलेल्या कलाकवी मुक्तेश्वराच्या काव्याचा प्रभाव या ग्रंथावर आढळतो. बहिरापिसा जातवेद याने 'गीतगीता' हा काव्यग्रंथदेखील लिहिला आहे, त्याचप्रमाणे त्यांनी पोवाडे, अभंग सुद्धा लिहिले आहेत.

**समारोप**

एकूणच नागेश संप्रदाय हा महाराष्ट्रातील अनेक धार्मिक संप्रदायांपैकी एक महत्त्वाचा, सर्वसमावेशक व सर्वसंग्राहक संप्रदाय आहे.नागेश संप्रदाय हा उदार अंतःकरणाचा; शैव-वैष्णव, हिंदू-मुसलमान यांना जवळ करणारा पंथ आहे. नागेश संप्रदायात कर्मकांड, कडक वैराग्य, संन्यास यांवर भर नसून सामान्य

माणसाच्या मर्यादानुरूप त्याला भक्तिप्रवण करण्याची प्रेरणा याला महत्त्व आहे.या संप्रदायाने मराठी साहित्य, विशेषतः मध्ययुगीन मराठी साहित्याला मोठे योगदान दिले आहे, जिथे तत्त्वज्ञान आणि आचार प्रणाली दृढ करून साहित्यनिर्मिती केली गेली.भावमयता, भक्तिप्रवणता, सुबोधता, लयबद्धता, गेयता, लोकसंगीतानुकूलता, परिणामकारकता हे नागेश सांप्रदायिक वाङ्मयाचे विशेष दिसतात.

# नागेश संप्रदाय







# चैतन्य संप्रदाय

महाराष्ट्रातील चैतन्य संप्रदाय वारकरी पंथाशी संबंधित संप्रदाय मानला जातो. महाराष्ट्रातील 'चैतन्य परंपरा' या शब्दाचा संदर्भ प्रामुख्याने संत तुकाराम महाराजांच्या गुरुपरंपरेतील संत केशवचैतन्य (बाबाजी चैतन्य) यांच्यापासून सुरू झालेली वारकरी संप्रदायातील एक शाखा किंवा चैतन्य महाप्रभूंशी संबंधित वैष्णव भक्तीचा प्रवाह असा आहे. या परंपरेमध्ये भगवद्गीतेवर आधारित वैष्णव भक्तीचा प्रसार केला जातो, ज्यात 'हरे कृष्ण' मंत्राचा जप आणि प्रेमळ भक्तीवर जोर दिला जातो. चैतन्य संप्रदायात दोन भेद दिसतात, एका भेदात ''रामकृष्ण हरी'' हा षडाक्षरी मंत्र, तर दुसऱ्या भेदात ''ॐ नमो भगवते वासुदेवाय'' हा द्वादशाक्षरी मंत्र महत्त्वाचा मानला जातो. 'चैतन्यलीला' हा कृष्णदास याने लिहिलेला ओवीबद्ध मराठी काव्यग्रंथ चैतन्य परंपरेचा मुख्य ग्रंथ मानला जातो. पंडित कवी 'उद्धव चिद्धन' हा चैतन्य संप्रदायातीलच आहे.

''लतीबशहा मुसलमान। रामदास भक्त पूर्ण।।
राघव चैतन्य केशव चैतन्य बाबा चैतन्य तुकोबा।।
वाचे वदे श्रीचिध्दन। झाला निमग्न उध्दव।।''

असा आपल्या गुरुपरंपरेचा निर्देश उद्धव चिद्धन यांनी आपल्या आत्मचरित्रपर अभंगात केला आहे.

निरंजन रघुनाथ यांनी शके १७०९ मध्ये 'चैतन्य-विजय कल्पतरू' हा चैतन्य परंपरेतील ग्रंथ कृष्णदास बैरागी यांच्या शके १५९८ च्या 'चैतन्यलीला' ग्रंथाधारे रचला.

## वारकरी पंथ व चैतन्य परंपरा

महाराष्ट्रामध्ये ‘चैतन्य परंपरा’ मुख्यत्वे संत तुकाराम महाराजांच्या गुरुपरंपरेतून वारकरी संप्रदायात आली आहे. या परंपरेमध्ये राघव चैतन्य, केशव चैतन्य आणि बाबाजी चैतन्य यांच्या माध्यमातून चैतन्य संप्रदायाचा प्रभाव वारकरी विचारधारेत पोहोचला. श्री चैतन्य महाप्रभू (गौरांग) हे बंगालमधील वैष्णव संत होते, ज्यांनी भक्ती योगाचा प्रसार केला आणि त्यांचे शिष्य व परंपरा महाराष्ट्रातही पोहोचली, जिथे त्यांनी वारकरी संप्रदायाला प्रभावित केले. चैतन्य संप्रदायाचा प्रभाव संत तुकाराम महाराजांच्या माध्यमातून आला.विशेषतः भक्ती आणि गुरुशिष्य परंपरेच्या संदर्भात चैतन्य परंपरेचा वारकरी संप्रदायावर प्रभाव दिसून येतो.नाथ, दत्त आणि चैतन्य संप्रदायांचे प्रवाहांचा संगम होऊन वारकरी संप्रदायाची इमारत निर्माण झाली.नाथ संप्रदाय संत ज्ञानेश्वरांच्या, दत्त संप्रदाय संत एकनाथांच्या, तर चैतन्य संप्रदाय संत तुकाराम महाराजांच्या माध्यमातून वारकरी विचारधारेत आला. श्री बाबाजी चैतन्य महाराज सेवा मंडळातर्फे ओतूर ते पंढरपूर अशी वारीची परंपरा चालविली जाते, तसेच देहू ते ओतूर असा संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

## संत तुकाराम व चैतन्य परंपरा

संत तुकारामांची गुरुपरंपरा ही महाविष्णु⟶ ब्रह्म ⟶ नारद ⟶ व्यास ⟶ राघव चैतन्य ⟶ केशव चैतन्य ⟶बाबाजी चैतन्य⟶ तुकाराम चैतन्य अशी चैतन्य संप्रदायातील आहे.संत तुकारामांना माघ शुद्ध द्वादशी शके १५६१(इ.स.१६३३)या तिथीला बाबाजी चैतन्य यांचा अनुग्रह ओतुरजवळ गंगातीरी झाला. तुकोबांना वयाच्या २४व्या वर्षी म्हणजे इ.स. १६३२ मध्ये बाबाजी चैतन्यांचा गुरुपदेश झाला.

स्वप्नात त्यांनी तुकाराम महाराजांना ‘राम कृष्ण हरी’ हा मंत्र दिला, तेव्हापासून हा मंत्र वारकरी संप्रदायात रूढ झालेला आहे.

“सदगुरूराये कृपा केली मज । परी नाही घडली सेवा काही ॥धृ॥
सापडविले वाटे जाता गंगास्नाना । मस्तकी तो जाणा ठेविला कर ॥१॥
भोजना मागती तूप पावशेर । पडला विसर स्वप्नामाजी ॥२॥
राघवचैतन्य केशवचैतन्य । सांगितली खूण मालिकेची ॥३॥
बाबाजी आपुले सांगितले नाम । मंत्र दिला रामकृष्णहरी ॥४॥
माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ॥५॥”

असा आपल्या चैतन्य गुरूपरंपरेचा व गुरूप्राप्तीच्या प्रसंगाचा सविस्तर उल्लेख संत तुकाराम यांनी केला आहे.

चैतन्य संप्रदायात माघ शुद्ध द्वादशी या तिथीला ‘संत तुकाराम अनुग्रह दिन’साजरा केला जातो.संत तुकारामांना स्वप्नात उपदेश करणारे गुरू ‘केशव चैतन्य’ होय, असे काही अभ्यासक मानतात. काही संशोधकांनी केशव चैतन्य आणि बाबाजी चैतन्य हे एकच, असे म्हटले आहे, तर काही विद्वानांनी हे दोन सत्पुरुष असल्याचे म्हटले आहे.संत महिपतीने आपल्या ‘भक्ती लीलामृत’ ग्रंथात संत तुकाराम महाराजांची गुरुपरंपरा आणि गुरु उपदेशाची माहिती दिली आहे. बाबाजी चैतन्य यांनी सर्व जातीधर्माच्या लोकांना सोबत घेऊन जाण्याची प्रेरणा संत तुकाराम महाराजांना दिली.

संत बहिणाबाईंच्या गाथेत खालीलप्रमाणे आपल्या चैतन्य गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे.

पुढे विश्वंभर शिवरुप सुंदर।
तेणे राघवी विचार ठेवीलासे॥
केशव चैतन्य, बाबाजी चैतन्य।
झालासे प्रसन्न तुकोबासी॥
एकनिष्ठ भाव तुकोबा चरणी।
म्हणोनी बहिणी लाधलीसे॥

संत तुकाराम प्रभावळीतील संत निळोबाराय पिंपळनेरकर आपली गुरुपरंपरा खालीलप्रमाणे सांगतात.

"राघवचैतन्य केले अनुष्ठान।त्यासी व्दैपायाने कृपा केली।
राघवा चरणी केशव शरण।बाबाजीशी पूर्ण कृपा त्याची॥"

महिपती 'भक्तीलिलामृत'च्या पाचव्या अध्यायात २९७व्या ओवीत चैतन्य परंपरेचा उल्लेख करताना म्हणतात की,

"राघवचैतन्य जगविख्यात। केशवचैतन्य महाभक्त।
बाबाचैतन्य प्रसिध्द संत।ज्यांनी भक्तीपंथ स्थापिला॥"

**राघव चैतन्य**(इसवी सनाचे सोळावे शतक) : राघव चैतन्य यांचे मूळ नाव 'रघुनाथ' असे होते.गिरनार पर्वताच्या परिसरात राघव चैतन्यांचा जन्म शौर्यकुळात झाला.राघव चैतन्य दत्त व शिव उपासक होते.त्यांना व्यासांकडून उपदेश व दीक्षा लाभली होती.इसवी सन १५६२ च्या सुमारास राघव चैतन्यानी जिवंत समाधी घेतली.राघव चैतन्य यांची समाधी आळंद, जि.कलबुर्गी, कर्नाटक येथे आहे. कर्नाटक राज्यातील कलबुर्गी जिल्ह्यातील आळंद येथील राघव चैतन्य यांचे समाधीस्थान हिंदू, मुस्लीम, जैन, लिंगायत आणि इतर धर्मीयांचेही श्रद्धास्थान आहे.

**केशव चैतन्य** (इ.स.१५२४ ते १५७२) : केशव चैतन्य यांचे मूळ नाव 'विश्वनाथ नरसे' असे असून त्यांचा पुण्यात जन्म राजर्षी कुळात झाला होता. निजामशाहीत

नोकरीला होते. त्यांना लोहगडची किल्लेदारी मिळाली होती.त्रिंबक असे त्यांच्या थोरल्या भावाचे नाव होते, त्याने विश्वनाथवर आपत्ती आणल्या, म्हणून केशव चैतन्य त्र्यंबकेश्वर येथे गेले.केशव चैतन्यांची राघव चैतन्यांची भेट व दर्शन ओतूर येथे झाली.केशव चैतन्यांनी 'भक्तिप्रकाश', 'गीतभागवत सार', 'परमार्थ विचार' हे ग्रंथ लिहिले आहेत, जे आज अनुपलब्ध आहेत.त्याच्या नावावर असलेले एक पद आढळते. त्यात 'नवविधा भक्ति निरंतर करवावी । केशव चैतन्य शरण तुला रे ॥' अशी ओळ आहे.ओतूरला केशव चैतन्य यांची समाधी आहे.

**बाबाजी चैतन्य** (इ.स.१५५१ ते १६५०) : संत तुकाराम यांचे स्वप्नात उपदेश करणारे साधू म्हणजे 'बाबाजी चैतन्य' होय.बाबाजी हे आजन्म ब्रह्मचारी होते, त्यांना स्त्रीयांचे वावडे होते. 'गुरुपरंपरा' या संस्कृत ग्रंथात बाबाजी चैतन्यांबद्दल माहिती आलेले आहे.नागेश संप्रदायातील 'नागेश लीलामृत' या ग्रंथात बाबाजी चैतन्यांबाबत ओव्या आलेल्या आहेत.बाबाजी चैतन्य यांनी संत तुकारामांना ओतूरजवळ मांडवी नदीकाठी स्वप्नोपदेश दिला.बाबाजी चैतन्य यांची समाधी मान्यहाळ येथे आहे. बाबाजींचा शिष्य समुदाय सर्व जातीधर्मांमधील होता. त्यांचा जीवनाचा बराच काळ आळंद, मान्यहाळ, बसवकल्याण, गुलबर्गा भागात गेला.

महाराष्ट्रातील चैतन्य परंपरा आणि बंगालमधील चैतन्यप्रभू यांचा काही संबंध नाही, असे संत वाङ्मयाचे अभ्यासक बा.सी.बेंद्रे म्हणतात.पु.म्.लाड यांच्या मते चैतन्यप्रभूंचा (इ.स.१४८६ ते १५३३) महाराष्ट्राशी संबंध आला होता.चैतन्यप्रभूंचे शिष्य गोविंददास यांनी महाराष्ट्रात नामसंकीर्तनाचे नवचैतन्य निर्माण केले होते.चैतन्यप्रभू हे इ.स.१५१०-१२ या कालखंडात पंढरपूर त्यानंतर पुण्यात आले होते, याचे दाखले मिळतात.दासपरंपरेतील कन्नड कवी पुरंदरदास यांचे स्फूर्तिदाते स्वतः चैतन्य महाप्रभूच दिसतात.महाराष्ट्रात चैतन्य परंपरेचा प्रगाढ संबंध

नाथ, वारकरी, दत्त या पंथांशी असल्याचे आढळते.राघव चैतन्य, केशव चैतन्य, बाबाजी चैतन्य यांचे शिष्य सर्व जातिधर्मातील होते, त्यामुळे राघव चैतन्य, बाबाजी चैतन्य यांना मुस्लिम लोक अनुक्रमे लाडले मशायख व शेख शहाबुद्दीन संबोधतात.

**समारोप**

थोडक्यात, महाराष्ट्रातील चैतन्य परंपरा ही मुख्यत्वे वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून पोहोचली असून, त्यात संत तुकाराम महाराजांच्या गुरुपरंपरेतील चैतन्य पंथीय संतांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे.एकूणच चैतन्य परंपरा ही मध्ययुगीन महाराष्ट्रातील समन्वयवादी परंपरा होती.

# चैतन्य संप्रदाय



संत तुकारामांना बाबाजी चैतन्य यांचा अनुग्रह

## महाराष्ट्रातील अन्य संप्रदाय : एक अवलोकन

महाराष्ट्रात दत्त संप्रदायांतर्गत निरंजन रघुनाथ परंपरा, प्रकाश परंपरा, स्वरूप परंपरा, चैतन्य परंपरा, सायंदेव परंपरा, सकलमत परंपरा, आनंद परंपरा, अवधूत परंपरा या उप-परांपरा आढळतात.वारकरी पंथांतर्गत आनंद संत परंपरा दिसते.यातील काही महत्त्वाच्या उपसंप्रदायांचा ऊहापोह प्रस्तुत लेखात केला आहे.

### आनंद वारकरी संप्रदाय

वारकरी संप्रदायाच्या अंतर्गत असलेला 'आनंद संप्रदाय' हा प्रामुख्याने उत्तर महाराष्ट्रात जळगाव जिल्ह्यात पसरलेला आहे.सातारा, कोल्हापूर, गोवा या भागात देखील या संप्रदायाचा प्रभाव आहे. "मुख्य महाविष्णु चैतन्याचे मूळ। संप्रदायाचे फळ तेथुनिया॥" अशी आनंद संप्रदायाची उत्पत्ती सांगितली जाते.भागवत धर्माच्या आद्य प्रवर्तकांमध्ये आनंद संप्रदायाचे विशेष महत्त्व व योगदान आहे.आनंद संप्रदायाचे स्वरूप विशाळ व सर्वसमावेशक आहे.योगविद्यासंपन्न दत्तात्रेय हे या संप्रदायाचे आद्य प्रवर्तक मानले जातात.आनंद संप्रदायात समन्वयकारी मानव्याची उपासना केली जाते. आनंद संप्रदायात प्रकाशस्तंभ मानल्या गेलेल्या आद्यकवी मुकुंदराजाचा 'विवेकसिंधू' हा ग्रंथ मुख्य ग्रंथ मानला जातो.या संप्रदायाचे तत्त्वज्ञान 'अद्वैतपर' मानले जाते.संत एकनाथांचे पणतू शिवरामस्वामी कल्याणीकर, त्यांचे पुत्र वैकुंठस्वामी, बंधु अनंतस्वामी हे आनंद वारकरी संप्रदायाचे दीक्षित मानले जातात.मराठीत डॉ.भीमाशंकर देशपांडे यांनी आनंद संप्रदायावर लेखन केले आहे.

### आनंद वारकरी संप्रदायाचे वाङ्मय आणि तत्त्वज्ञान

आत्माराम स्वामी आणि सदानंद स्वामी यांनी रचलेला 'चैतन्य विजय' हा ग्रंथ 'आनंद ब्रह्मप्राप्ती' या उपनिषद वाक्यावर आधारित असून, १५०० ओव्यांचा

ग्रंथ या संप्रदायातील एक महत्त्वाचा ग्रंथ असून त्याचे स्वरूप संवादात्मक, संवादपर आहे. "'आनंद हेच ब्रह्म आहे.' कारण सर्व भूतमात्र आनंदातूनच जन्माला येतात.जन्माला आल्यानंतर आनंदमुळेच जीवनयापन करतात आणि अखेरीस या आनंदातच विलीन होतात.या आनंदमय परमेश्वराची उपासना करावी, उपनिषदातील या विद्येला 'भार्गवी वा वारुणी' असे म्हणतात."याचे विवेचन या ग्रंथात केले आहे.या ग्रंथात 'सदाशिव विप्र वेडा' अशी नाममुद्रा दिसते. या पंथात मठपरंपरा आढळते.आत्मारामस्वामी यांचे शिष्य 'शिवानंदस्वामी' यांचा शिष्यपरिवार मोठा असून, मठपरंपरा मोठी व तेजस्वी आहे. आनंद संप्रदायाचा स्वतःचा असा ऐतिहासिक विशिष्ट ध्वज आहे.आनंद संत संप्रदायाला सुंदर, भावमधुर अशी परंपरा लाभली आहे.

**सकलमत परंपरा**

कर्नाटकातील बिदरजवळ माणिकनगर (हुमणाबाद) येथील श्री माणिकप्रभू यांनी सुरू केलेल्या पंथ परंपरेला 'सकलमत परंपरा' असे म्हणतात.सकलमत परंपरा दत्त संप्रदायाशी निगडीत परंपरा आहे.ही परंपरा अद्वैत तत्त्वज्ञानवर आधारित परंपरा आहे.या परंपरेत सर्व जाती, धर्म, पंथांच्या लोकांना मुक्त प्रवेश आहे.मनोहर माणिकप्रभू , मार्तंड माणिकप्रभू यांनी या परंपरेचा विस्तार, प्रसार व प्रचार केलेल्या आहे.या परंपरेत दत्तात्रेय व त्यांची शक्ति मधुमती उपास्य दैवत मानले जातात.सकलमत परंपरेचे संस्थापक माणिकप्रभू ऐश्वर्यसंपन्न राजयोगी होते, महान गूढवादी संत आणि योगी श्री माणिक प्रभु महाराज (इ.स.१८१७-१८६५) हे भगवान दत्तात्रेयांचे चौथे अवतार म्हणून ओळखले जातात. शिर्डीचे साईबाबा, अक्कलकोट स्वामी समर्थ, आणि ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज हे माणिकप्रभूंचे समकालीन होते, माणिकप्रभूंनी त्यांच्याशी सखोल आध्यात्मिक ज्ञानाच्या विषयांवर संवाद

साधला. इ.स.१८५७ मध्ये भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या युद्धाशी देखील प्रभू यांचा संबंध होता. सर्व चरित्रकार माणिकप्रभूंचा उल्लेख महान अध्यात्म आणि गूढवादाचे संत असा म्हणून करतात. माणिक प्रभू यांचा 'भक्ताचार्य कल्पद्रुम' गौरव केला जातो.माणिकप्रभू यांना ‘सकलमताचार्य’ असे म्हटले जाते. त्यांनी निजाम राजवटीत ही परंपरा सुरू केली.माणिकप्रभू यांची भजने, अभंग यांचे संकलन ‘पद्यमाला’ या ग्रंथात आहे.माणिकप्रभूंनी अलौकिक कार्य केले आहे.सकलमत अनुयायी माणिकप्रभूंना दत्तात्रेयाचा चौथा अवतार मानतात.कित्येक मुसलमान, जैन, लिंगायत व्यक्ती या सकलमत परंपरेचे पाईक आहेत.या परंपरेत गादी परंपरा आहे.

**आनंद दत्त संप्रदाय**

सदानंद ऋषींनी ‘आनंद दत्त संप्रदाय’ स्थापन केला आहे.आनंद दत्त संप्रदायात विष्णु⟶विधी⟶अत्री⟶दत्त⟶सदानंद⟶रामानंद अशी गुरुपरंपरा सांगितली जाते.रामानंदांनी या संप्रदायाचा प्रसार आणि प्रचार केला.बसवकल्याण येथे सदानंद ऋषी यांनी संजीवन समाधी घेतली आहे.बसवकल्याण येथील दत्त क्षेत्राला ‘भुयारी समाधी मंदिर’ असे म्हणतात.या नऊ भुयारात आनंद दत्त संप्रदायातील महापुरुषांच्या ४८ समाध्या, तर इतर ठिकाणी ३० मठाधिपतींच्या समाध्या आहेत.वारकरी पंथात जे महत्त्व आळंदीला आहे, तेच महत्त्व दत्त संप्रदायात ‘बसवकल्याण’ ल आहे.

संपूर्ण विश्वामध्ये आनंद आणि प्रेमभाव निर्माण व्हावा.माणसाने माणूस म्हणून सर्वांबरोबर व्यवहार करावा आणि संपूर्ण विश आनंदमय करावे, ही या संप्रदायाची श्रद्धा व धारणा आहे.

## अवधूत पंथ

पंत महाराज बाळेकुंद्री यांनी सुरू केलेली दत्त संप्रदायांतर्गत असलेली परंपरा म्हणजे 'अवधूत पंथ" होय.अवधूत संप्रदायाला 'अनादिसिद्ध श्रुतीसंमत संप्रदाय' असेही म्हटले जाते.ही परंपरा श्रीदत्तात्रेयांची प्रेमभक्ती या मुख्य सूत्रावर आधारित आहे.श्रीदत्तात्रेय व अवधुतांवर निरतिशय प्रेम ही या पंथाची साधन आहे.पंत महाराज बाळेकुंद्री यांनी अवधूत पंथाची दीक्षा बालावधूत महाराजांकडून घेतली. पंत महाराज बाळेकुंद्री यांनी मराठी व कन्नड भाषांमध्ये दत्तात्रेयांवर शेकडो पदे, भजने, आरत्या यांचे लिखाण केले.

विषय वैराग्य, सहजानुभव, बंधुप्रेम, विधिनिषेध त्याग, निःस्वार्थ कर्म, संचित, अहंकारनाश, समरसता, सद्गुरूप्रीती, अद्वैतभक्ती ही अवधूत पंथाची वैशिष्ट्ये आहेत.

## समारोप

महाराष्ट्रातील वारकरी, दत्त या मुख्य संप्रदायातील उप-परंपरांनी देखील महाराष्ट्रात भक्ती आंदोलन पुढे नेण्यात महत्त्वाचे योगदान केले आहे.सर्वजनांना सखोल आध्यात्मिक ज्ञान देण्याचे महत्तम कार्य या उपपंथांनी केलेले आढळते.महाराष्ट्रीय समाजात समरसता, समन्वयनशीलता, सौहार्द निर्माण करण्याचे कार्य या उप-परंपरांनी केले आहे.

# महाराष्ट्रातील अन्य संप्रदाय








माणिकप्रभू

पंत महाराज बाळेकुंद्री

आनंद वारकरी

# संदर्भ ग्रंथ आणि लेख सूची

## संदर्भ ग्रंथसूची

१. कोलते वि.भि., ‘महानुभाव तत्त्वज्ञान’, अरुण प्रकाशन, मलकापूर, द्वि.आ., १९५६.

२. कोलते वि.भि., ‘महानुभावांचा आचारधर्म’, अरुण प्रकाशन, मलकापूर, प्र.आ., १९४८.

३. गाडगीळ अमरेंद्र(संपा.), ‘श्रीगणेशकोश’, वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, मुंबई, प्र.आ., १९६८.

४. ढेरे रा.चिं., ‘श्रीविठ्ठल : एक महासमन्वय’, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, चौ.आ., २०१२ .

५. ढेरे रा.चिं., ‘श्रीगुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा’, वोरा अँड कंपनी पब्लिशर्स, मुबई, प्र.आ., १९५९.

६. ढेरे रा.चिं., ‘दत्त संप्रदायाचा इतिहास’, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९६४.

७. तगारे ग. वा. ‘शैवदर्शन’, मराठी तत्त्वज्ञान-महाकोश मंडळ आणि प्राचार्य दांडेकर वाङ्मय प्रकाशन मंडळ, पुणे, प्र.आ., १९८७.

८. तुळपुळे शं.गो., ‘महानुभाव पंथ आणि त्याचे वाङ्मय’, व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र.आ.,
१९७६.

९. द्विवेदी व्रजवल्लभ, ‘तन्त्रागमीय धर्म-दर्शन’, भाग १ व २, शैवभारती शोधप्रतिष्ठाणम्,
वाराणसी,प्र.आ., २००१.

१०. फाटक न.र., ‘रामदास : वाङ्मय आणि कार्य’, मौज प्रकाशन गृह, मुंबई,
प्र.आ., १९७०.

११. बेंद्रे वा.सी., ‘तुकाराम महाराज ह्यांची गुरुपरंपरा’, मराठीदेशा फाऊंडेशन, पुणे,
२०२४.

१२. मोहोळकर विनायक, ‘नागेश दर्पण’, नागेश प्रकाशन, सोलापूर, प्र.आ.,
१९९१.

१३. मंचरकर र.बा.(संपा.), ‘वीरशैव संप्रदाय’, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर,
प्र.आ., १९८९.

१४. सरदार गं.बा., ‘मराठी वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती’, लोकवाङ्मय गृह प्रकाशन,
मुंबई, न.आ, २०१४.

**संदर्भ लेखसूची**


१. करंदीकर वि.रा., ‘समर्थ संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-१४.

२. कपाळे चंद्रशेखर, ‘वीरशैव संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-१७.

३. कुलकर्णी अ.र., ‘वारकरी संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-१६.

४. कुलकर्णी अ.र., ‘केशव चैतन्य’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-४ .

५. जोशी वसंत, ‘महानुभाव पंथ व साहित्य’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-१३.

६. जोशी लक्ष्मणशास्त्री, ‘रामदास’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-१४.

७. बहुलकर श्रीकांत, ‘शाक्त पंथ’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-२०.

८. भिडे वि.वि., ‘दत्त संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-७.

९. साळुंखे आ.ह., ‘नाथ संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-८.

१०. सुर्वे भा.ग., ‘गाणपत्य संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-४.

११. सुर्वे भा.ग., ‘पाशुपत संप्रदाय’, नोंदलेख, मराठी विश्वकोश, खंड-९.

# लेखक परिचय



**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**

| | | |
|---|---|---|
| नाव | : | प्रा. समीर रामचंद्र वैरागी |
| व्यवसाय | : | सहायक प्राध्यापक आणि विभागप्रमुख (मराठी), राजपत्रित अधिकारी (म.शि.से.), गट –अ, महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी(पूर्व), मुंबई – ६०. |
| शिक्षण | : | एम.ए., बी.एड., एम.फिल., नेट (जेआरएफ), सेट, |
| इतर शैक्षणिक अर्हता | : | वृत्तपत्रपदविका, भगवद्गीता पदविका, मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम, भारतीय ज्ञान परंपरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम |